पंडित-कवि

के.ना.वाटवे



IRBK-0104089
IRBK-0104089

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वाङ्‌. वा.
दा. क्र. ४०८९

पंडित-कवि

★

राजी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २१००५
विभाग वा-वा
क्रमांक ११७७८
नों. दि. ३।१३।५९
वाचनालय शाखा.

लेखक
डॉ. केशव नारायण वाटवे,
एम्. ए., पीएच्. डी.,
मराठीचे प्राध्यापक, स. प. कॉलेज्, पुणें.

★

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क .... नों दि ....
वि. .... क. ....

नोव्हेंबर १९५२] कि. १४ आणे

IRBK-0104089
IRBK-0104089

प्रकाशक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,
७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

●●

आवृत्ति पहिली : १९५२

मुखपृष्ठ चित्रकार – भय्यासाहेब ओंकार, पुणें २.

●●

मुद्रक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनिवार पेठ, पुणें २.

● ● ●

पंडित-कवि म्हणजे कोण ?

जुन्या मराठी कवितेंत दोन मुख्य प्रवाह स्पष्ट दिसतात. एक साधें सोपें संतकाव्य व दुसरें कलात्मक व थोडें अवघड पंडिती वळणाचें काव्य. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास या संतांनीं ओव्यांत व अभंगांत केलेली परमार्थपर रचना तें संतकाव्य; व मुक्तेश्वर, वामनपंडित, सामराज, रघुनाथपंडित, श्रीधर, नागेश, विठ्ठल व मोरोपंत इत्यादींनीं संस्कृत गणवृत्तांत लिहिलेलें आख्यानपर काव्य तें पंडिती काव्य. संतांच्या डोळ्यांपुढें अशिक्षित बहुजनसमाज होता; तर पंडिती काव्य रचणाऱ्यांच्या नजरेसमोर थोडा अधिक सुशिक्षित व काव्यमर्मज्ञ वाचकवर्ग होता. संतांचा हेतु बहुजनसमाजांत धर्माची अभिरुचि उत्पन्न करून त्यांना तारण्याचा होता, तर संतांच्या हेतूचा मागोवा घेत घेत पण त्याचबरोबर त्यांना कवित्वाची गोडी चाखविण्याचा दुहेरी हेतु या दुसऱ्या कवींचा होता. पहिले साक्षात्कारी, मुक्त साधुवर्य होते; तर दुसरे मुमुक्षु व संसारी होते. एक लोकांस तारावयास काव्य करीत; तर दुसरे स्वतःच तरून जाण्यासाठीं काव्य लिहीत. एकांनीं भक्ति-ज्ञान-वैराग्य संस्कृतांतील वेदांताधारें प्रतिपादिलें; तर दुसऱ्यांनीं त्याच हेतूसाठीं भारत, भागवत, रामायण आणि इतर पुराणें यांमधील गोड आख्यानें गाऊन काव्यानंदाची लयलूट केली. यांतील पहिल्या कविवर्गाला संत-कवि व दुसऱ्याला पंडित-कवि म्हणतात.

कालिदास, भारवि, माघ, श्रीहर्ष हे महाकवि; भवभूति, जयदेव, मुरारि इत्यादि नाटककार; बाण, सुबंधु, दण्डी इत्यादि गद्यकवि आणि पंडित जगन्नाथराय, भर्तृहरि, चम्पूकार इत्यादि संस्कृत कलाकार यांच्या कृतींचे नमुने डोळ्यासमोर धरून मराठी पंडित-कवींनीं आपली आख्यानकविता सजविली. त्यामुळें त्यांच्या काव्यांत पुढील गोष्टी प्रामुख्यानें आल्या. वृत्त-रचना, अनुप्रास-यमकादी शब्दालंकार व रूपक–उत्प्रेक्षादी अर्थालंकार, तत्सम संस्कृत शब्द, संस्कृत कवींचे संकेत (कमल, चातक, चकोर, अशोक, चक्रवाक वगैरेबद्दलचे) संस्कृत समास, श्लेष, विविध बंध, आणि विचार व भावना प्रगट करण्याची पंडिती व कलात्मक पद्धति. त्यामुळें पंडित-कवींचें काव्य हें संस्कृत अभिजात प्रवृत्तीचें (Classical tendency) मराठींतील पुनरुज्जीवन आहे. मराठींतील भक्तिरस आणि संस्कृतांतील कला-विलास यांचा संगम म्हणजे पंडिती काव्य होय. मुक्तेश्वर-श्रीधरासारख्या कांहीं कवींनीं ओव्यांत रचना केली असली तरी त्या ओव्यावर वरील संस्कृत कलावैभवाची घनदाट छाया पडलेली आहे. अनेक पंडित-कवींनीं

आपलें भारत-रामायणाश्रय काव्य सजविण्यासाठीं रघुवंश, कुमारसंभव, हनुमन्नाटक, शाकुन्तल इत्यादि ठिकाणच्या कल्पना आणि वर्णनाची पद्धत जशीच्या तशी आपल्या काव्यांत उचलली आहे. रघुनाथ पंडितानें तर आपलें 'नलदमयन्ती स्वयंवराख्यान' श्रीहर्षाच्या 'नैषध चरिता'धारेंच रचिलें आहे.

मराठींतील अशा पंडित-कवींपैकीं मुक्तेश्वर, वामन, रघुनाथपंडित, श्रीधर व मोरोपंत या पांच कवींचा धावता परिचय सदर पुस्तिकेंत करून देण्याचा प्रयत्न मी केला आहे. हे सर्व कवि चांगले संस्कृतज्ञ असल्यानें त्यांच्या काव्यरचनेंत थोडा अवजडपणा आला आहे. तो वाचकांना न बाधावा म्हणून ठिकठिकाणीं स्पष्टीकरणें व टीपा दिल्या आहेत. प्रथम कवीचा जीवनवृत्तान्त व नंतर त्याच्या काव्याचा परिचय हा क्रम सर्वच पाळला आहे. प्रसिद्ध संशोधकांचीं प्रमाणें जमेस धरून कविकालनिश्चय केला आहे; व मान्य रसिकांचा मागोवा घेत काव्यसौंदर्याचें विवेचन केलें आहे. तें मराठी काव्यरसिकांच्या सेवेस सादर करून मी त्यांचा निरोप घेतों. शालेय दृष्टीनें पुस्तकांची उपयुक्तता वाढावी म्हणून प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं प्रश्न वगैरे जोडण्याचें कार्य प्रा. वा. दा. गोखले एम्. ए., बी. टी. यांनीं आस्थेनें केलें, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

'दी टीचर्स आयडिअल् पब्लिशिंग हाउस'चे व्यवस्थापक श्री. न. शं. कुलकर्णी यांनीं मजकडून ही मराठीची सेवा मोठ्या नेटानें करून घेतली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

योगकुंज, चिमणबाग,
टिळकरस्ता, पुणें २.
२६—११—५२

के. ना. वाटवे.

अनुक्रम

१.	मुक्तेश्वर	१— २१
२.	वामनपंडित	२२— ४६
३.	रघुनाथपंडित	४७— ६७
४.	श्रीधर	६८— ८८
५.	मोरोपंत	८९—११३

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम २२००५
विभाग मो.वा.
क्रमांक ९१७७
नों. दि. ३।११३।६९

मुक्तेश्वर : : : १

⁕ अग्रगण्य कवि

मुक्तेश्वर हा पंडितकवींमध्यें अग्रगण्य. तो जसा कालदृष्ट्या पहिला तसा काव्यगुणाच्या दृष्टीनेंहि पहिलाच आहे. महाभारतासारख्या प्रवृत्तिपर राष्ट्रीय महाकाव्यावर यानेंच सुरस अशी मराठी विख्यात रचना केली. ती मराठींत अगदीं प्रथमच केलेली नसली (कारण ‘ विष्णुदास नामा ’ नांवाच्या कवीनें केलेला महाभारताचा अनुवाद मुक्तेश्वरापूर्वीचा आहे.) तरी भाषाशैली व रसपरिपोष या दृष्टीनें ती अपूर्व आहे. म्हणून ‘ जिवाशिवा ’ या कवीच्यासारखे महाभारताचे अनुवादक मुक्तेश्वराला अगदीं मुक्तकंठानें

‘ आदिकवीचा श्रेष्ठ कवि । मुक्तेश्वर ज्ञानी अनुभवी ।
काव्यरचने श्रिया वैभविं । अग्रपद कविगणांत ’

या शब्दांनीं गौरवितात. इतकेंच नव्हें तर हा जिवाशिवा प्राकृत भारत रचणाऱ्या मुक्तेश्वराला ‘ व्यासाचा साक्षात् अवतार ’ म्हणतो. रामायणावरील आपल्या श्लोकबद्ध रचनेंत त्यानें आपलें विविध वृत्तें रचण्यांतील कौशल्य, शब्दालंकार व अर्थालंकार योजण्याचें चातुर्य व संस्कृत काव्य-नाटकांशीं असलेला आपला गाढ व्यासंग प्रकट केला आहे; आणि पंडित

काव्यरचनेची प्रथा प्रथमच निर्माण केली आहे. रंगनाथ, श्रीधर, महिपति, मोरोपंत इत्यादि जुने कवी जसे त्याला आदरानें वंदन करतात तसेंच कृष्णशास्त्री चिपळोणकर, भारताचार्य चिं. वि. वैद्य, पांगारकर, वा. अ. भिडे, वि. ल. भावे इत्यादि आधुनिक रसज्ञ त्याच्या काव्यगुणांचें कौतुक मोठ्या आवडीनें करतांना आढळतात.

कालाचा अंदाज

परंतु खेदाची गोष्ट अशी कीं महाराष्ट्रकवींमध्यें सर्वश्रेष्ठ अशा या कवीच्या चरित्राची व कालाची पूर्ण आणि विश्वसनीय माहिती अद्यापि उपलब्ध नाहीं. खुद्द मुक्तेश्वरानें आपल्याबद्दल आपल्या ग्रंथांत जें लिहिलें आहे त्यावरून पुढील गोष्टी निश्चित कळतात. मुक्तेश्वर हा एकनाथ महाराजांचा नातू. म्हणजे त्यांच्या मुलीचा मुलगा. त्याच्या पित्याचें नांव चिंतामणि. (' मातृ-जनक जनार्दनी । येकनाथ नमीयेला ॥ आदि–१–७७ ' तसेंच,

' गोदावरी तटनिवासी । अत्रिगोत्री पवित्र ऋषि । चिंतामणि गुणैक राशी– ।
पासव जन्म जयाचा । तो मुद्गल चिंतामणिसुत । लीला विश्वंभरविख्यात ।
व्यासभारतीचा अर्थ । महाराष्ट्र वाणीं बोलिला ॥ सभापर्व–उपसंहार.)

कोल्हापूर येथील महालक्ष्मी ही मुक्तेश्वराची कुलस्वामिनी असून, सोनारीचा भैरव हा त्याचा कुलस्वामी होता. (' नमूं करवीर निवासिनी । जे महालक्ष्मी विश्वजननी ' आणि ' वंदू सोनारी भैरव । तेणें दिधला हा गौरव । सभापर्व–प्रारंभ ')

आपला गुरु व आपलें उपास्यदैवत या दोन्हीहि नात्यांनीं तो ' लीलाविश्वंभरास ' वंदन करतो (लीलाविश्वंभर ईश्वरू । दत्तात्रेय जगद्गुरु ॥ सभापर्व–प्रारंभ.)

यावरून कित्येकांनीं असा तर्क केला होता कीं मुक्तेश्वराच्या मातेचें नांव ' लीला ' व त्याच्या पित्याचें दुसरें नांव ' विश्वंभर ' हें असावें. परंतु हा

तर्क साधार दिसत नाहीं. त्याचप्रमाणें मुद्गल हें त्याचें आडनांव हीहि कल्पना अलीकडे खोटी ठरूं पहात आहे. मुक्तेश्वरानें आपल्या मातेच्या नांवाचा प्रत्यक्ष उल्लेख केला नसला तरी एकनाथ-चरित्रकार केशवदास व महिपति तें नांव गोदावरी किंवा गोदूबाई असें देतात. तिचें नांव गंगाबाई असावें असेंहि मुक्तेश्वराच्या तेरवाड येथील वंशजास मिळालेल्या सनदेवरून दिसतें.

नांव का आडनांव ?

अलीकडे प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं केलेल्या संशोधनावरून याबाबत पुढील गोष्टी निश्चित समजावयास हरकत नाहीं. 'मुद्गल' हें मुक्तेश्वराचें मूळचें व्यक्तिनाम, आडनांव नव्हे. काव्य करावयास लागल्यानंतर मुद्गलानें 'मुक्तेश्वर' हें आपलें कविनाम (Pen-name) आपणांस मुद्दाम लावून घेतलें.

('मुक्तेश्वर जो मी अवधूतें । माझेनि नामें मुद्रांकित । कथा विस्तारीं भारत । महाराष्ट्र पदबंधीं । —आदि—१—४४)

तसेंच 'लीलाविश्वंभर' हें त्याच्या मातापित्याचें जोडनांव नसून त्याचें उपास्यदैवत जें दत्त त्याचेंच तें नांव आहे. 'लीलाविश्वंभर' हें विशेषण दत्ताला उद्देशून मुक्तेश्वरापूर्वीं दासोपंतांनींहि लाविलें आहे. (पहा—'मुक्तेश्वराचा शोध' अ. का. प्रियोळकर—आदिपर्व—प्रस्तावना)

शिवाजीचा अनुल्लेख

मुक्तेश्वराचा विद्याभ्यास गोदावरीचे तीरीं पैठणास त्याच्या आजोबाच्या घरींच झाला. मुक्तेश्वराचा जन्मकाल व त्याचा मृत्यु यांबद्दलहि संशोधकांत मतभेद आहे. तथापि पुढील काल आज तरी निश्चित समजण्यास हरकत नाहीं. त्याचा जन्म शके १५३१ (म्हणजे इ. स. १६०९) व मृत्यु अजमासें शके १५८२ (इ. स. १६६०)च्या सुमाराचा असावा. तसेंच त्याच्या भारतरचनेचा काल इ. स. १६३५ ते १६४०च्या दरम्यानचा दिसतो.

मुक्तेश्वर आपल्या भारतांत डच, पोर्तुगीज व इंग्रज यांचा उल्लेख करतो पण इ. स. १६६८ त सुरतेस वखार घालणाऱ्या फ्रेंचांचा उल्लेख तो करीत नाहीं. शिवाजीमहाराजांची कीर्ति मुक्तेश्वराला अज्ञात आहे व तुकाराम-महाराजांचाहि तो उल्लेख करीत नाहीं या मुख्य गोष्टी ध्यानांत घेऊन संशोधकांनीं मुक्तेश्वराच्या कालासंबंधीं वरील अनुमानें केलीं आहेत. तसेंच मुक्तेश्वराची भाषा शिवकालाच्या कवींप्रमाणें फारशी-शब्द-प्रचुर नाहीं. तिचा कल ज्ञानेश्वरी व एकनाथी भाषेकडे जास्त आहे. मुक्तेश्वराचें देहावसान कुरुंदवाडजवळ असलेल्या तेरवाड या त्याच्या मूळगांवींच झालें असावें, कारण तेथेंच त्याची समाधि आहे.

मुक्तेश्वराची विद्वत्ता

मुक्तेश्वराचें बालपण एकनाथमहाराजांच्या घराण्यांतील शिस्तीमध्यें गेलें असल्यानें त्याचें अध्ययन तत्कालीन पद्धतीप्रमाणेंच झालें असलें पाहिजे. मुक्तेश्वर अगदीं जाडा शास्त्रिपंडित नसला तरी तो चांगलाच व्युत्पन्न होता. संस्कृत काव्यशास्त्र आणि काव्यनाटकें यांचें त्याचें अध्ययन सखोल व मार्मिक होतें. तसेंच त्यानें न्याय, मीमांसा, वेदान्त इत्यादि शास्त्रांचे आणि विद्यांचे जे उल्लेख आपल्या प्राकृत भारतांत केले आहेत, त्यावरून संस्कृतांतील शास्त्रग्रंथांचाहि त्याला उत्तम परिचय होता असें दिसतें. त्याचप्रमाणें त्यानें मराठींतील प्राकृत ग्रंथहि साक्षेपानें वाचलेले दिसतात. ज्ञानेश्वर व एकनाथ या कवींना त्यानें आदिपर्वांत वंदन केलेलें आहे व महाभारतावर पूर्वीं झालेल्या टीकांचा (विष्णुदासनामा इत्यादिकांनीं केलेल्या प्राकृत भारतांचा) त्यानें उल्लेख केलेला आहे. मुक्तेश्वराचें अध्ययन जसें सखोल आहे तसेंच त्याचें अवलोकनहि विस्तृत दिसतें. त्याला मानवी स्वभावाची मार्मिक ओळख असून समाजांतील चालीरीति, वस्त्रें आणि पक्वान्नें यांचीं विविध नांवें, देशांतील बाजारपेठा, नव्याजुन्या राजांचीं नांवें, कुस्त्यांचे डावपेच, युद्धांतील शस्त्रास्त्रें, रत्नांचीं आणि अलंकारांचीं नांवें इत्यादि शेंकडों बाबी माहीत आहेत.

सूर्योदय, सूर्यास्त, पावसाळा, नदीकांठ, अरण्यें आणि पर्वत इत्यादिकांचीं त्यानें केलेलीं वर्णनें त्याच्या निसर्गप्रेमाची आणि सूक्ष्म निरीक्षणाची साक्ष देतात.

मुक्तेश्वराचा काव्यसंभार

रामायणावर आधारलेला ‘ संक्षेपरामायण ’ हा मुक्तेश्वराचा पहिला ग्रंथ असावा. हा ग्रंथ भिन्नभिन्न संस्कृत वृत्तांत लिहिला असून शब्दालंकार व अर्थालंकार यांनीं तो खचून गेलेला आहे. यांत त्यानें संस्कृतांतील हनूमन्नाटक, रघुवंश, भामिनीविलास, भर्तृहरीकृत ‘ शतकें ’ इत्यादिकांतील श्लोकांचे अनुवाद केलेले आहेत. ही मुक्तेश्वराची श्लोकबद्ध रचना पुढील वामनपंडितादि पंडितकवींना मार्गदर्शक ठरली. या संक्षेप रामायणाची श्लोकसंख्या १७२५ आहे. एकंदरीनें पाहतां संक्षेपरामायणाच्या श्लोक-रचनेंत मुक्तेश्वराची प्रतिभा आपल्या खऱ्या तेजानें प्रकट झालेली दिसत नाहीं. मुक्तेश्वराच्या कीर्तीचा खरा आधार त्यानें केलेली ‘ भारतरचना ’ हाच होय. मुक्तेश्वरानें भारताच्या अठराहि पर्वांवर मराठी रचना केली असल्याचा संभव दिसतो. पण आज मुक्तेश्वरानें केलेलीं पुढील ५ पर्वेंच उपलब्ध आहेत; १. आदि; २. सभा; ३. वन; ४. विराट; व ५. मधलेंच ११ वें सौतिक पर्व. आदिपर्वाची ओवीसंख्या ७१२३, सभापर्वाची २७००, वनपर्वाची ३३७३, विराटपर्वाची ९९१, व सौतिकपर्वाची ५०० आहे. याशिवाय समग्र गीताटीका, हरिश्चन्द्राख्यान, शुकरंभासंवाद, एकनाथ-चरित्र, गजेन्द्रमोक्ष, हनूमंताख्यान, विश्वामित्रभोजन, शतमुखरावणवध, मूर्खांचीं लक्षणें, इत्यादि त्यानें लिहिलेलीं प्रकरणें उपलब्ध आहेत. त्यानें भागवतावरहि प्राकृत रचना केली असल्याचा उल्लेख कोणी कोणी केला आहे. पण ती अद्याप उपलब्ध झालेली नाहीं. तथापि आज उपलब्ध असलेली त्याची कविता, ओव्या—श्लोक—पदें वगैरे धरून, अठरा ते एकोणीस हजार इतकी प्रचंड आहे.

पंडिती वळण

हा झाला मुक्तेश्वराचा काव्यसंभार. आतां त्याच्या काव्यगुणांचा थोडा परिचय करून घेऊं. संस्कृतांतील काव्यनाटकादि पंडिती वळणाच्या काव्य-पद्धतीची छाप मुक्तेश्वरावर पडलेली असल्यानें त्यानें आपल्या ' संक्षेप रामायणां'त त्याच वळणाची रचना केली. आपली रचना ' नाना-नाटक-भाव-पद्य-रचना-संदोहसान्द्रीकृता ' म्हणजे संस्कृतांतील निरनिराळ्या काव्यनाटकादि पद्यरचनेच्या संमिश्रणानें भरून राहिलेली आहे असें तोच प्रारंभीं सांगतो. पुढें या रचनेचे कांहीं नमुने दिले आहेत. चित्रकूट पर्वतावर भरतानें रामाची भेट घेतली त्या प्रसंगाचें पुढील अनुप्रासयुक्त वर्णन पहा:—

> उत्कंठे प्राण आटे; मनमय प्रगटे; हृत्पुटीं रूप मोठें;
> नेटें वोटें कपाटें न लगत नयनीं; तेज दाटे; न घोटे; ।
> लोटे प्रेमें सपाटें; पुलकित उमटे; भूतटीं काष्ठनेटें;
> श्रेष्ठें धावोनि कष्टें, उठवुनि निकटें, आंवळी कंठ कंठें. ॥
>
> (अयोध्या काण्ड–११०)

वरील श्लोकांत ' ट ' आणि ' ठ ' यांचा अनुप्रास साधण्याच्या हव्यासांत मुक्तेश्वरानें साध्या अर्थाकडेहि दुर्लक्ष्य केलेलें दिसतें. मग त्यांतून रसोत्पत्ति कोठून होणार ?

अर्थहीन यमकें

आतां यमकाचें पुढील एक उदाहरण पहा—

> परमसुंदर सुंदरकांड हें भवघटीं विघटीं रसभांड हें ।
> परगुणी सगुणी परमादरें विररसा परिसा मन सादरें ॥
>
> (सुंदर काण्ड–११६)

याहि श्लोकाची वरीलप्रमाणेंच गत आहे. वरील दोन्हीहि श्लोक अर्थ-दृष्ट्या व भाषाशुद्धीच्या दृष्टीनें हीन असले तरी रघुवंश किंवा हनूमन्नाटक

इत्यादि संस्कृत काव्यनाटकांतील यमकानुप्रासांची जोड त्यायोगें मराठी कवितेला पहिल्यानेंच लाभली हें विसरून चालावयाचें नाहीं. अशासारख्या यमकानुप्रासयुक्त श्लोकरचनेचें अनुकरण पुढें वामनपंडितादि कवींनीं केलें हें त्यांच्या 'वंशी नादनटी' आणि 'फिरविते रवितें दधिभीतरीं' या रचनेवरून दिसून येईल. रसपरिपोषक अशी रचना 'संक्षेप रामायणांत' अगदींच नाहीं असें नाहीं. पुढील दोन तीन ठिकाणीं मुक्तेश्वराचे काव्यगुण प्रकट झालेले दिसतील.

खोंचक प्रश्नोत्तरें

सीतेच्या स्वयंवराचे प्रसंगीं रामानें परशुरामाचें धनुष्य मोडलें. त्यामुळें खवळलेला परशुराम रामासमोर येऊन उभा राहिला व ते दोघे वीर एकमेकांस टाकून बोलूं लागले. तो त्यांचा संवाद पुढील श्लोकांत मुक्तेश्वरानें दिला आहे. प्रथम परशुरामाचें रामास उद्देशून अपमानकारक बोलणें व त्यावर रामाचें खोंचक उत्तर अशी या श्लोकाची रचना आहे—

'परम अधम तूं रे। क्षत्रियांमाजि रामा'.
'भृगुपति! तव शस्त्रें सांगती ब्रह्मकर्मा'.
'अनुचित कृत नष्टा मारिली नार झुंजीं'
'शिव! शिव! परि नोहे ताटिका माय माझी!' ॥

(बालकाण्ड—११६)

परशुरामानें रामास 'हीन क्षत्रिय' असें म्हटलें. त्यावर रामानें त्यास उत्तर दिलें, कीं 'तूं ब्राह्मण असून शस्त्रें धारण करतोस, यावरून तुझें ब्राह्मण्य किती चोख आहे हें दिसतेंच.' यांवर परशुरामानें रामावर असा आक्षेप घेतला कीं, 'तूं रणामध्यें ताडका नांवाच्या स्त्रीस मारिलेस. हें तुझें कृत्य निंद्य आहे.' यावर रामानें दिलेलें उत्तर अत्यंत खोंचक व मार्मिक आहे. तो म्हणतो, "मीं ताडका या स्त्रीला मारिलें हें खरें असलें तरी ती माझी माता खासच नव्हती." यांतील खोंच अशी आहे कीं परशुरामानें आपली माता रेणुका हिला ठार केलें होतें.

मुग्ध-शृंगार

मुग्ध-शृंगाराचा पुढील नमुना पहा— राम सीतेसह दंडकारण्यांतून जात असतां वाटेंत कांहीं पांथस्थ स्त्रियांनीं सीतेस प्रश्न केला, कीं 'निळ्या कमळाप्रमाणें कांति असलेला हा पुरुष तुझा कोण आहे ?' हा त्या स्त्रियांचा प्रश्न ऐकून सीतेची लज्जेमुळें जी चर्या झाली त्यावरूनच त्या चतुर बायकांनीं त्या दोघांचें नातें ताडलें. तो श्लोक असा—

पथिं पथिकवधू त्या पूसति रामजाये,
'कुवलयदळनीळा कोण हा सांग माये !'।
हसितमन मिनाक्षी रामचंद्राननातें
निरखित, पतिराजा, जाणवे जाणत्यातें ॥

(अरण्यकांड–६)

हा श्लोक हनूमन्नाटकांतील 'पथि पथिकवधूभिः' या [ह. ना. ३–१५] या श्लोकाचा अनुवाद आहे.

नाजूक उपहास

मुक्तेश्वराची विनोदी वृत्ति पुढील श्लोकांत व्यक्त झालेली दिसेल. लंकेंतील राक्षसांमध्यें कांहीं राक्षस तपस्वी, अग्निहोत्री, ब्रह्मज्ञानी असे होते. पण बोलूनचालून ते राक्षसच. त्यामुळें एकीकडे अहिंसा, तपश्चर्या व ब्रह्मज्ञान यांचें ढोंग व दुसरीकडे राक्षसी वृत्तींतील तद्विरुद्ध आचार या दोन गोष्टी एके ठिकाणीं मांडून मुक्तेश्वरानें सुंदर हास्यरस उत्पन्न केला आहे. हें वर्णन करीत असतां त्यानें आपले आजोबा एकनाथ यांच्या 'भावार्थरामायणां'तील एका प्रसंगाचा (सुंदरकाण्ड १–४८–६२) मागोवा घेतलेला दिसतो.

घरीं अग्निहोत्रें मुखीं वेद चारी, दिठीं देखतां धेनुविप्रांसि मारी;।
फळें भक्षिती, प्राशिती रक्तमद्यें, मुखीं शास्त्रचर्चा श्रुती गद्यपद्यें. ॥

स्त्रिया जारिणी जारचर्चा नरातें, करीं अक्षमाळा स्मरे शंकरातें;।
सदासर्वदा डुल्लती मद्यपानीं, मुखीं 'सोऽहमस्मि' वदे ब्रह्मज्ञानी.॥
(सुंदरकाण्ड – ४ - ५)

मूर्खांचीं लक्षणें

मुक्तेश्वराच्या स्फुट काव्यरचनेंतील कांहीं स्थळांचा नुसता नामनिर्देश करतों. 'मूर्खांचीं लक्षणें' या भारतांतील एका प्रसंगाच्या अनुवादांत मुक्तेश्वरानें आपलें स्वतःचें समाजनिरीक्षणहि उत्तम तऱ्हेनें प्रकट केलें आहे. त्यानें दिलेलें पुढील मूर्खलक्षण पहा—

"प्रकाशाचिये तोंडी । उभा राहूनि वस्त्र फेडी ।
सांडव्यावरून धांवे तांतडी । तो एक मूर्ख जाणावा ॥"
"नीच बैसोनि उंची ××। नाकींचा मळ काढी हातें।
बोटींचे नख तोडी दांतें । तो एक मूर्ख जाणावा ॥"

या व अशासारख्या मूर्ख लक्षणांची छाप रामदासांनीं 'दासबोधां'त वर्णिलेल्या मूर्खलक्षणांवर पडलेली असावी असें वाटतें. मुक्तेश्वरानें गीतेचा अनुवाद अगदीं श्लोकास श्लोक असा तंतोतंत केला आहे. उणें अधिक कांहीं केलें नाहीं. 'शुकरंभासंवादांत' रंभेच्या सौंदर्याचें व तिच्या कृतीचें आणि उक्तीचें वर्णन जितकें उत्तान आणि मादक आहे तितकेंच किंवा त्याहूनहि अधिक उग्र असें शुकाच्या वैराग्याचें विवेचन आहे. उत्तान शृंगार आणि परम वैराग्य व शान्ति उत्पन्न करणारा शान्तरस एकाच ठायीं निर्माण करण्याचें सामर्थ्य मुक्तेश्वराच्याच लेखणीचें असें हें प्रकरण वाचून वाटतें.

मोहिनीचें मोहक वर्णन

मुक्तेश्वराची कवि म्हणून झालेली कीर्ति मुख्यतः त्याच्या भारतरचनेवरच आधारलेली आहे. प्राकृत भारत रचीत असतां मुक्तेश्वरानें आपल्यास न

साधणारी श्लोकरचना सोडून दिली व ओंवीचा आश्रय केला; व हा आर्षछंद, राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें, भारतासारख्या आर्षमहाकाव्याच्या ओजस्वितेला उपकारक ठरला. मुक्तेश्वरी ओंवींत मुक्तेश्वराचें खरें कविमन उत्तम तऱ्हेनें प्रकट झालेलें दिसतें. त्याच्या प्रतिभेचा सर्व विलास त्यानें आपल्या रसाळ ओंव्यांतून दाखविला आहे. समुद्रमंथन झाल्यावर अमृत प्रकट झालें. तें कोणीं घ्यावें याबद्दल देव आणि दानव यांच्यामध्यें कलह सुरूं झाला. या प्रसंगीं भगवान् विष्णूंनीं मोहिनीचें रूप घेतलें व त्या प्रकरणाचा कपटानेंच शेवट लावला. या प्रसंगावर लिहीत असतां मुक्तेश्वर त्या 'मोहिनी' अवताराचें पुढीलप्रमाणें वर्णन करतो—

"असो ऐसी विश्वमोहनी। मूळमायेची कुळस्वामिनी।
सुरासुरीं देखतां नयनीं। पतंगप्राय दीपले॥

मदन — अवलोकितां कंदर्प-कोटी। सांडणें होतें चरणांगुष्ठीं।
त्रैलोक्यलावण्याची पेटी। देवां दैवें उघडिली॥

झळकला असता — झगटतां दंतदीप्तिचा रंग। पाषाण होती पद्मराग। माणकें
स्मित होतां भूतळीं चांग। रत्नरासी विखुरती॥
पाय ठेवितां महीमंडळीं। सुवर्णकमळें सहस्रदळीं।
उगवती तेथें परागधूळी-। माजी लोळे वसंतु॥

ते चातुर्यचंपककळिका।
शृंगारकासार मराळिका। — सरोवरांतील हंसी
किंवा, मुक्ति — नाना कैवल्य कनकलतिका। वैकुंठींहूनि उतरली॥
ब्रह्मांड करंड्या बाहेरी। अंगींचा परिमळ धांवणें करीं।
वेधकाचिया चित्तभ्रमरी। यात्रे आणी त्या ठाया॥

भुंवईचें धनुष्य — भ्रूचाप सज्जूनि आकर्ण। सोडितां कटाक्षांचे बाण।
असुर-मृगीं सांडिले प्राण। धैर्य आणि स्मरणाचे॥
नाना कटाक्षांच्या जाळीं। असुरसमुहो सागरजळीं।
मनोमच्छ येके काळीं। वोढोनि पासीं गोविले॥

[आदिपर्व; अध्याय ४; श्लोक १३२-१३९],

२०००५ म्म/बी ११७८ ३११३१८

तत्त्वज्ञानाची उंची बैठक

' दानवांना मोह घालून देवांना अमृतलाभ करून द्यावयाचा ' हा मोहिनीअवताराचा मुख्य उद्देश ध्यानांत घेऊन मुक्तेश्वरानें श्रीविष्णूच्या मोह घालण्याच्या शक्तीचें वर्णन वेदांतशास्त्राच्या उच्च बैठकीवरून केलें आहे. ही मोहनी मूळमायेची कुळस्वामिनी आहे असें म्हणून मूळ परब्रह्म व त्यावर आवरण घालून सबंध विश्वाला मोह पाडणारी मूळ माया या वेदांतांतील दोन आदितत्त्वांची आठवण मुक्तेश्वरानें येथें करून दिली आहे. ज्या मायेमुळें ब्रह्मदेवादिकांनासुद्धां मोह पडतो व ब्रह्मसुखरूपी अमृत जवळ असूनहि त्याची चव त्यांस चाखतां येत नाहीं त्या मायेची कुलदेवता असणारी ही ' मोहनी ' साध्या दानवांना मोहांत गुंतवील यांत काय संशय !

सूचक रूपकें

त्यानंतरच्या ओंव्यांत ज्ञानदेवाची शैली आणि संस्कृतांतील प्रौढ रचनेची ढब बरोबर घेऊन मुक्तेश्वराची प्रतिभा स्वैर विहार करीत असल्याचें मनोहर दृश्य दिसतें. त्यांतील रूपकें सुंदर आहेत. ' तिच्या अंगाचा सुवास इतका आकर्षक होता कीं तो सेवन करणाऱ्यांचे चित्तरूपी भ्रमर थव्यांनीं तिजकडे लोटत होते, तिच्या नेत्रकटाक्षामुळें असुररूपी हरिणांचें देहभान हरपलें व ते घायाळ झाले. मासे जसे एकदम जाळ्यांत पकडावे तसें आपल्या नेत्रपाशांत असुररूपी मासे तिनें गोंवून टाकले. भ्रमर, हरिण व मासे हे प्राणी मोहांत गुंतून नाश पावतात तसा असुरांचाहि नाश या मोहिनीच्या मोहामुळें होणार ही गोष्ट येथें केवळ या तीन रूपकांनीं कवि सूचित करतो.

भयंकर रात्र

याप्रमाणें मोहक प्रसंग रंगविणारी मुक्तेश्वरी कल्पना भयानक दृश्येंहि कशी कुशलतेनें चितारते तें दाखवितों. दुर्योधनानें पुरोचनाच्या मदतीनें

पांडवांना लाक्षागृहांत जाळून टाकण्याचा घाट घातला होता. पण पांडव एका विवरमार्गांतून सुखरूप बाहेर पडले व पांडवांना जाळण्याच्या कटांत असलेला पुरोचनच—त्याची बायको व पांच पुत्र यांचे सह—त्या लाक्षागृहांत भाजून मेला. या भयंकर प्राणसंकटांतून कसे बसे सुटलेले पांडव भुयारांतून वर आले ते एका भयंकर अरण्यांत ! आणि तेहि भयानक अशा काळोख्या रात्रीं ! ! या भयानक पार्श्वभूमीवर मुक्तेश्वर रात्रीचें रौद्र चित्र कसें रंगवतो तें पहा.

भीमसेन पाहे दृष्टी । तव अंधकारें कोंदली सृष्टी ।
झुडपें गुल्मलता वृक्ष दाटी । तृणें मार्ग लक्षेना ॥
निशाचरी श्वापद पक्षी । थोर गर्जना करिती कक्षीं । गवतांत
लटकलीं घोळकंबली महावृक्षीं । आस्वलें आणि वाघुळें ॥

समुदाय वन-देवता यक्षिणी पाळे । धुमस घालिती गदारोळे । आरोळ्यांनीं
दीपिका लावूनि भंबाळे । गुप्त होती एकसरा ॥ एकदम
प्रेतगण स्मशानवाशी । रूपें धरून भ्यासुर वेषी । भयंकर
पापी छळिती अशुचि मानवासी । झोंबती मांस भक्षावया ॥

दिवाभीतांचे घुंघाट । पिंगळियाचे किलकिलाट ।
स्वैरपणें भालू भुंकती सैराट । टिटवे थोर टिवटिवती ॥
चक्रवाकांचे आर्त स्वरीं । कुमुदीं भ्रमरांचे झुंकारी । कमळांत
विस्तारांत मस्तकमणी तेज विखरीं । जीव आहारा शोधिती ॥

संचारार्थ चारिया निघोनि निधानें । धगधगीत प्रकाशमाने । गुप्तधन
ईश्वर-कृपेस्तव पूर्वपुण्यें । 'येवों' म्हणती सभाग्या ॥
असो. हे निशा दाटली काळी । जेंवी काळपुरुषाची कांबळी ।
ब्रह्माण्डदेवतेवरी सगळी । पांघुरविली आप्तत्वें ॥

(आदिपर्व ३६—५४ ते ६१)

भयानकरसाला अद्भुताची साथ !

मुक्तेश्वराच्या या आठ ओंव्या म्हणजे एकामागून एक दाखविलेल्या आठ भयानक दृश्यांचा चित्रपटच होय !

१. भयाण रात्रीं अंधारामुळें अधिक भयाण दिसणारीं झाडें आणि गवतें.

२. हिंस्र पशुपक्षांच्या गर्जना. झाडावर उलटीं लटकून राहिलेलीं अस्वलें व वाघळें.

३. शाकिनी आणि डाकिनी व आश्चर्यकारक वनदेवता एकदम कोठेंतरी हातांतील दिवट्या दाखवितात व एकदम नाहींशा होतात.

४. स्मशानांतील किळसवाणीं आणि भयंकर भुतें माणसांचें मांस तोडूं पाहतात.

५. घुबडें, पिंगळे, टिटवे असे अशुभ पक्षी यांचा कर्कश किलकिलाट.

६. एकमेकांपासून दूर झालेल्या चक्रवाक पक्ष्यांचें आक्रन्दन. कमळांत अडकलेल्या भुंग्याचा केविलवाणा आक्रोश. आणि हें चाललें असतां तिकडे काय भयंकर प्रकार चालू आहे ? भयंकर विषारी नाग आपल्या डोक्यावरील रत्नाच्या प्रकाशांत आपल्या आहारासाठीं (उंदीर, बेडूक वगैरे) प्राणी शोधून काढून त्यांस मटकावीत आहेत.

७. आणखी एक अद्‌भुत आणि भयानक दृश्य. कोणी लोभ्यांनीं जमिनींत पुरून ठेवलेल्या द्रव्याचे हंडे रात्रीचे वेळीं चकाकत इकडे तिकडे संचार करतात व कोणी भाग्यवान् माणूस दिसला तर ' तुझ्या मागें आम्ही येतों ' असा गूढ आवाज काढतात. येथें अद्‌भुतरस भयानकरसाला साथच देत आहे.

८. ही काळी रात्र म्हणजे काळपुरुषाची काळी कांबळी.

हीं दृश्यें एकापेक्षां एक भयानक आहेत. खरोखर मूर्तिमंत भयानक रस येथें उभा राहतो. तसेंच खास मुक्तेश्वरी छापाचे परिणामकारक

व नेमकें वातावरण निर्माण करणारे, पुढील शब्द येथें योजले आहेत—
धुमस घालणें (धिंगाणा घालणें), भंबाळे, गदारोळे, घुंघाट, टिवाटिवती..

मराठी उषासूक्त

आतां या भयंकर रात्रीच्या दृश्यानंतर लगेच मंगलप्रभातसमयाचें रम्य वर्णन मुक्तेश्वर करतो.

उष:कालचें मुक्तेश्वरानें केलेलें हें वर्णन इतकें रमणीय आहे कीं त्याला शिवपूर्वकालीन महाराष्ट्र-वेदांतलें ‘ उषासूक्त ’ म्हणावेंसें वाटतें. त्यांत प्रथम अरुणाचा व नंतर सूर्याचा (भार्गवाचार्याचा) उदय वर्णिला असून त्यापुढें गंगेवरून वाहत आलेल्या शीतळ वायूच्या उल्लेखानें पावित्र्याची भावना निर्माण केली आहे. त्यानंतर कवि सरोवरांतील भ्रमर, चक्रवाक आणि चक्रवाकी, पहाटे आरवणारा कोंबडा आणि दिवसा अंध होणारे घुबड या परिचयाच्या पक्ष्यांचें यथोचित वर्णन करतो. यापुढें तर एक रम्य भूपाळीच आहे–

शेष वेचतां अठरा घटिका । पूर्व दिशेनें क्षाळिलें मुखा ।
कुंकुम रेखिलें त्या तिलका । अरुणोदय बोलिजे ॥
भार्गवाचार्य[१] उदया येत । तंव अपार क्रमुनिया पंथ ।
पुढें जान्हवीजळाचा[२] वात । शीतळ मंद पातला ॥
हस्त आवरिता कुमुदीं[३] । अवमान मानिला षट्पदीं[४] ।
त्यातें आदरें कोकनदीं[५] । पाचारिलें जवळिकें ॥
कुक्कुट रव करितां का का । भयें पळ सूटला उलुका[७] ।
भोग द्यावया चक्रवाका । चक्रवाकी चालिल्या ॥
गगनसमुद्रीं मुक्ताफळें । अरुणचंचूनें कनकमराळें ।
वेंचोनि घेतां कळाकुशळें । नाहींच केलीं नक्षत्रें ॥

---

१. सूर्य. २. गंगाजल. ३. चन्द्रविकासी कमल. हें सूर्योदयाचे वेळीं मिटतें. ४. भ्रमर. ५. लाल सूर्य विकासी कमल. ६. कोंबडा. ७. घुबड.

की व्योमनर्मदेमाजी[1] थोर । कार्तवीर्य[2] सहस्रकर ।
ताराबाणलिंगांचा भार । निवटोनि करी परौता ॥
कापडी[3] चालिले तीर्थपंथें । 'सोऽहमस्मि' चिंतिती ज्ञाते ।
भक्त स्मरती हरिहरातें । प्रेमभावें आवडे ॥
शाक्त[4] चिंतिती शक्तिप्रतिमा । सौरचि[5] म्हणती सूर्य आत्मा ।
गाणपत्य गणेशमहिमा । वाखाणिती ब्रह्मत्वें ॥
प्रातर्होम द्यावया जाणा । अग्निहोत्री उठले स्नाना ।
एक सिद्ध झाले अनुष्ठाना । जपी तपी सुनेमें ॥

आदिपर्व–२६–६८–९२.

कडाडणारी वीज

ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं आपल्या पात्रांच्या तोंडीं घातलेल्या उद्गारांनींच त्या पात्रांचें तेजस्वी स्वभाव प्रकट करण्याचें मुक्तेश्वराचें सामर्थ्य विलक्षण आहे. द्यूतांत जिंकलेली एक दासी म्हणून रजस्वला द्रौपदी कौरवांच्या भर सभेंत उभी असतां निर्लज्ज दुर्योधन आपली मांडी उघडी करून 'या मांडीवर बैस' असें तिला म्हणतो. त्या बरोबर चवताळलेल्या नागिणीच्या घातक फूत्कारांसारखे जलाल उद्गार तिच्या तोंडून कसे बाहेर पडले तें प्रत्यक्षच वाचा:—

पापबुद्धी दुर्योधनू । उघडी करूनि दावी जानू । गदा उचलोनि भीमसेनू ।
हस्ततुळणा दावीतसे ॥ 'हेचि जानू रणचत्वरीं । चूर्ण करीन गदाप्रहारीं ।
जैसा क्षोभल्या वज्रधारी । शृंग भंगी पर्वताचें' ॥ हें देखोनि दुराचारी ।

---

१ आकाशरूपी नर्मदा नदी. २. सहस्रार्जुन राजा याला हजार हात होते. यानें आपल्या हजार हातांनीं नर्मदा नदींतील तेजस्वी बाणलिंगें बाहेर काढिलीं होतीं. म्हणून येथें सहस्रकिरण सूर्यास सहस्रार्जुन म्हटले आहे. ३. यात्रेकरू प्रवासी. ४. शिवशक्तीचे उपासक. ५. सूर्याचे भक्त.

म्हणे, ‘वो द्रुपदाचे कुमरी !। येऊनि बैसें मांडीवरी । होयीं अंतुरी पट्टाची.’॥ पापशब्द पडतां कानीं । हृदयीं धडकला क्रोधाग्नी,। म्हणे, दुरात्मिया ही वाणी ।’ जळो तुझी पापिष्ठा. ॥ प्रळयवीज माथां पडो । दृष्टी जळोनि जिह्वा झडो । कायापासूनि प्राण विघडो । तात्काळीक पैं तुझा ॥ भीमाकरीं जे केळवली । गदानोवरी सगुणाथली । वाग्निश्चयें तुज नेमिली । गोत्र घटित निर्धारें ॥ बहुलें योजिलें रणतळवट । आयुष्य अवधीचा अंत्रपाट । हातें सारूनि बळी वरिष्ठ । लग्न लावील स्वहातें ॥ रक्तहरिद्रा तनुलेपनी । माथा अक्षता पायपिटणीं । स्त्रियाप्रलाप वाद्यध्वनी । सुखसोहळा भोगिसी ॥ ते गदा घेऊनि मांडीवरी । रणमंचकीं निद्रा करीं । प्राण पारखे दवडूनि दुरी । मग एकांतीं पहुडें कां ॥ पुढती जागा नव्हसी कदा.’ ।·········सभापर्व – १५ – १०७ – ११६

वरील उद्गारांवरून तरवारीच्या पात्यासारखी तिखट अशी तेजस्वी द्रौपदीची वृत्ति प्रगट होते. आणि मुक्तेश्वरानें केवढें भव्य रूपक योजिलें आहे तें पहा–‘ तुझ्या मांडीवर माझ्या ऐवजीं भीमाची गदा बसेल. व तीहि अगदीं लग्न-सोहाळ्याच्या थाटामाटानें. रणांगण हें या लग्नाचें बोहलें ! भीमाची गदा ही तुझी नवरी, तुझें उरलेलें आयुष्य हाच तुम्हा दोघांमध्यें धरलेला अंतरपाट. तुझ्या जखमेंतलें रक्त हेंच तुला लावलेलें हळदकुंकू ! आणि तुझ्या मरणानें दुःखी झालेल्या तुझ्या स्त्रियांचें ओरडणें हींच लग्नाचीं वाद्यें ! अशा थाटांत ही गदानवरी मांडीवर घेऊन एकदां रणाच्या या पलंगावर तूं झोंपलास म्हणजे पुन्हा केव्हांहि जागें होण्याची तुला आवश्यकताच राहणार नाहीं–’ ! हे द्रौपदीचे उद्गार म्हणजे आकाशांत कडाडणाऱ्या विजेचा दुर्योधनाच्या मस्तकावर कोसळलेला लोळच होय.

पाऊस नव्हे, इन्द्राचा अभिषेक

पावसाळ्याचें पुढील वर्णन पहा :–

> यावरी पातला वर्षाकाळ । पंचम ऋतु झाला प्रबळ ।
> सुटला पश्चिमेचा अनिळ । मेघमाला मोकली ॥

सूर्यकिरण मृग-समुदाय । निस्तेज होऊनी पावले भय ।
लपावया शोधीत ठाय । अभ्रें आड करोनिया ॥
कीं पृथ्वीखंड त्या शाळुंखा । अनेक पर्वत शिवपिंडिका ।
इंद्रे मांडिलें अभिषेका । गगन पात्रीं बहु धारा ।

(वनपर्व–११–१९२–१९६)

केवढी भव्य ही कल्पना ! पाऊस पडतो म्हणजे काय होतें ? तर इंद्र हा आकाशाच्या अभिषेकपात्रांतील शेंकडों जलधारांनीं पृथ्वीच्या शाळुंखेंत बसविलेल्या पर्वतरूपी शिवलिंगांवर अभिषेकच करीत आहे ! एवढ्या एका भव्यरूपक-योजनेमुळेंसुद्धां मुक्तेश्वराचें कवित्व सिद्ध होण्यासारखें नाहीं का ?

मयूर चातक कपोतक । दर्दूर करिती महाघोष ।
मेघ जगाचा पालक । सर्व लोकां जाणविती ।
विद्युल्लतांचे कडकडाट । घन गर्जना गडगडाट ।
गंगादी सरितांचे खळखळाट । महापूर माजले ।

कां ? वरील वर्णन वाचून मुसळधार पाऊस कोसळतो आहे असा भास होतो कीं नाहीं ?

मल्लांची झोंबी

आतां मल्लयुद्धाचा थोडा नमुना पहा––

भीम व किर्मीर राक्षस हे दोन प्रबळ, धिप्पाड आणि परस्परांना ठार करण्यासाठीं आसुसलेले प्रचंड योद्धे कसे दिसले ? तर विंध्यपर्वताशीं झुंजणारा मेरु, गजासुरावर कोसळलेला नंदिकेश्वर आणि वालीवर तुटून पडलेला सुग्रीव यांसारखे ! आतां त्यांचें युद्धः–

मुष्टिलत्ता लथडवे थडका । हुमणिया कोपर हाणिती देखा ।
चडकणा ताडुनिया मुखा । दंत पाडूं भाविती ।
मर्मस्थळीं लाविती कळे । ग्रीवा पिळिती हस्तबळें ।

थापा हाणोनी ' डोळे । फाडूं ' म्हणती बळिष्ट ।

मुक्तेश्वराच्या शब्दयोजनेचा विशेष असा आहे कीं त्यांच्या नादावरूनहि अर्थ सूचित होतो व तें चित्र डोळ्यांपुढें उभें राहतें !

(वनपर्व २-५० - ६६)

याप्रमाणें अनेक रम्य स्थळें, रसाळ प्रसंग आणि चमत्कृतीचीं भांडारें विशेषतः आदिपर्वांत व इतरहि पर्वांत ठिकठिकाणीं (सौतिकपर्व मात्र सामान्यच आहे) आहेत. तीं कोठवर उलगडून दाखवावीं ? त्यासाठीं मूळ काव्याकडेच वळलें पाहिजे.

रसाळ आख्यान-काव्य

मुक्तेश्वरी भारत हें व्यासभारताचें निव्वळ भाषांतर नव्हे. मुक्तेश्वरानें पांडवांच्या कथेवर मुख्य कटाक्ष ठेऊन बाकीच्या भारतप्रकरणांचा कोठें संक्षेप केला आहे तर कोठें कांहीं भाग अजिबात गाळून टाकला आहे. त्याचें मुख्य धोरण रसपरिपोष हें आहे. यासाठीं तो मूळ प्रकरणांचा विस्तारहि करतो. मागें दिलेलीं रात्र व पहाट यांचीं वर्णनें स्वतंत्र आहेत. तीं भारतांत नाहींत. मुक्तेश्वरी भारत हें एक अत्यंत आकर्षक, रसाळ आणि स्वतंत्र सजावटीचें मराठी आख्यान-काव्य आहे. वातावरणनिर्मिति, खटकेबाज संवाद, निसर्गवर्णनें, राजसभा आणि राजमंदिरें यांचीं शब्दचित्रें, औत्सुक्य वाढविणें, स्वभावपरिपोष, रसनिर्मिति, सुंदर आणि अलंकारमंडित भाषाशैली हे आख्यान-काव्याचे सर्व गुण त्यांत आहेत व फार महत्त्वाची गोष्ट ही कीं, या सुंदर आख्यान-काव्याच्या वाचनानें वाचकांच्या मनावर अखेरीस उदात्त तत्त्वांचा व परमेश्वरभक्तीचा ठसा उमटतो, मन उत्साही, कणखर आणि उदात्त होतें आणि मूळ महाभारताची प्रवृत्तिपरता आंगीं बाणते.

दोषांचें गालबोट

मुक्तेश्वरी काव्यांत—गालबोटाप्रमाणें शोभणारे—कांहीं दोषहि आहेत. त्याचा ओढा उत्तान शृंगार, अश्लील वर्णनें व ग्राम्य शब्दप्रयोग करण्याकडे

आहे. आदिपर्वांत (अ. १५. १३३–१४५) शकुन्तलेच्या तोंडी तिच्याच मातेच्या उत्तान शृंगाराचें जें वर्णन मुक्तेश्वरानें घातलें आहे त्यांत कसलेंच औचित्य नाहीं. दुसरा दोष कालविपर्यास (Anachronism). दुष्यंन्ताच्या अमलाखालीं असणाऱ्या राजांत व पांडवांनीं दिग्विजयांत जिंकलेल्या राजे-लोकांत तो फिरंगी (पोर्तुगीज), इंग्रेज, पारसीक, डच (जाबी) यांचा उल्लेख करतो (पहा–आदिपर्व १५-८-१२ सभापर्व ८-१२७), द्रौपदीच्या धाव्यांत तुळजाभवानी आणतो (सभा १५–१३२) आणि नलोपाख्या-नांत ऋतुपर्ण राजाच्या करवीं शके ११००मध्यें भास्कराचार्यांनीं लिहिलेल्या 'लीलावती' ग्रंथाचा नामनिर्देश करतो ! ! (वनपर्व ८–११२). त्याची भाषा कांहीं ठिकाणीं फार संस्कृत-प्रचुर आहे व बरींच वर्णनें आणि शब्द-प्रयोग कायम ठशांचे, ठराविक आणि पुन्हां पुन्हां येणारे आहेत. प्रत्येक गोष्टीचा तो फार तपशील देतो.

दोष म्हणजे गुणातिरेक

तथापि मुक्तेश्वराच्या गुणसंपदेच्या मानानें हे दोष किरकोळ वाटतात. इतकेंच नव्हे तर असेंहि म्हणावेंसें वाटतें कीं, बाणभट्टाच्या दोषांप्रमाणें मुक्तेश्वराचे दोषहि त्याच्या गुणांच्या अतिरेकामुळें उत्पन्न झाले आहेत. वीर व शृंगार हे दोन रस पौरुष प्रकट करणारे आणि शौर्याचा आविष्कारानंद देणारे आहेत. मुक्तेश्वराची मूळ वृत्ति या रसांनाच अधिक अनुकूल असल्यानें तो या दोन रसांत रमतो. तो इतका कीं, आपण बीभत्सपणाकडे व अश्लीलते-कडे झुकत आहों याचें त्याला भान रहात नाहीं. वाचकांना माहीत असलेल्या गोष्टींतून भारतकालची परिस्थिति वर्णन करण्याच्या भरांत व त्या दृष्टीनें रसोत्पत्ति करण्याच्या नादांत तो काल–विपर्यास करतो. तो संस्कृत-व्यासंगी पंडित असल्यानें प्रौढ वर्णनांत व गंभीर वातावरण निर्माण करण्या-साठीं तो भारदस्त संस्कृत-प्रचुर भाषा वापरतो आणि त्याची कल्पनाशक्ति

तरल, अवलोकन सूक्ष्म आणि बहुश्रुतपणा मोठा असल्यानें त्याला बारीक-सारीक तपशील भरण्याचा मोह आवरत नाहीं. म्हणून मी त्याच्या थोड्या दोषांना त्याच्या गुणसंपदेचें गालबोट म्हणतों ! उत्कट भावना, अचाट कल्पनाशक्ति, गाढ व्यासंग आणि विलक्षण भाषाप्रभुत्व या गुणांमुळें त्यानें पुढील वामन–श्रीधरादि सर्व कवींवर विलक्षण मोहिनी घातली, मोरोपंताचा मुजरा घेतला ! (श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदिल ?–सन्मणि-माला) आणि मराठी कविता व मराठी भाषा यांना कायमचें ऋणी करून ठेविलें.

आत्मविश्वासाचे उद्गार

आणि असें प्रचंड सामर्थ्य आपल्याजवळ आहे याची उत्कट जाणीव खुद्द मुक्तेश्वराला आहे हें त्याच्या पुढील उद्गारांवरून दिसेल.

इतिश्री भारतकथा गहन । निरोपणरूपें समुद्रमंथन ।
सभा-प्रमेय-पीयूष-पान । दैवयोगें लाधलें ।
मुक्तेश्वराची वाङ्मोहिनी । दुर्जन-दैत्यानें ठकोनी ।
सज्जन-देवजनांच्या श्रेणी । अमर करील प्राशनें ॥

(सभा ४. १८४–८५)

' महाभारत अथांग सागर आहे. त्याचें मंथन मी माझ्या बुद्धिबळानें करून श्रोत्यांना सभापर्वांतील कथामृत वाढलें आहे. त्यांचें भाग्य थोर म्हणूनच त्यांना हा लाभ झाला. मात्र माझी वाणी त्या मोहिनी अवतारासारखीच आहे, ती दुर्जनांचें वंचन करून सज्जनांना अमृतपानानें अमर करील. '

तसेंच दुसरे ठिकाणीं तो म्हणतो—

' रसिक सज्जन हे राजहंसाचे थवे होत. त्यांचें भाग्य थोर म्हणूनच त्यांना मुक्तेश्वराच्या वचनरूपी शिंपल्यांतील गुणसुंदर अर्थ-मुक्ताफळें सेवतां येतात

मुक्तेश्वराचीं गुणसुढाळें । वचन-शुक्तिका-मुक्ताफळें ।
सज्जन-राजहंस-पाळें । भाग्यागळें सेविती ॥
(विराटपर्व-१-१२९)

असे धन्योद्गार स्वतः मुक्तेश्वरच आत्मविश्वासानें काढतो ते यथार्थ आहेत. त्रिवार यथार्थ आहेत !

अभ्यासाच्या वाटा

(१) मुक्तेश्वराचा काळ ठरवितांना कोणत्या गोष्टींचा आधार घेतां येतो ? त्यांवरून मुक्तेश्वराचा काळ कोणता ठरतो ?

(२) मुक्तेश्वराच्या अध्ययनाविषयीं तुम्हांस काय माहिती आहे ?

(३) मुक्तेश्वरानें कोणतीं काव्यें लिहिलीं ?

(४) मुक्तेश्वरी काव्य पंडितीवळणाचें होतें याला कोणतीं प्रमाणें आहेत ?

(५) "संतयुगांतील कवींत मुक्तेश्वर हा श्रेष्ठप्रतीचा कवि होता," हें विधान स्पष्ट करा.

(६) मुक्तेश्वराच्या काव्यांतील कांहीं विशेष गुण उदाहरणांसह लिहा.

(७) मुक्तेश्वराच्या काव्यांतील दोष त्याच्या गुणातिरेकानें उत्पन्न झाले आहेत असें कां म्हणतात ?

वामनपंडित : : : २

* ‘ सुश्लोक वामनाचा ’

मराठी कवितेंत रूढ असणाऱ्या चार पद्यप्रकारांवरून चार कवि ओळखले जातात. ओवी, अभंग, आर्या आणि श्लोक (म्हणजे संस्कृतांतील गणवृत्त) या पद्यप्रकारांमध्यें त्यांनीं आपलें काव्यसर्वस्व ओतलेलें आहे. त्यामुळें ‘ ती रचना म्हणजे त्यांच्यापैकीं अमक्याचीच ’ असा स्वामित्वाचा संबंध तेथें उत्पन्न झाला आहे. ओवी म्हटली कीं ती ज्ञानेश्वरांची, ‘ अभंग ना ? मग त्याचे स्वामी तुकाराममहाराजच ’ आणि ‘ ही काय आर्या ? मग तिचे प्रभु मोरोपंतच. ’ या रूढ झालेल्या मताप्रमाणें ‘ सुश्लोक-रचनेच्या प्रभुत्वाचा मान ज्या कवीकडे निर्विवादपणें जातो तो वामनपंडित होय. राम बडवे नांवाच्या एका रसिकानें खुद्द मोरोपंतांना लिहिलेल्या एका पत्रांत, सर्व महाराष्ट्राला त्या काळीं संमत झालेला, हा आपला अभिप्राय कळविला होता. राम बडवे लिहितात :—

सुश्लोक वामनाचा, अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची ।
ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूरपंताची ॥

दुसऱ्या कवींनीं श्लोक, अभंग, ओव्या आणि आर्या रचिल्या नाहींत असें थोडेंच आहे. पण आपल्या विपुल, सुंदर आणि उज्ज्वल रचनेनें ज्यांनीं जिला विशेष प्रसिद्धि आणि थोरवी मिळवून दिली ती रचना त्यांच्या नांवानेंच प्रामुख्यानें ओळखिली जावी हें साहजिकच आहे. अर्जुनाचें धनुष्य, भीमाची गदा, भार्गवरामाचा परशु आणि शंकराचा त्रिशूळ हीं शस्त्रास्त्रें

त्या त्या योद्ध्यांमुळेंच प्रथा पावलीं व त्यांच्या नांवावर मोडूं लागलीं !! तेंच कवींच्या शस्त्रांस्त्रांचें म्हणजे त्याच्या खास पद्यप्रकारांचें झालें असल्यास नवल नाहीं !

पंडिती काव्याचें एक प्रमुख लक्षण जी श्लोकरचना तिची सुरवात मुक्तेश्वरानें केली असली तरी ती त्याला नीट साधली नाहीं. तिला खरी नटविली वामनपंडितांनींच. तसेंच वामनस्वामी हे विद्वत्तेनें व वृत्तीनेंहि खरे पंडित होते. म्हणून पंडितकवि म्हटलें कीं ज्यांचें नांव प्रामुख्यानें नजरेसमोर उभें राहतें ते वामनपंडितच. वामनपंडितांना श्रीधरानें त्यांच्या श्लोकरचनेबद्दल दिलेलें पुढील प्रशस्तिपत्र पाहिलें म्हणजे त्यांच्या श्लोकरचनेविषयीं तत्कालीन मत काय होतें याची कल्पना येते :—

जैसा चंडांशु सतेज व्योमीं । तैसाचि केवळ वामनस्वामी ।
ज्याची श्लोकरचना ये भूमीं । भूमंडळावरी अपूर्व गा ॥

(रामविजय– १. ६४)

काव्य युगांमधील दुवा

वामनपंडितांची चरित्रविषयक माहिती व त्यांचा काल याबद्दल अद्यापि एकमत नाहीं. त्यांचा जन्म शके १५३० त व मृत्यु शके १६१७ मध्यें (म्हणजे वयाच्या ८७ व्या वर्षीं) मानला जातो. म्हणजे वामनपंडित मुक्तेश्वराचे समकालीन (मुक्तेश्वर शके १५३१–१५८२) पण त्यांच्यानंतर ३५ वर्षें हयात असलेले कवि ठरतात. वामनपंडितांची हयात (इ. स. १६०८ ते इ. स १६९५) शिवाजी महाराजांच्या बावीस वर्षें पूर्वीं व पंधरा वर्षें नंतर टिकलेली आहे ! ते तुकाराम-रामदासांचेहि समकालीन होते व श्रीधराला काव्यस्फूर्ति व्हावयास लागण्याचे सुमारास (शके १६१८ ते १६२४) त्यांनीं आपला काव्यप्रपंच आणि इहलोकींचा प्रपंचहि आवरला होता. याप्रमाणें वामनपंडित म्हणजे शिवपूर्व व शिवोत्तर काव्याचीं युगें सांधणारा दुवाच होय.

स्थलान्तर व भ्रमंती

वामनपंडित विजापुरकडील वसिष्ठगोत्री ऋग्वेदी ब्राह्मण. त्यांचें उपनांव शेषे. त्यांचा जन्म विजापूरप्रान्तीं, विद्याभ्यास काशीस व उत्तर आयुष्य महाराष्ट्रांत गेलें. त्यांच्या या स्थलान्तराचें कारण पुढीलप्रमाणें सांगतात. बालपणीं ते अतिबुद्धिमान् असल्यानें फारशी भाषा त्यांनीं सहज हस्तगत केली. विजापूरच्या आदिलशाहींत ही गोष्ट बादशहाच्या नजरेस आली व त्याच्या मनांत त्यांना बाटवून आपल्या धर्मांत घेण्याचें आलें. या धर्मान्तराच्या धाकानें त्यांनीं विजापूर सोडलें व भ्रमंतीस आरंभ केला. केवळ भिक्षेवर उदरनिर्वाह करून त्यांनीं काशीक्षेत्र गाठलें व तेथें संस्कृत शास्त्रांचा गाढ अभ्यास केला. पंडित म्हणून कीर्ति मिळविली व वादांत जय संपादिले. महाराष्ट्रांत जे ते परत आले ते उंटभर पोथ्या-पुस्तकांचा संभार बरोबर बागळणारे विद्याहंकारी प्रचंड पंडित म्हणूनच. (वामन पंडितांचें चरित्र राजाराम प्रासादी यानें आपल्या 'भक्त मंजिरी माला' अ. ३९–४१ मध्यें दिलें आहे. हा ग्रंथ शके १७५६ मध्यें लिहिला आहे.)

ब्रह्मज्ञानानें वृत्तींत पालट

संस्कृत विद्येच्या प्रखर अभिमानाबरोबर आचारांतील पक्का कर्मठपणाहि त्यांचेठायीं होता. ते आपली पत्नी गिराबाई इच्या हातचेंहि जेवीत नसत, स्वतःच स्वयंपाक करीत! आत्मसाक्षात्काराच्या तळमळीनें मनाच्या व्यग्र स्थितींत हिंडत असतां ते एकदां मलयाचलावर आले. तेथें त्यांना एका यतींचें दर्शन झालें. त्यांना वामन पंडित शरण गेले. पुढचा वृत्तान्त वामनपंडितच सांगतात :—

मस्तकीं ठेवोनि कर । सकळ उपनिषदांचें सार
पंचकोशीं करूनि निर्धार । केला ब्रह्मात्म विद्येचा ॥
क्षणामाजीं चराचर । मज वाटलें माझें शरीर ।

साकार तितुके निराकार । तेंचि समयीं ॥
जैसा उगवता दिनकर । कांहींच नुरे अंधकार
उपदेशाचा बडिवार । ऐसा देखिला ॥

यावर या सच्चिदानंदस्वामींनीं वामनपंडितास म्हटलें कीं :—

आम्हीच आत्मत्वें प्रगटलों । नाहीं बोलिलें तेंहि बोलिलों ।
नाशवंत अन्तर्यामीं आम्हींच उरलों । निषेधिला क्षर भाग
तुज विद्या भार्गवी वारुणी । उपदेशिली हे अन्तःकरणीं ।
दृढ धरूनि गोविंदचरणीं । प्रीति धरणें आत्मत्वें ॥

—'निगमसार'

याप्रमणें पंडितांस गुरूपदेश व आत्मसाक्षात्कार झाल्यावर त्यांच्या वृत्तींत पालट झाला. आतां केवळ परानुग्रहार्थ भक्ति, ज्ञान आणि वैराग्य यांचा उपदेश करण्यासाठीं ते मराठींत काव्यरचना करूं लागले. महाराष्ट्रांतील भक्तिसंप्रदायाचाहि त्यांचेवर परिणाम झाला. तुकाराम—रामदासांशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला होता अशा आख्यायिका आहेत. या सर्वांचा परिपाक असा झाला कीं, पंडितांनीं मराठींत आध्यात्मपर व भक्तियुक्त आख्यानपर अशी दोनीहि प्रकारची सुमारें चाळीस हजार कविता रचिली.

वामनपंडितांचें वेदान्तशास्त्रांतील गाढ ज्ञान, त्यांचें काव्यरचना-चातुर्य व या दोन्हीवर त्यांच्या भगवद्भक्तीचा कळस या त्यांच्या वैशिष्ट्याचें वर्णन महिपतीनें अगदीं बरोबर केलें आहे : —

वामनस्वामी चतुर पंडित । जो वेदान्तशास्त्रीं निपुण बहुत ।
त्याहीवरी प्रेमळ भक्त । कविता प्रख्यात जयाची ॥

(संतविजय—अ. १०)

अध्यात्मपर कविता

ज्ञानमार्गाच्या दृष्टीनें अद्वैत व उपासनेच्या दृष्टीनें सगुणभक्ति म्हणजे ज्ञानयुक्त सगुणभक्ति हा वामनपंडितांचा ठाम सिद्धान्त होता. या सिद्धान्ताची

प्रतीति त्यांना आली होती. हीच त्यांची मनोभूमिका त्यांच्या अध्यात्मपर व भक्तियुक्त आख्यानपर काव्यरचनेच्या बुडाशीं आहे. त्यांच्या अध्यात्मांत भक्ति व भक्तिपर आख्यानांतून आध्यात्मिक रूपकें येतात त्याचें हेंच कारण आहे.

म्हणोनि ' यथार्थदीपिका ' । नाम पावली हे टीका ।
कीं अद्वैत आणि भजावें एका । श्रीवत्साङ्का । जगद्गुरूतें ॥
(य. दी. ७–११६५)

तसेंच—

ऐसें ब्रह्म तेंचि सगुण । ऐसा ज्ञाननिष्ठ भक्त निपुण ।
भगवंत भागवत ऐशी खूण । जेथें वेगळी न सांपडे ॥
सगुण ब्रह्म चराचर । गीतेंत या ज्ञानाचा आदर ।
म्हणूनि धर्म्यपद वारंवार । या ब्रह्मज्ञानीं योजिलें ॥
(य. दी. १–१२६–१२७)

पंडितांचे अध्यात्मपर म्हणजे वेदान्तविषयक ग्रंथ व प्रकरणें पुढीलप्रमाणें आहेत. ' यथार्थदीपिका ' ही गीतेचा खरा अर्थ प्रगट करण्यासाठीं लिहिलेली टीका आहे. तिच्यामध्यें २२२२६ ओव्या आहेत. म्हणजे ९०३७ ओव्यांच्या ज्ञानेश्वरीपेक्षां ही टीका अडीच पटीनें मोठी आहे. पंडितांच्या या टीकेंत ज्ञानेश्वरीचें काव्य नसून तर्कनिष्ठ असें मुद्देसूद विवेचन आहे. संस्कृत न्यायसरणीला अनुसरून मराठींत लिहिलेलें तें एक खण्डनमण्डनपर भाष्यच आहे. ' निगमसार ' हा ग्रंथ ' शके पंधरा शतें पंचाण्णव । तैं ग्रंथ प्रगटला अभिनव । जो अनादि अनुभव । सकळ संतांचा ' (म्हणजे शके १५९५ त) लिहिला आहे असें खुद्द वामनपंडितच सांगतात. त्यांच्या कालाच्या निश्चितीला हाच कायतो एकटा भक्कम आधार आहे. चित्सुधा, प्रियसुधा, तत्त्वमाला, राजयोग, समश्लोकी, उपादान, प्रेमसरी, गीतार्णवसुधा, कर्मतत्त्व इत्यादि लहानमोठीं प्रकरणें पंडितांनीं लिहिलीं आहेत. ही व इतर आख्यानपर रचना ' नियमसारा ' नंतर केली असावी असें वाटतें. तसें

असल्यास, वयाच्या पासष्टाव्या वर्षानंतर आपला काव्यसंभार सत्याऐंशींव्या वर्षापर्यंत निर्माण करीत राहणारा हा परिणत-प्रज्ञ महाराष्ट्रीय पंडितकवि अलौकिकच समजला पाहिजे.

आख्यान-काव्यरचना

भारत, भागवत (दशम स्कंद) व रामायण हे मराठी आख्यान-काव्याचे ठरीव आधार आहेत. त्यांवरच वामनपंडितांची सारी आख्यान कविता आधारली आहे. मात्र ती सलग नसून वरील ग्रंथांतील निवडक व स्फुट प्रकरणांवर आहे. वामनपंडितांच्या चाळीस हजार कवितेपैकीं अर्ध्याहून अधिक वेदान्तपर असून उरलेली आख्यानपर आहे. रामजन्म, अहल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव आणि लोपामुद्रासंवाद हीं स्फुट प्रकरणें रामायणांतील; विराटपर्व, जयद्रथवध, भीष्मयुद्ध, भीष्मशरपंजर हीं भारतांतील (हीं आख्यानें याच वामनपंडितांचीं नसावीं असें हल्लीं मानण्यांत येतें.) व उरलेलीं सर्व भागवत पुराणांतील आहेत; व तींच त्यांतल्या त्यांत अधिक लोकप्रिय आहेत. कृष्ण हेंच वामनपंडितांचें खरें उपास्य दैवत. त्यामुळें त्याच्या चरित्रगायनांत ते अधिक तन्मय झाले हें ठीकच होय. वनसुधा, वेणुसुधा, रासक्रीडा, कात्यायनीव्रत, राधाविलास, राधाभुजंग, जलक्रीडा, नामसुधा, द्वारकाविजय, मृत्तिकाभक्षण, उखलबंधन, गोरसहरण इत्यादि प्रकरणें भागवतांतील आहेत. हींच त्यांचीं प्रकरणें त्यांच्या कीर्तीला मुख्यत्वें-करून कारण आहेत.

भाषान्तरित व संस्कृत कविता

वामन पंडितांची भाषान्तरात्मक अशीहि कविता आहे असा समज आज-पर्यंत रूढ होता. उदाहरणार्थ भर्तृहरीच्या नीति, वैराग्य व शृंगार या शतकांचीं मराठी भाषान्तरें, जगन्नाथकृत गंगालहरी, शंकराचार्यकृत अपरानुभूति, चतुःश्लोकी भागवत वगैरे. परंतु ही कविता वामनपंडितांची नसावी असें

मानण्याकडेच आधुनिक संशोधकांचा कल आहे. वामनपंडितांचीं ‘ सिद्धान्त विजय ’ व अनुभूतिलेश ’ हीं दोन अध्यात्मपर प्रकरणें संस्कृतांत लिहिलेलीं आहेत.

खरे वामन कोणते ?

वामनपंडितांची (म्हणजे वसिष्ठ गोत्री, शेषे उपनामक. आणि, ‘ यथार्थ-दीपिका ’ कार वामनाची) कविता म्हणून त्यांच्या ‘ कविता संग्रहा ’च्या तीन भागांत जी कविता छापली आहे ती सर्वच त्यांची नव्हे. खऱ्या वामन-पंडितांचे शिष्य म्हणा, भक्त म्हणा किंवा अनुकरण करणारे माना, आणखी कांहीं ‘ वामन ’ कवि होते. त्यांचीहि कविता केवळ ‘ वामन ’ या नामोल्लेखामुळें व श्लोकरचनेच्या सारखेपणामुळें खऱ्या वामनपंडितांचीच मानली जाऊं लागली. ते इतर वामन म्हणजे साम्राज्य वामन, शांडिल्य गोत्री नृसिंहसुत वामन, हरि वामन अथवा हरिदीक्षित, समर्थ शिष्य वामन वगैरे होत.

वामनपंडितांची समाधि

वामनपंडितांची कांहीं रचना। कोल्हापुरास श्री जगदंबा लक्ष्मीच्या देवालयांत झाल्याचें मानण्यांत येतें. ‘ नामसुधे ’च्या तिसऱ्या अध्यायांत (चरण ४ श्लोक ३२) ‘ समर्पिला श्रीहरिपादपद्मीं । पद्मालयेच्या अतिदिव्यसद्मीं ’ असा उल्लेख आहे. तसेंच राजारामप्रासादीनें ते करवीर येथें आल्याचें ४१ व्या अध्यायांत सांगितलें आहे.

> “ स्वेच्छाचारें भ्रमण करिती । दर्शनेंचि होय जना मुक्ती ।
> वामनस्वामी करविराप्रती । सहजस्थिति पैं आले ॥ ”

वामनपंडितांचें राहणें शिगांव–कोरेगांव (तालुका वाळवें, वारणा नदीच्या कांठीं) येथें असे. एकदां महाबळेश्वराकडे प्रवास करीत असतां पंडित हे गुऱ्हेघर येथें समाधिस्थ झाले. पण भोगांवच्या हद्दींत कृष्णेच्या कांठीं त्यांचें

दहन झालें. त्यामुळें त्यांच्याबरोबर असलेला त्यांचा शिष्य महादेव यानें तेथेंच त्यांची समाधि बांधली आणि शिगांव-कोरेगांव या त्यांच्या निवासस्थानीं त्यांच्या पादुका स्थापल्या व वर वृंदावन बांधलें. असा हा वामनपंडितांच्या दोन समाधींचा इतिहास आहे. (पहा. उपोद्घात—वामनपंडित कवितासंग्रह भाग २, दा. के. ओक)

प्राकृत नाखूष पण व्यास खूष !

वामनपंडितांची अध्यात्मपर कविता विपुल असून ती विद्वत्ता व आत्मप्रतीति यांनीं मंडित आहे. तथापि तिला लाभावी तितकी लोकप्रियता लाभलेली नाहीं. याचें कारण त्यांनीं ती केवळ विद्वानांसाठीं लिहिली. सोपेपणा, रसाळपणा आणि आकर्षकता हे गुण शास्त्रीय विषयांत आणल्यानें त्यांची शास्त्रीयता कमी होते असें त्यांस वाटलें असावें. शिवाय ते कोणत्याहि संप्रदायांत शिरले नाहींत व आपला असा संप्रदाय त्यांनीं वाढविला नाहीं. वृत्तीनेंहि ते निर्भीड व तुटक दिसतात. त्यांनीं ज्ञानेश्वरांसह इतर अनेक गीता-टीकाकारांच्या कृतींबद्दल नापसंती दाखविली आहे.

‘ तत्त्वता अर्थ ठायीं पडो न पडो । सर्वांस टीका आपली आवडो ।
हा भाव असे तरी झडो । जिव्हाचि हे ॥ ’

असा आपला बाणा सांगून ते इतर टीकांबद्दल म्हणतात—

‘ गीता जाते पश्चिमेकडे । टीका चढे पूर्व-दिशा-पर्वताकडे ।
दोहींस हात लावती बापुडे । अर्थ सांपडे केवीं तया । ’

कांहीं थोड्या विद्वानांस मात्र वामनी टीका पसंत होत्या असें मोरोपंतांच्या पुढील अभिप्रायांवरून दिसतें. ‘ वामनी टीका पाहून खुद्द व्याससुद्धां कौतुकानें मान डोलावतील.’ असें मोरोपंतांना वाटत होतें.

केली श्रीगीतेची व्याख्या, बहु भक्ति जींत गाजविली ।
साजविली साधुसभा, भाषाकविकवनशक्ति लाजविली ॥
रीति समश्लोकींची अतुला साधेल काय नव्यास ।
या सुयशें होइल कां रोमांच-व्याप्त-काय न व्यास ? ॥

पंडितांचे काव्यगुण

वामनपंडितांची लोकप्रियता त्यांच्या आख्यानकाव्यावरच मुख्यतः अवलंबून आहे. त्यांत भक्ति, वत्सल, शृंगार व हास्य या मृदु रसांचा सुंदर परिपोष, माधुर्यगुणाची प्रतीति व द्रुतविलंबित, शिखरिणी, स्वागता, उपजाति, शार्दूलविक्रीडित, मालिनी इत्यादि विविध संस्कृत गणवृत्तांतील (म्हणजे सुश्लोकांतील) डौलदार रचना ठायीं ठायीं आढळते. पंडितांची कल्पनाशक्ति मुक्तेश्वरासारखी अवखळ, धाडशी आणि पल्लेदार नाहीं. तथापि ती वास्तव व सूक्ष्मदर्शी असल्यानें एखादी व्यक्ति किंवा प्रसंग ते वाचकांच्या डोळ्यांपुढें हुबेहूब उभा करतात. यमक आणि अनुप्रास हे शब्दालंकार व उपमारूपकादि अर्थालंकार ते मोठ्या खुबीनें साधतात. ज्ञानयुक्त भक्ति ही त्यांच्या मनाची बैठकच असल्यानें आख्यानांतल्या प्रसंगांवर ते आध्यात्मिक रूपकें बसवितात. ही पद्धत पूर्वी एकनाथांनीं आपल्या ' रुक्मिणी स्वयंवर ' व ' भावार्थ रामायण ' या आख्यानकाव्यांत रूढ केली होती. पंडितांनीं भागवत व रामायण यांतील वेंचक व रसानुकूल स्फुट प्रसंग निवडून घेतले व त्यांवर आपली सर्व कलाकुसर, खाणींतून वेंचून घेतलेल्या हिऱ्यावर एखादा कारागीर पैलू पाडतो त्याप्रमाणें, मोठ्या मनोभावानें केली आहे. त्यामुळें त्यांचें प्रत्येक प्रकरण रसालंकारमंडित, हिऱ्यासारखें तेजस्वी, स्वतंत्र आणि सुटसुटीत काव्य झालें आहे. मुक्तेश्वर, श्रीधर किंवा मोरोपंत यांच्याप्रमाणें सलग आणि संपूर्ण रचना वामनपंडितांनीं कोठेंच केली नाहीं. त्यांचें लक्ष संपूर्ण कथेपेक्षां त्या कथेंतील शेलक्या प्रसंगांवरच अधिक लागून राहिलें होतें. त्यामुळें स्वभावपरिपोष, कथानकरचना, कथेचें अनुसंधान यांकडे त्यांना विशेष अवधान देण्याचें फारसें कारण नव्हतें.

सुंदर यमकानुप्रास

पंडितांची कला-कुसर आतां उदाहरणांसह पाहूं.

संस्कृत पंडितकवींनीं आपलें पांडित्य, कवित्व आणि दीर्घ व्यासंग यांनीं

संस्कृत श्लोकरचनेला जो डौल, जो. भारदस्तपणा, जें घोंटीव रूप आणि सौंदर्य आणलें त्या त्या सर्व गुणांचा साज मराठीवर चढविणें ही मराठी पंडित कवींची मुख्य कामगिरी होय. तिचा आरंभ मुक्तेश्वरी संक्षेपरामायणांत, पूर्ण विकास वामनी काव्यांत व विस्तार आणि परिणति सामराज, नागेश, विठ्ठल, रघुनाथपंडित व मोरोपंत या कवींच्या कृतींत झाली. मुक्तेश्वरानें सुरू केलेल्या यमकानुप्रासयुक्त रचनेंत रसवत्तेची आणि भाषासौष्ठवाची भर पंडितांनीं घातली व तिला खरें सौंदर्य आणलें.

‘ अळी ’ व ‘ ळी ’

एक किंवा अधिक वर्णांच्या वारंवार केलेल्या योजनेला अनुप्रास म्हणतात. वारंवार योजलेल्या या वर्णांना स्वतंत्र अर्थ नसतो. हे वर्ण बहुधा एक किंवा दोन असतात. पुढील श्लोकांत ‘ अळी ’ १३ वेळां व नुसता ‘ ळी ’ १५ वेळां पुन्हां पुन्हां योजलेला आहे. त्यामुळें एक मजेदार शब्दचमत्कृति उत्पन्न होते—

पाळीयुक्त तळीं, अशीं न सुतळीं, स्वर्गीं न वा भूतळीं
वायूंतें विमळीं जळीं, सकमळीं जीं पाळितीं शीतळीं ।
अन्तर्बाह्य अळी, महाशतदळी, भृंगावळी सांवळी
बिन्दू त्याच दळीं कसा डळमळी घे पैज मुक्ता—फळीं ॥

(वनसुधा ४—९)

श्रीकृष्ण आपल्या सौंगड्यांसह ज्या वनांत खेळण्यासाठीं गेले त्यांतील तळ्यांचें हें ‘ अळी ’ अनुप्रासयुक्त वर्णन आहे. ‘ त्या तळ्यांभोंवतीं कांठ किंवा पौळी (पाळी) बांधलेली होती. अशी सुंदर तळीं स्वर्ग, मृत्युलोक (भूतळीं) किंवा पाताळांत (सुतळीं) नव्हतीं. त्या तळ्याच्या स्वच्छ पाण्यांत (विमळीं जळीं) कमळें होतीं. त्यांतील शीतळाईमुळें तेथील वारा गार (आणि सुगंधितहि) होत असे. अनेक पाकळ्यांच्या कमळांच्या आंत व बाहेर अनेक काळे भ्रमर (गुंजारव करीत) होते. त्या कमळाच्या पाकळ्यांवर पाण्याचे थेंब पडून ते बिन्दू पाकळ्यावर इकडे तिकडे हलूं लागले कीं असें

वाटे कीं हे बिंदु मोत्यांशीं स्पर्धा करीत आहेत कीं काय? या श्लोकांत ' अळी ' किंवा ' ळी ' यांचा १३ व १५ वेळां उपयोग करतांना पंडितांनीं फारशी अर्थहानि केली नाहीं. तळ्यांचें वर्णन सुसूत्र आहे व शिवाय शेवटच्या ओळींत उत्प्रेक्षेची सूक्ष्म छटा उमटवून दिली आहे. ही त्यांची करामत. नाहींतर मुक्तेश्वर पहा. त्याच्या अनुप्रासयुक्त श्लोकांत ना अर्थसंगति आणि ना शुद्ध मराठी! मग अर्थचमत्कृति कोठची? आणि रसपरिपोष तरी कोठचा?

१७ वेळां ' टी '

तोच पंडितांचा पुढील सुप्रसिद्ध श्लोक वाचा—

वंशी नाद-नटी, तिला कटि-तटीं खोवूनि पोटीं पटीं
कक्षे वाम-पुटीं स्वशृंग निकटीं वेताटिही गोमटी।
जेवी नीरतटीं तरूतळवटीं, श्रीश्यामदेहीं उटी
दाटी व्योमघटीं सुरा, सुखलुटी घेती जटी धूर्जटी॥

(वनसुधा ४·२१)

यांत १७ वेळा ' टी ' वर्ण योजला असून अर्थाची फारशी ओढाताण नाहीं. शिवाय कृष्णमूर्तीची कल्पना डोळ्यांसमोर उभी राहते व ' अशा श्यामसुंदर कृष्णाला पहावयास आकाशांत देवांची आणि ऋषिमुनींची दाटी होते' या वर्णनानें तर भक्तिरसाची छटा निर्माण होते. असे अनुप्रास साधणें ही बोलून चालून प्रयत्नानें करावयाची थोडी कृत्रिम रचना आहे. त्या दृष्टीनेंच तिच्याकडे पहावयाचें. पंडितांनींहि असली रचना अगदीं तुरळकच केलेली आहे.

यमकावरील सुंदर यमकें!

आतां पंडितांच्या यमक-योजनेंतील चातुर्य पाहूं. अनुप्रासांत पुन्हा पुन्हा येणारे वर्ण फार तर एक-दोन असतात, ते अर्थाला धरून योजलेले नसतात व ते सर्व चरणांतून कोठेंहि व कितीहि वेळां येतात. पण यमकामध्यें आवृत्त

होणाऱ्या वर्णांना कांहीं अर्थ असावा लागतो व ते सार्थ वर्ण सारखेच असले तरी त्यांचा अर्थ मात्र भिन्न असावा लागतो. तसें नसेल तर चमत्कृति कशी वाटणार? पंडितांनीं ' यमका 'वरच योजलेलें सुंदर यमक त्यांच्यापुढील श्लोकांत पहा—

रामवृत्त रचिलें **यमकांनीं** । गाति त्यांस न पडे **यम कानीं** ।
भिन्न अर्थरचना **सम जावी** । काव्यरीति चतुरीं **समजावी** ॥
(भागवत-रामायण—२—३३)

हरिगुणीं ग्रथिल्या **यमकां पहा** । धरिल थोर भयें **यम काप हा** ।
हरिगुणांविण हो **यमकां करी** । तरि न दंड धरी **यम कां करीं** ॥
राम तुष्ट आशिया **यमकां हो** । आणखी नियम **संयम कां हो** ।
(भारतभाव—९६—९७)

वरील श्लोकांत आवृत्त होणारे वर्ण ' यमकांनीं ', ' समजावी ', **यम-कांपहा, यमका करी** आणि **यमका हो** हे आहेत. ते सार्थ आहेत. पण त्यांची सार्थता व भिन्नार्थताहि केवळ त्यांचा पदच्छेद केल्यानें समजते व फार मौज वाटते. रामकथा यमकांनीं (यमकें वापरून) रचिली. ती जे लोक गातील त्यांच्या कानीं यम पडणार नाहीं. (त्यांना मृत्यूचें भय ऐकूनहि ठाऊक होणार नाहीं.) दुसऱ्या चरणांत पंडितांनीं स्वतांच यमक साधतां साधतांच यमकाचें लक्षणहि दिलें आहे. ' यमकांत भिन्न अर्थाची रचना सारख्या वाटणाऱ्या (सम) वर्णांनीं व्यक्त व्हावी (जावी) हीच काव्य-रचनेची खरी खुबी आहे हें मार्मिकांनीं ओळखावें (समजावी). अर्थहानि होऊं न देतां (इतकेंच नव्हे तर मार्मिक अर्थ प्रगट करतां करतां) अशीं यमकें योजणें हें भाषाप्रभुत्वाचें व कल्पकतेचें लक्षण आहे.

रवि ' आणि ' चरवी '

यांना म्हणतात अन्त्य यमकें; कारण तीं दोन चरणांच्या शेवटीं साधलेलीं असतात. आतां एकाच चरणांत साधलेल्या यमकाचें उदाहरण दाखवितों. यशोदा दधिमंथन करीत आहे. ती आपली रवी (डेऱ्यांतील) दह्यांत

फिरवीत आहे. त्यावेळीं तिच्या हातांतील दागिन्यांवर सूर्यांचे किरण पडून ते चकाकत आहेत. तिचे हात जरी घुसळणामुळें हालत असले तरी ती स्थिरपणें मनामध्यें बालकृष्णाचे गुणगानांत दंग झाली आहे. हा सुंदर अर्थ यमकाचें बंधन पाळून पंडीत पुढीलप्रमाणें व्यक्त करतात—

फिरविते रविते दधिभीतरीं । मिरविते रवितेज नगांवरी ।
१ स्थिर होई स्वकरि ते करि चंचलता, मनीं । उपरमे परमेश्वरगायनीं ॥
(उखळबंधन—७)

आतां ' चरवीला ' हे वर्ण चारीहि चरणांचे शेवटीं अर्थभेदानें कसे आणले आहेत पहा—

वाइ ! म्या उगवतांच, रवीला । दाट घालुनि दही चरवीला ।
त्यांत गे फिरवितांच रवीला । सार काढुनि हरी चरवीला ॥ (उ. बं. ८)

यांत पहिल्या यमकांत रवीला = सूर्याला, दुसऱ्यांत चरवी = दहि घुसळण्याचें पात्र, तिसऱ्यांत रवी = मंथनाची काठी व चौथ्यांत चरवीला = खाऊं घातलें असे अर्थ आहेत. येथें यमक साधलें पण अर्थांची व भाषेचीहि ओढाताण झाली. ' सीतास्वयंवरां'त श्लोक ५९—६३ या पांचीहि श्लोकांत असें यमक पंडितांनीं साधलें आहे. त्यांत ' गजगती जगतीप्रति दाविते । वसुमती सुमती सुख भाविते । ' (श्लोक ५९) या यमकावर मुक्तेश्वराच्या अशाच यमकाची (गजगती जगतीवरि चामके । मलपती लपती पति सामुके । (अरण्यकाण्ड-२५) छाप पडलेली स्पष्ट दिसते; आणि दोघांवरहि रघुवंशांतील अकराव्या सर्गांत कालिदासानें द्रुतविलम्बित वृत्तांतच साधलेल्या यमकांची छाप पडलेली आहे. आणि ' स्वागता ' वृत्तांतील यमकांवर त्याच वृत्तांत माघानें (शिशु. ६. ६८) व श्रीहर्षानें (नै. ५. ३१) साधलेल्या यमकांची छाप आहे.

' यमक्या वामन ' व ' यमककार ' वामन

ओढाताणीची कांहीं स्थलें सोडून दिलीं तर अन्त्य यमक फार समर्पकपणें योजण्याची कला पंडितांनीं फारच मोठ्या प्रमाणांत हस्तगत केली व आपल्या सुश्लोकावर एक यमक-संस्कार कायम केला. मोरोपंतांनीं मोठ्या भक्तीनें पंडितांच्या या अनन्यसामान्य विशेषाचा सयमक आर्येतच उल्लेख केला आहे. ते ' वामनपंडित स्तुतीं'त (गीति ९) म्हणतात—

अन्यत्र नसे, कवनीं यावे रस सर्व, हा नियम कांहीं ।
केली, भाषाकवि जे, त्यांची तों गर्व-हानि यमकांहीं ॥

मराठी श्लोकरचनेला सुंदर यमकांचें लेणें कायमचें लेवविणाऱ्या वामन-पंडितांना ' यमककार ' वामन या उपपदानें गौरविलें पाहिजे व तसें पंतांनीं सूचितहि केलें आहे. पण ' यमक्या ' वामन हें तुच्छतादर्शक विशेषण वामन-पंडितांचेंच आहे असें कित्येकांस वाटतें तें चूक आहे. नीरस व सामान्य यमकें उठल्यासुटल्या वापरणाऱ्या आपल्या ' वामन ' नांवाच्या शिष्यास श्रीसमर्थांनीं विनोदानें लावलेलें हें विशेषण असलें पाहिजे हेंच अधिक संभवनीय दिसतें.

रसनिर्मितीची भूमिका

आतां कांहीं रसस्थळें पाहूं. सर्वसामान्य लोकांमध्यें परमेश्वराची भक्ति वाढवावयाची तर परमेश्वराचें किंवा भक्तीचें तात्त्विक, गहन व रूक्ष स्वरूप वर्णन करून काय उपयोग ? राम किंवा कृष्ण यांसारख्या ईश्वरी अवतारांचें, त्यांच्या कृतींचें, त्यांच्या पराक्रमांचें, त्यांच्या सुख-दुःखांचें आणि त्यांच्या अद्‌भुत लीलांचें वर्णन कवींनीं केलें तर वाचक त्यांत रमतात. संसारी वाचकांना परमेश्वरी अवतारांच्या मानव-सदृश संसारांतील गोडी कळूं शकते. वात्सल्य, शृंगार, विनोद इत्यादि भावना त्यांच्या परिचयाच्या असतात. त्याच भावना राम किंवा कृष्ण यांच्या अलौकिक लीलांच्या निमित्तानें वर्णिल्या कीं वाचकांना त्या गोड लागतात व ती गोडी चाखतां चाखतां परमेश्वराचें अगाध सामर्थ्य त्यांच्या प्रत्ययास येऊन त्यांच्या ठायीं भक्ति उत्पन्न होते. याच दृष्टीनें रामकृष्णांच्या कथांतील वात्सल्य, शृंगार, वीर, करुण, अद्‌भुत किंवा भयानक रसांकडे पहावें असा वामन पंडितांचा अभिप्राय आहे. ते म्हणतात–

जो नेणे विषयांविणें रुचि तया आम्हा–तुम्हा कारणें
केला गोपवधू–विलासरस हा विख्यात नारायणें ।

(रासक्रीडा–१८४)

म्हणजे ‘ ज्या तुम्हांआम्हांसारख्या सामान्य लोकांना संसारांतील विषयां-वाचून इतर गोष्टींत गोडी वाटत नाहीं त्यांच्यासाठीं श्रीकृष्णानें हा विलास केला. तुमच्या आमच्या सारख्यांना प्रिय वाटणाऱ्या विषयांच्या द्वारेंच आपलीं मनें त्यानें आपल्याकडे ओढून घेतलीं ’. यावरून वामनपंडितांची रसनिर्मितीची भूमिका लक्षांत येते. वत्सल, शृंगार, विनोद इत्यादि त्यांनीं निर्माण केलेल्या रसांचा उद्देश भक्ति व पर्यवसानहि भक्तींतच. भक्तीला पोषक अशीच त्यांनीं इतर रसांची निर्मिति केली.

मुलांना खेळविणारा संसारी कृष्ण

द्वारका विजयांत संसारी कृष्णाचें पुढील वर्णन पहा. आपल्या लहान मुलाची समजूत घालण्यासाठीं श्रीकृष्ण मुद्दाम बोबडें बोलतो आहे. मुलाला ऊंस, साखर, खोबरें वगैरे खाऊं देऊं करतो आहे, ‘ तुला मी गरुडावर बसवून उंच नेईन. मग तेथें तूं आपला पतंग (वावडी) उडीव ’ असें त्यास सांगत आहे. व त्या मुलाला विचारतो आहे कीं, ‘ तुझ्या आईपेक्षां मी तुला खरंच जास्त आवडतो ना, ? हें कृष्णाचें वात्सल्य त्याची पत्नी पहात उभी असून तिला धन्यता वाटत आहे असा हा गोड प्रसंग आहे.

मुद्दाम	बोबडी करूनि दाटुनिवाणी ।	
	बोलतो परम कौतुकवाणी ।	
	बाळ बोलती तसेंच हरी तो ।	
	बोलतो, गृहिणी–चित्त हारे तो ॥	
खंडीसाखर	‘ उंसाचि नाबदसाकल खोबलें ।	
	खजुल देइन गाय बलें बलें ।	गा
गरुडावर	बसुनिया मग तूं गलुलावली ।	
	मजपुलें उलवी बलि वावली ॥	वावडी
चारोळ्या	चालोलिया देइन गोल गोला ।	
	गालोंबिया देइन फालफालां ।	गोडांब्या. पुष्कळ
तुझ्या आईपेक्षां	मी ईहुनी आवलतों खलें कीं ’ ।	
	ऐसा हरी खेळवि लेंकरें कीं ॥	

(द्वारका–विजय–३–२०–२२)

यांतील भावना प्रत्येक संसारी गृहस्थाच्या नित्य परिचयाची आहे. यांत वात्सल्याच्या गडद रंगावर शृंगाराची नाजुक छटा आहे व या दोन्हीहि रसांची उठावणी भक्तीच्याच पार्श्वभूमीवर आहे.

कृष्णाच्या बाललीला

आतां वत्सल रसाचा दुसरा नमुना. यांत कृष्णच लहान असतांना कोणते खेळ कसे खेळत होता याचें वर्णन आहे. यांत वामनपंडितांनीं एक गोड कल्पना गोंविली आहे. बालकृष्ण खेळत असतां मत्स्य, कच्छ, वराह, नारसिंह, वामन, परशुराम, राम व कृष्ण या आंठ अवतारांतील कृतींचें अनुकरण करून दाखवीत असे. मासा किंवा कांसव या प्रमाणें तो पोटावर सरके; डुकरासारखी मुसंडी मारी, चिंध्याच्या हिरण्यकश्यपूचें पोट फाडी, वामनावतार दाखविण्यास गुडघ्यावर उभा राहून खुजा होई, काष्ठावर चिमकुल्या कुऱ्हाडीचा घाव घालून परशुराम अवतार दाखवी व शेवटीं रामानें केलेला शिवधनुष्यभंग व कृष्ण अवतारांतील मुरलीवादन इतक्या मौजेनें अभिनय करून दाखवी कीं रडणाऱ्या माणसालासुद्धां त्या मुलाच्या त्या लीला पाहून हंसें यावें. ‘ कपट चंचल चालत बोलतो। रडतियासहि हांसवि बोल तो। ’ राम व कृष्ण या अवतारांतील कृष्णाचा अभिनय किती सुंदरपणें वर्णिला आहे पहा :

धनु करुनि चुईचें चांगलें ठाण मांडी।
उजवा पाय **पुढिल** सरळ **जंघा**, वांकुडी **वाम** मांडी। डावी
कानापर्यंत **श्रवणवरि** करातें ने, **भवास्त्रासि** भंगी। शिव धनुष्याला
घडिभरि मुरली घे, ठाण मांडी **त्रिभंगी**॥ तीन ठिकाणीं वांकडें
(बालक्रीडा–६८)

येथें कांबस्याचें धनुष्य, त्याचा दोरा उजव्या हातानें कानापर्यंत ओढलेला, उजवी मांडी सरळ जमिनीवर पसरून, डावी मांडी मुडपून घेतलेली अशा पवित्र्यांत शिवधनुष्य मोडण्याचा कृष्णाचा अभिनय पंडितांनीं सूक्ष्मपणें

वर्णिला आहे, व लगेच अंग तीन ठिकाणीं वांकवून हातांत मुरली धरण्याचा अभिनय तितकाच मधुरपणें सूचित केला आहे. या वत्सलरसाचा भक्तीशीं स्नेह उघडच दिसत आहे.

स्वभावोक्तीची भर

वरील वत्सलरसांत स्वभावोक्तींची भर पडल्यानें त्यास विशेष उठाव आला आहे. बाल, स्त्री, पशु किंवा पक्षी यांच्या क्रियांचें व (उक्तीचें) यथायोग्य वर्णन केलें कीं तेथें हा 'स्वभावोक्ति' नांवाचा अलंकार होतो. येथें बालांच्या क्रीडेचें वर्णन आहे. मुलांच्या कृतींचें असेंच सुंदर वर्णन 'वन-सुधेंत' आहे. गवळ्यांचीं मुलें कृष्णासह वनांत जाऊन तेथें नाना प्रकारच्या क्रीडा करीत आहेत. त्यांपैकीं बगळा, मोर, हंस इत्यादि पक्ष्यांच्या चालींचें अनुकरण त्या मुलांनीं केलें असें जें वर्णन (विशेषतः 'बकध्यानमुद्रेचें') पंडितांनीं केलें आहे त्यामुळें स्वभावोक्ति उत्तम खुलते; व पंडितांच्या सूक्ष्म व वास्तवदर्शी कल्पनेचें सादर कौतुक वाटतें.

परोपरी खेळति जी ! वनांत । अर्पूनि चित्तें जगजीवनांत । कृष्णांत
धरूनिया मर्कटपुच्छ हातीं । तयांसवें वृक्षिं उडों पहाती ॥

मुखें वासुनी, लोचन भ्रूतटातें भुंवया उंच करून
उभारूनिया, वाकुल्या मर्कटातें ।
अहो ! दाविती, शब्द तैसे करीति ।
असे खेळती बाळ निःशंकरीति ॥

खगांचिया साउलिच्याच संगें
ते धांवती हास्यरस-प्रसंगें ।
हंसाचिया दाखविती गतीतें चालण्याची ढब
टाकोनिया मंद पदें किती ते ॥

वनीं देखती मेघनीळास मोर घनश्याम श्रीकृष्णाला
प्रमोदें करी नृत्यलीला समोर
तया सारिखे नाचती तोक सारे बालक
खुणावूनि अन्योन्य कीं 'तो कसारे' ॥
जसे दांभिक ध्यानमुद्रा धरीति
जना दाविती, ज्ञानही बोधरीति। उपदेशाचें द्वारें
तशी दाविती ते बकध्यानमुद्रा
गडी हांसविती कृपेच्या समुद्रा ॥ श्रीकृष्णाला

(वनसुधा—१-९२-२७)

या उताऱ्यांत वात्सल्य, भक्ति व हास्य या रसांचें मिश्रण, स्वभावोक्ति हा अर्थालंकार व यमक हा शब्दालंकार इतकी काव्यसामग्री एकत्र गुंफलेली आहे.

सत्यभामेचा फुलासाठीं रुसवा

स्त्रीच्या कृतीचें आणि उक्तीचें वास्तव वर्णन केल्यानें होणारा स्वभावोक्ति अलंकार व नाजुक शृंगार पुढील स्थळीं आढळतो. 'कृष्णानें रुक्मिणीला स्वर्गांतलें पारिजाताचें फूल दिलें, आपल्यास मात्र दिलें नाहीं' या कारणानें सत्यभामा रागावली. ही गोष्ट श्रीकृष्णास समजतांच तो तिची समजावणी करण्यासाठीं तिच्या मंदिरांत आला. जमिनीवर गडबडा लोळणाऱ्या सत्यभामेचें मस्तक आपल्या मांडीवर घेण्यासाठीं श्रीकृष्ण पुढें झाला. त्याबरोबर ती रागानें त्यास म्हणाली, 'तुमच्यासारखे लबाड तुम्हीच आहां. जिला फूल दिलेंत तिलाच तुमची मांडीहि द्या' असें म्हणून तिनें कृष्णाकडे कोपकटाक्ष फेंकले व कृष्णाची मांडी दूर ढकलली. भामेचा हा फणकारा पंडित पुढीलप्रमाणें वर्णितात.

जों नेत्र मोडुनि वदे, ढकलूनि मांडी
भोंवया फिरविणें भ्रूमंडळी भ्रमण, अंगुलिभंग मांडी। बोटें मोडणें

तों कृष्णजी करुनि हास्य म्हणे ‘ अहाहा–
वेडे अनर्थ इतुक्यास्तव कां महा हा ’ ॥

(भामाविलास–२५)

सवतीमत्सरानें व आपल्या अपमानें संतापलेल्या सत्यभामेच्या तोंडीं घातलेलें भाषण व तिची भुंवया फिरविणें व बोटें मोडणें ही कृति स्त्री-स्वभावाला अगदीं अनुरूप आहे. आणि ‘ हा वेडे ! येवढ्या लहान गोष्टीसाठींच कां तुझें हें एवढें मोठें अकांडतांडव ’ हें कृष्णाच्या तोंडचे शब्दहि अगदीं वास्तव वाटतात.

हुबेहुब शब्दचित्रें

व्यक्तींचीं हुबेहुब शब्दचित्रें थोडक्यांत रेखाटण्याचें पंडितांचें कौशल्य पहा. परशुरामाचें धनुष्य (शिवचाप) उचलणें व त्यास दोरी लावणें हा पण जिंकण्याला कोणीं क्षत्रिय पुढें येईना व सीतेच्या मनांत भरलेला राम तर मदनासारखा सुंदर पण फारच कोमल. तेव्हां अवजड धनुष्य तो कसा उचलणार अशी शंका सीतेच्या मनांत आली व असा पण लावल्याबद्दल ती आपल्या पित्याला ‘ अहह ! दारुण तात ! तुझा पण ’ असा बोल लावूं लागली. हें ध्यानीं घेऊन राम वीरश्रीनें उसळून उठला व ‘ तें क्षुद्र धनुष्य आपण उंसाच्या कांड्यासारखें मोडून टाकूं ’ या आविर्भावानें व आत्म-विश्वासानें तो पुढें आला. या वेळच्या रामाचें चित्र पहा—

छावा उठे दशरथ-प्रभु-दिग्गजाचा
घे चाप, इक्षुसम तें, पति भर्ग ज्याचा भार्गवरामाचें
शुंडा स्वबाहु उचलूनिच चालिला हो
सभाजन घेती समस्त नयनीं प्रभुचाचि लाहो ॥ लाभ

(सीतास्वयंवर – ३१)

येथील हत्तीच्या छाव्याचें रूपक फारच बहारीचें आहे व त्यामुळें त्या शब्दचित्राला खरा उठाव आला आहे.

दही घुसळणाऱ्या यशोदेचें पुढील अधिक रमणीय शब्दचित्र असें आहेः

	पृथु नितंब नितंबिनिचा वरी	सुंदर स्त्री—यशोदा
	कटितटीं कटिसूत्रचि सांवरी ।	कमरपट्टा
समुदाय	कनककंकणवृंदहि वाजती	
	मुखिं सुख-श्रम-बिंदु विराजती ॥	
कानांतील	श्रवणिंचे श्रवणीं नग हालती	
	गळति गुंफिलिया शिरिं मालती ।	मालतीचीं फुलें
	घुसळिता कुचकुंभहि कांपती	
	अमृतें ज्यांतिल घे कमलापती ॥	

(उखळ बंधन—५०६)

दही घुसळतांना होणारी शरीरावयवांची हालचाल, सोन्याच्या बांगड्यांचा आवाज, कानांतील भूषणांचें हातांच्या हालचालीबरोबर हालणें, मुखावर उभे राहिलेले घामाचे बिंदु (आणि हे मंथन-श्रम ती मोठ्या हौसेनें घेत होती म्हणून ते तिला सुखाचे वाटत होते ही तिची मानसिक अवस्था सुचविण्यास पंडित विसरत नाहींत!) आणि शेवटीं हालणाऱ्या तिच्या मस्तकावर गुंफलेल्या मालती-कुसुमांचें जमिनीवर गळून पडणें. या गोष्टी किती बरोबर वर्णिल्या आहेत! या वर्णनानें यशोदेचें चित्र डोळ्यांपुढें साक्षात् उभें राहतें. तिचें दूध श्रीकृष्णासारख्या अलौकिक बालासाठीं तिच्या ठायीं होतें व ती 'स्वसुत बाल्यचरित्र महोदधी स्मरत, गात सुखें मधि हो! दधी' म्हणजे दही घुसळतांना कृष्णाचें बाल्यचरित्र आठवून आठवून गात होती या पंडितांच्या दोन वाक्यांमुळें तिचें वात्सल्य व तिची बालकृष्णभक्ति आपल्या ध्यानीं येते; व यशोदेच्या अंतरंगाचें व बहिरंगाचें हें चित्र पुरें होऊन त्याचा ठसा वाचकांच्या चित्तावर कायमचा उमटतो.

भक्तीचे स्वतंत्र उल्लेख

आख्यानांतील प्रसंगांच्या आणि पात्रांच्या द्वारा भक्तीचा उठाव पंडित करतातच. पण त्यावरच न थांबतां तें स्वतंत्रपणें व स्वमुखानें भक्ति आळ-

दवितात. ‘भक्ति हा दहावा असा स्वतंत्र रस आहे’ असें नऊच रस मानणाऱ्या संस्कृतसाहित्यशास्त्रकारांना बजावून सांगतात.

नव रस कवि गाती हेंच वर्णूनि जाती
परि दशम रसाची वर्णिती ते न जाती। प्रकार
दशम रस अनन्य–प्रेमभक्तीस लोकीं। पहा
यदुपति हरि तो दे यादवां स्वाद लोकीं ॥ (कंसवध–१९)

श्रीकृष्णाचें केवळ नांव उच्चारल्यानें पापें जळतात व मोक्ष प्राप्त होतो (मुखीं नाम हातीं मोक्ष। हे तो साक्ष बहुतांची–तुकोबा) हें संतकवींचें सुलभ भक्तीचें गोड तत्त्व पंडितांनीं ‘नामसुधे’त अजामिळाच्या कथेच्या निमित्तानें मांडलें आहे. ‘नामसुधे’च्या प्रस्तावनेंत ते आपल्या जिव्हेला हरिनाम उच्चारण्याची कळवळीनें विनवणी करीत आहेत—

हरिपण हरिनामें धातुमूर्तीस आलें
हरिमय हरिनामें विश्व संतांसि झालें।
संसार भवभय हरिनामें साधकांचें पळालें
वद वद जिव्हे ! रामनामें रसाळें ॥
....
हरति सकळ दुःखां हीं सुखाचीं निधानें स्थानें
वद वद जिव्हे ! वासुदेवाभिधानें ॥ नामें
....
वद वद जिव्हे ! टाकुनी लौकिकोक्ती ॥ प्रपंचाचें बोलणें

(नामसुधा–१–३)

वरील श्लोकांतील ‘हरिनामें’ व ‘वद वद जिव्हे’ यांची वरचेवर पुनरुक्ति करून पंडित आपल्या मनांतील भक्तीचा जिव्हाळा किती परिणामकारक रीतीनें व्यक्त करीत आहेत तें पहाण्यासारखें आहे.

वेदान्तीं रूपकें

सगुण भक्तींत वामनपंडित रंगलेले असले तरी त्यांना आपल्या आवडत्या अध्यात्मशास्त्राचा विसर पडलेला नाहीं. राम किंवा कृष्ण यांच्या गोड कथा

गातां गातां हळूच ते वेदान्ताकडे वळतात व कथेंतील प्रसंगाची वेदान्त-तत्त्वांशीं सांगड रूपकांनीं घालून दाखवितात.

उदाहरणार्थ सीतास्वयंवराचा प्रसंग वर्णितांना ते आपल्याला सांगतात कीं राम-सीता-स्वयंयर हें जीवशिवाचें मीलन आहे; ब्रह्म आणि चित्-शक्तीचा संगम आहे; आणि मग सीतेला लग्नांत हळद लाविली व ती उष्टी हळद रामाकडे आणिली याचा आध्यात्मिक अर्थ असा स्पष्ट करतात कीं ही हळद म्हणजे 'सर्वात्मकता'. ती सीतेला व रामाला लावली म्हणजे त्या दोघांमध्यें भेद नाहीं, तीं दोघें (परमात्मा आणि चिरशांति, परमात्मा आणि जीवात्मा किंवा जगत्) एकच आहेत हें दाखविलें. रामानें धनुष्य मोडलें म्हणजे भवाचें (संसार दुःखरूपी) धनुष्य मोडलें (भग्न जो करि धनुष्य भवाचें). रामाला वाद्यें वाजवीत जनकानें आपल्या घरीं नेला म्हणजे विविध वेद-वचनांच्या घोषांत मूर्तिमान् ब्रह्माला जनकानें जाणलें. (वाजवीत विविधा निगमातें। घे नृप श्रुतिचिया उगमातें) विवाहप्रसंगीं ब्राह्मणांनीं राम आणि सीता यांच्यामध्यें प्रथम अंतरपाट धरला व मग तो काढून दोघांची दृष्टादृष्ट केली. याचा अर्थ या दोघांमध्यें अज्ञजनांच्या समजुतीप्रमाणें जो मायेचा पडदा होता तो काढून तीं दोघें एकच आहेत हें दाखविलें. (सीतास्वयंवर–८८)

मातीच मातीला कशी खाणार?

कृष्णाच्या खोडकरपणाबद्दल त्याला शिक्षा करण्यासाठीं यशोदा त्याला दाव्यानें उखळीला बांधूं लागली. पण घरचीं सर्व दावीं गांठविलीं तरी कृष्णाच्या कंबरेला तीं पुरेनात. दोन अंगळांनीं तीं कमी पडूं लागलीं. ही कथा वर्णून पंडित म्हणतात कीं,

न आदि, ना मध्य, ना अंत ज्याला
बांधे कसें कोण तथा अजाला। ज्याला जन्मच नाहीं

(उखळ बंधन–४८)

कृष्णानें एकदा माती खाल्ली. हें यशोदेला इतर मुलांकडून कळतांच ती त्याच्यावर रागावली. तेव्हां कृष्ण ' मी माती खाल्ली नाहीं ' म्हणाला. ' तर मग तोंड उघडून दाखीव ' असें यशोदेनें म्हणतांच त्यानें आपलें तोंड उघडलें. तों काय ? तिला त्याच्या तोंडांत सारें विश्व दिसलें !! या सुरस आख्यानांत कृष्ण जें खोटें बोलला तें वास्तविक खरेंच होतें असें पंडित आपल्याला वेदान्ताधारें पटवून देतात. ' सबंध विश्व मृत्तिकामय (जड) आहे. तें माझ्यामध्यें (माझ्या पोटांत) आगाऊच सामावलें आहे. असें असतां मी थोडी माती बाहेरून पोटांत घातली कीं नाहीं याला काय अर्थ आहे ? सर्वत्र मीच आहे व हें सर्व मृत्तिकामय आहे. तेव्हां माती मातीला कशी खाईल ? ' असा वेदान्ती युक्तिवाद कृष्णाच्या तोंडीं ते घालतात.

कीं मृत्तिका ही अवघीच, माते — आई
आधींच माझ्या उदरांत माते । — मावते
ते भक्षिली कां म्हणशील मातें — मला
नेणोनि ऐशा पुरुषोत्तमातें ॥

(मृत्तिकाभक्षण-१४)

कांहीं दोष

याप्रमाणें वामनपंडितांच्या काव्यगुणांचें विवेचन केल्यावर त्यांच्या कांहीं ठळक दोषांचाहि उल्लेख करणें आवश्यक आहे. ' रास-क्रीडा ', ' बाल-क्रीडा ', ' कात्यायनी व्रत ', 'राधाविलास', ' राधाभुजंग ' इत्यादि आख्यानांत गोपी व राधा यांची कृष्णावरील भक्ति वर्णन करण्यासाठीं जो शृंगारपर वर्णनाचा भाग त्यांनीं घातला आहे तो आक्षेपार्ह आहे. शृंगार हा भक्तीचा एक प्रकार आहे. पंडित या शृंगाराचा आध्यात्मिक अर्थहि विवरून सांगतात व कांहीं प्रौढ भाविकांना व वेदान्तपर अर्थावरच अधिक भर देऊं शकणाऱ्या थोड्या लोकांना त्यांत वावगें कांहीं वाटत नसेल हें सर्व खरें मानलें तरी साहित्यांत असलीं उत्तान शृंगारवर्णनें न येऊं देणेंच इष्ट आहे.

-या आख्यानांतील मूळ कल्पना व तिचा पंडितांनीं केलेला अतिरिक्त व भडक विस्तार, त्यांतील शारीरिकतेचा भाग आणि कामुक वर्णनें ठळक काव्य-दोषाच्या सदरांत पडतील यांत कसलाच संशय नाहीं.

या शिवाय कांहीं भाषादोष त्यांच्या काव्यांत प्रामुख्यानें आढळतात.

१. समासांत जरूर तेथें सन्धि न करणें ('आकाश अंत', स्व उदरांत तात आशेंत, कृपा अवलोकीं).

२. ऱ्हस्व-दीर्घाची कदर न करणें (जननि कृत कुचेष्टा, रितिनें, पशू-समाजीं, मायीक, रूचे).

३. अशुद्ध प्रयोगः तुवा हेतु केला स्वभर्ता मराया—भरतभाव ९, 'रडत रडत मूर्छेमाजि वृत्ती बुडाल्या.' भामाविलास—१३. बायकोमात्र = सर्व बायका या अर्थीं, जडैक्यता.

४. वृत्ताच्या सोईसाठीं शब्दांची वेडींवाकडीं रूपें करणें ('घाबीरल्या सुंदरीं', 'छिद्रें हीं बुझणें (बुजविणें ?) तुम्ही सकळिकीं' नौकाक्रीडा-८-९) मिथ्यत्व, नेदखें (न देखें या अर्थीं), ससरा (सासरा ऐवजीं).

५. पुनरुक्ति, पाल्हाळ, क्लिष्टपणा, व्यक्ति-वर्णनांत अवयवांचा क्रम न सांभाळणें, कमलापति, दानवारी इत्यादि कृष्णाच्या पर्यायशब्दांचा कोणत्याहि संदर्भांत सरसकट उपयोग करणें—थोडक्यांत बोलावयाचें तर रेखीवपणा, योजनाबद्धता, संयम इत्यादि गुणांचा अभाव, शिथिलता.

उपसंहार

वरीलसारखे दोष मध्यें मध्यें खटकत असले तरी एकंदरीनें पाहतां वामन-पंडितांची वाणी रसाळ, अन्तःकरण प्रेमळ, अवलोकन सूक्ष्म, कल्पकता चांगल्यापैकीं आणि विद्वत्ता व कवित्व यांचा संगम हृद्य होता असें कोणासहि वाटेल. पंडितांच्या विशिष्ट श्लोकरचनेची छाप अनेक कवींवर पडून तिचें तंतोतंत अनुकरणहि पुष्कळांनीं केलें. त्यामुळें पंडितांना मराठी

कविता व मराठी भाषेची घडण यांच्या ऐतिहासिक विकासक्रमांत एक मानाचें स्थान आहे हें निश्चित. वामनी श्लोक म्हटला कीं त्याची एक विशिष्ट माधुरी कानाला आणि मनाला प्रतीत होऊं लागते. व तो श्लोक गुणगुणावा असा आजच्याहि मराठी काव्यरसिकाला मोह पडतो. अडीचशें वर्षांपूर्वी श्रीधरालाहि तेंच वाटत होतें. हें त्याच्या 'संतमाळे'तील पुढील उद्गारांवरून स्पष्ट होईल—

श्लोकार्ध ज्याचा बहुगोड लागे
जो ऐकतां ध्यास मनास लागे ॥

अभ्यासाच्या वाटा

(१) वामनपंडितांचें पूर्वायुष्य भ्रमंतींत गेलें. कां? ते कोठें कोठें गेले? त्यांच्या वृत्तींत पालट होण्यास कोणतें कारण झालें?

(२) वामनपंडितांच्या कवितांचे कोणते विविध विषय होते?

(३) वामनपंडितांनीं आख्यानकविता लिहिल्या, त्यांना आधारभूत ग्रंथ कोणते? त्यांच्या आख्यानकवितांचीं नांवें द्या. आख्यानकवितांचे विषय निवडतांना पंडितांचा कोणता हेतु होता?

(४) 'वामन' या नांवानें अनेक कवींनीं कविता केल्या, हे वामन कोण कोण? यांपैकीं 'यमक्या' वामन कोण होता?

(५) वामनपंडितांच्या काव्यांत कोणते गुणदोष दिसून येतात?

(६) वामनपंडितांच्या अनुप्रासयुक्त अशा दोन तीन कविता लिहा.

(७) वामनपंडितांच्या वेदान्तीरूपकांपैकीं कांहींचें विवेचन करा.

* एकाच लहान काव्यामुळें मोठी कीर्ति !

नळराजाची कथा फार प्राचीन, अद्‌भुत आणि रम्य आहे. ती महाभारताच्या वनपर्वांत अध्याय ५०-७७ मध्यें सांगितलेली आहे. पण तेथेंहि ती एक फार जुनी कथा म्हणूनच सांगितली आहे. सबंध भारत किंवा त्याचीं कांहीं पर्वें ज्या ज्या विष्णुदासनामा, मुक्तेश्वर, मोरोपंत इत्यादि कवींनीं मराठींत काव्यरूपानें आणलीं त्यांनीं त्यांनीं वनपर्वांतील ही गोड कथा वर्णन केलीच आहे. मुक्तेश्वरी नलदमयन्ती उपाख्यान तर सरसच आहे. पण तें आहे ओव्यांत. आणि मोरोपंतांचें आहे आर्यांत. आणि या दोघांनींहि संस्कृत-मधील 'नैषधीयचरिता'सारख्या महाकाव्यरचनेचा साज त्यावर चढविलेला नाहीं. मूळ महाभारताला धरूनच त्यांनीं वर्णन केलें आहे. आणि तेंहि सबंध वनपर्वाची कथा सांगतां सांगतां त्यांतील एक भाग म्हणूनच. पण मुद्दाम हीच एक कथा स्वतंत्रपणें काव्यरचनेसाठीं निवडणारा, संस्कृत वृत्तें व संस्कृत महाकाव्याची सरणि मोठ्या डौलदारपणें आणि रसिकतेनें वापरणारा आणि 'नलदमयन्ती–स्वयंवर' या एकाच लहानशा काव्यानें चिरंतन कीर्ति मिळविणारा पहिला पंडित-कवि रघुनाथपंडितच.

'कथा बोलूं हे मधुर सुधा-धारा'

नळराजा मुळांत पुण्यश्लोक (पवित्र-कीर्तीचा), त्याची कथा विविध रसांनीं भरलेली, शिवाय रघुनाथपंडितांना तिच्याबद्दल विशेष भक्ति आणि त्यांतच पंडितांना आपल्या काव्यकौशल्याबद्दल व नव्या डौलदार रचनेबद्दल

वाटणारा आत्मविश्वास. त्यामुळें पहिल्या नमनांतच वाचकांना पंडित विनयानें पण त्यांच्या पसंतीच्या खात्रीनें विनंति करतात—

पुण्य–श्लोक–नृपाळींत पहिला होवोनि जो राहिला
शेष + अहि = सर्प जो राजा असतां समस्त महिला, विश्रान्ति शेषाहिला
उक्त – वचन व्यासोक्तें अवगाहिला बुधगणीं नाना गुणीं गायिला
तो नामें नळ तत्कथौघ लिहिला तो पाहिजे पाहिला ॥ १ ॥

‘ नळराजा पावनकीर्तीचा. राज-श्रेष्ठ. त्यानें आपल्या राजवटींत पृथ्वी सुखी केली. दुष्टांचें निर्दालन करून तिचा भार हलका केला. त्यामुळें डोक्यावर पृथ्वी धरणाऱ्या शेषसर्पाला–पृथ्वी हलकी झाल्यानें–विश्रान्ति मिळाली. व्यासांनीं याचें वर्णन केलें आहे. इतरहि पुष्कळ कवींनीं ही कथा सांगितली आहे; पण मी तीच कथा (आज नव्यानें) लिहिली आहे. कृपा करून ती वाचून पहावी.’ अशी विनंति करून नलकथेचें माधुर्य, तिची रसवत्ता व ती व्यक्त करण्याचें आपलें सामर्थ्य याची ग्वाही त्यांना पुढीलप्रमाणें देतात—

कथा बोलूं हे मधुर सुधाधारा । होय शृंगारा करुण रसा थारा॥

रसिकांचे प्रशंसोद्गार

रघुनाथ पंडितांना आपल्या काव्याबद्दल वाटणारा हा विश्वास सार्थ आहे. याचें प्रत्यन्तर प्राचीन आणि अर्वाचीन रसिकांच्या प्रशंसोद्गारांवरून येतें. वऱ्हाड प्रांतांत पेशवाई अखेर होऊन गेलेल्या देवनाथ महाराज या साधु-कवींनीं (इ. स. १७५४–१८२१) रघुनाथ पंडितांविषयीं पुढील उल्लेख एका पदांत मोठ्या आदरानें केलेला आहे. **‘ रघुनाथ पंडित राणा कवि थोर समर्थ । अद्भुत रस केला टीका नैषध ग्रंथ ’** । (पद्यांक २२२) अर्वाचीन रसिकांपैकीं परशरामपंत तात्या गोडबोले यांनीं आपल्या ‘नवनीता’च्या द्वारें पंडितांच्या काव्याची ओळख इ. स. १८५४ मध्यें मराठी वाचकांच्या आधुनिक पिढीला प्रथमच करून दिली. इतिहास संशोधक वि. का. राजवाडे

यांनीं रघुनाथपंडितांचीं आणखी दोन छोटीं काव्यें– ‘ रामदास-वर्णन ’ व ‘ गजेंन्द्रमोक्ष ’–१९०० सालीं उजेडांत आणलीं. ते तंजावर प्रान्तीं गेले असतां तिकडे तीं त्यांस मिळालीं. विशेषतः ‘ नल-दमयन्ती स्वयंवरां ’तील काव्यसंपदेचें कौतुक कै. भावे यांनीं आपल्या ‘ महाराष्ट्र सारस्वतां’त केलें आहे. या काव्याच्या स्वतंत्र आणि संशोधित आवृत्त्या प्रा. पारसनीस व प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं काढल्या असून त्यांतून या काव्याचें रसग्रहण केलें आहे. या काव्याची अवीट गोडी चाखून त्यांतील एक दोन चरण तरी गुणगुणणारे असंख्य मराठी रसिक आहेत. अशा तोलाचें हें काव्य आहे.

मतभेदांतील थोडें मतैक्य

पण खेदाची गोष्ट ही कीं, या अप्रतिम काव्याचे कर्ते रघुनाथपंडित हे कोण, त्यांचा जीवनवृत्तान्त काय वगैरे बाबतींत संशोधकांचें एकमत नाहीं. ‘ मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ’ अशी स्थिति आहे. यांत सर्वसंमत बाब आहे ती ही कीं, रघुनाथपंडित नांवाच्या एका शिवकालीन कवीनें हें काव्य रचिलें. तो चांगला संस्कृततज्ञ आहे. तो रामदासभक्त असून रामदासांना प्रत्यक्ष पाहून त्यानें त्यांचें वर्णन केलेलें दिसतें. त्याला फारशी भाषेचें ज्ञान चांगलें असून फिराद (फिर्याद), जासूद, बंक (पहारा), राजी, लगाम, हेजीब, विजार असे फारशी शब्द तो आपल्या काव्यांत वापरतो. त्याला राजदरबार व राजघराण्यांतील वागणूक माहीत आहे. व त्याची मराठी भाषा शिवकालीन आहे. दुसरें असें कीं त्याचें वास्तव्य तंजावर प्रांतांत झालेलें आहे. त्याचीं इतर दोन काव्यें तिकडेच उपलब्ध झालीं. नळदमयन्ती-स्वयंवरांतील (कारवारकडील प्रतींत असणाऱ्या) शेवटच्या श्लोकांत “ कथा ऐशी चंदावरकर रघूनाथांचि करी ” असा स्पष्ट उल्लेख आहे. शहाजीपासून मराठ्यांचा संबंध तंजावर प्रांताशीं होता. शिवाजीचा भाऊ व्यंकोजी हा तर तिकडेच असल्यानें महाराष्ट्रांतून अनेक शिपाई,

राजकारणी पुरुष, पंडित, कवी वगैरे मराठे लोकांचें दळणवळण त्या प्रांताशीं असे. त्या निमित्तानें अरणी येथें स्थायिक झालेल्या आनंदतनय अरणीकर या कवीच्या मुलाला रघुनाथ पंडितांची मुलगी दिलेली होती. त्यामुळें ते व्याही असून त्या दोघांनींहि एकमेकांचीं काव्यें पाहिलीं असावीं असें त्यांतील साम्यस्थलांवरुन दिसतें. आनंदतनयाचा निधनकाल शके १६४५ (इ. स. १७२३) असा 'भक्तिमंजिरीं'त दिला आहे. रघुनाथपंडितांच्या संबंधीं असलेल्या मतमतांतरांत वरील दोन गोष्टी सर्वसंमत आहेत.

सातांपैकीं हा रघुनाथपंडित कोणता ?

पण या वादांत मुख्य मतभेदाची गोष्ट म्हणजे रघुनाथपंडित या नांवानें शिवकालांत प्रसिद्ध असलेल्या अनेक रघुनाथपंडितांपैकीं 'नलदमयन्ती-स्वयंवरा'चा कर्ता रघुनाथपंडित हा नेमका कोणता ही आहे. या वादांतील पक्ष सांगण्यापूर्वीं एका निराळ्या मताचा, माहितीसाठीं, उल्लेख करतों. 'कथा ऐशी चंदावरकर रघूनाथचि करी' या मळकर्णेकर यांना कारवार येथें सांपडलेल्या प्रतींतील अखेरच्या चरणाच्या आधारानें एक उपपत्ति मांडण्यांत आली आहे. ती अशी कीं, रघुनाथपंडित चंदावरकर हा चंदी-चंदावराकडे राहणारा सारस्वत ब्राह्मण असावा. नलदमयन्ती आख्यानांत कांहीं कोंकणी शब्द आढळतात. (उदाहरणार्थ–वळी, पातेजूं, ओवरी, शेली वगैरे) त्यावरून हा रघुनाथ कारवार जिल्ह्यांतील चंदावरचाच रहाणारा होता असा ठाम सिद्धांत मांडण्यांत आला आहे. पण यांत 'चंदावरकर' या नांवाचाच आधार मुख्य असल्यानें व रघुनाथपंडिताच्या इतर बाबींचा विचार यांत साकल्यानें झाला नसल्यानें हें मत हल्लीं कमजोर मानलें जातें. शिवकालांत प्रसिद्ध असलेले कर्तबगार रघुनाथपंडित सात आहेत, ते असे– (१) रघुनाथ नारायण हणमंते, (२) रघुनाथ बल्लाळ कोरडे, (३) रघुनाथ पंडित–पंडितराव, (४) रघुनाथ भट उपाध्ये (न्यायशास्त्री), (५) रघुनाथ भट चाऊरकर, (६) रघुनाथ भट नवहस्त आणि (७)

रघुनाथ गणेश (प्रायश्चित्तकुतूहलादि ग्रंथ लिहिणारा). या सातांपैकीं तीन रघुनाथपंडितांकडे " नलदमयन्ती स्वयंवराचें " कर्तृत्व देण्याचे सोपपत्तिक प्रयत्न झाले आहेत. त्यांतील सिद्धांत पक्ष कोणता हें सांगणें भक्कम पुराव्याच्या अभावामुळें कठीण असल्यानें त्या तीन पक्षांचा थोडक्यांत परिचय तेवढा करून देतों—

रघुनाथपंडित म्हणजे पंडितरावच

प्रा. अ. का. प्रियोळकरांनीं आपल्या ' नलदमयन्ती-स्वयंवर 'च्या संशोधनपर प्रस्तावनेंत या काव्याचा कर्ता शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं ' पंडितराव ' पद धारण करणारा रघुनाथपंडित हा राजकारणी पुरुषच असला पाहिजे असा ठाम सिद्धान्त मांडला आहे. आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ त्यांनीं रघुनाथपंडित-पंडितराव, रघुनाथभट्ट उपाध्ये (न्यायशास्त्री) आणि रघुनाथभट चाऊरकर ही तीन नांवें एकाच रघुनाथपंडित–पंडितरावाचीं आहेत असें सिद्ध केलें आहे व इतर 'रघुनाथ' काव्यकर्ते नसल्याचीं कारणें दिलीं आहेत. प्रियोळकरांची उपपत्ति आज बरीचशी मान्य झालेली असली तरी तिच्यांतहि कांहीं कच्चे दुवे आहेतच. या तीन रघुनाथपंडितांचें ऐक्य दाखवतांना व इतर रघुनाथांना वगळतांना त्यांना कांहीं ठिकाणीं बरीच ओढाताण करावी लागली आहे व त्यामुळेंच पुढील दोन पक्ष पुढें आले आहेत. प्रियोळकरांच्या मताप्रमाणें रघुनाथपंडित–पंडितराव हा मुळचा तंजावरचा देशस्थ ब्राह्मण होता. त्याला शहाजीनें शिवाजीकडे पाठविलें होतें. यानें नलोपाख्यानाची रचना शिवाजीच्या निधनानंतर तंजावर प्रान्तीं परत गेल्यावर म्हणजे शके १६०७ ते १६१२ (म्हणजे इ. स. १६८५–१६९०) च्या दरम्यान केली असावी.

रघुनाथपंडित म्हणजे हणमंते

ज्या बखरींच्या आधारावर प्रा. प्रियोळकरांनीं आपला पक्ष उभा केला आहे त्या बखरीच विसंगत असल्यानें त्यांचें प्रामाण्य संशयास्पद आहे असें दाखवून प्रा. द. सी. पंगु यांनीं आपला पक्ष स्थापला आहे. (पहा—प्राचीन

मराठी कविपंचक–रघुनाथपंडित) त्यांच्या मतें ‘ राज्यव्यवहार ’ कोशकर्ता रघुनाथ नारायण हणमंते हाच नलोपाख्यानकार रघुनाथपंडित. शहाजी व व्यंकोजी राजांच्या कारकीर्दींत रघुनाथ नारायणाचें वास्तव्य, त्याला ‘ चंदा-तंजावरकर ’ असें नांव पडण्याइतपत, दीर्घकाल झालें होतें. हा समर्थभक्त होता. संस्कृत व फारशी-अरबी जाणत होता. राजदरबारीं तर गाजतच होता. ‘ राजव्यवहार ’ कोश यानेंच केला असून हाच नलोपाख्यानाचा कर्ता असें प्रसिद्ध इतिहास संशोधक द. वि. आपटे यांचेंहि मत आहे. व्यंकोजीशीं न पटल्यामुळें तो इ. स. १६७५ मध्यें शिवाजीकडे महाराष्ट्रांत आला होता.

रघुनाथपंडित म्हणजे ‘चाऊरकरच ’

" रघुनाथभट चाऊरकर याला प्रियोळकरांनीं ‘ चाऊरकर ’ म्हणजे तंजावरकर ’ या समीकरणानें पंडितरावांशीं एकरूप केलें; तर प्रा. पंगूंनीं त्याला ‘ रघुनाथपंडित चाऊरकर ’ हा देखील जयराम पिंड्यानें ‘ पंडितवरिष्ठ ’ अशा विशेषणानें भूषविला असला, तरी नलोपाख्यान कर्त्यांच्या इतर गुणांचा त्याच्या ठिकाणीं अभावच स्पष्ट दिसतो ’ असें म्हणून दूर सारलें. पण याच रघुनाथपंडित मनोहर चाऊंरकराचा (म्हणजे‘ चौल’कराचा) पक्ष श्री. य. ग. फफे व श्री. स. ल. कात्रे यांनीं पुरस्कारिला आहे. (पहा– ‘ महाराष्ट्र शारदा ’ मासिक, डिसेंबर १९३७ अंक. सह्याद्रि मार्च १९३८ आणि मे १९५१ अंक) रघुनाथभट हा अनेक ग्रंथांचा कर्ता आहे. त्याचें उपनांव मनोहर. तो कोंकणस्थ ब्राह्मण असून ‘ चंपावती ’चा म्हणजे कुलाबा जिल्ह्यांतील ‘ चौल ’ गांवचा राहणारा. तो वित्तार्जनासाठीं फिरत फिरत तंजावरास गेला होता. शहाजी राजाच्या दरबारांत आलेल्या कवींना समस्या घालण्यासाठीं याची योजना तंजावरांत झाली होती असें ‘ राधामाधव विलास चम्पू ’चा कर्ता जयराम पिंड्ये सांगतो. (तदनु चाऊरकरोपनामानः पण्डितवरिष्ठा रघुनाथभट्टाः स्पष्टतरमेवमुदीरयाञ्चक्रुः ।) ‘वैद्यविलास’ ह्या त्याच्या ग्रंथाचा रचनाकाल शके १६१९ (इ. स. १६९७) आहे.

म्हणजे तो शिवकालीन ठरतो व रामदासभक्ति, फारशी भाषेचें ज्ञान, राजदरबारची माहिती वगैरे गोष्टीहि रघुनाथ मनोहर पक्षास उपपन्न होतात.

या पक्षाचा मुख्य विशेष असा आहे कीं, यांत नलोपाख्यानकार रघुनाथाला आवश्यक असणारें पांडित्य व कवित्व यांचे दर्शक ग्रंथ त्यानें लिहिलेले आहेत. एकाद्याचें कवित्व सिद्ध करण्याला राजकारण-पटुत्वापेक्षां त्याची कवित्व विषयक किंवा काव्यशास्त्रविषयक पात्रताच सिद्ध होण्याजोगा पुरावा पाहिजे. तो मनोहरपक्षाला आहे. रघुनाथ मनोहरानें 'कविकौस्तुभ', 'छंदोरत्नावली' वृत्तसिद्धान्तमंजिरी (इचे शेवटीं 'रघुनाथपंडितकविविरचिता' असा स्पष्ट उल्लेख आहे.), 'नाडीज्ञानविधि' इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत. कविकौस्तुभांतील दोषप्रकरणांत त्यानें 'नैषधां'तील उदाहरण दिलें आहे व आपल्या नलोपाख्यानांत तरी तसले दोष टाळले आहेत. महाभारतांतील किंवा नैषधांतील नळामध्यें नसलेलें नाडिज्ञान त्यानें आपल्या नळाचे ठायीं कल्पिलें आहे. (नाडिज्ञान जयाचें सरोगबंधू चतुष्पद गगावे ॥ ८ ॥) याचें कारण मनोहरानें स्वतः 'नाडिज्ञान विधि' ग्रंथ लिहिला होता. तसेंच 'स्वनाम सांग' असा नळाला आग्रह करतांना दमयन्ती त्याला म्हणते 'या पाहते तुज **मनोहर** रूपधेया। श्लोक २२१. येथें 'मनोहर' हें विशेषण द्व्यर्थी असण्याचा संभव आहे. वरील कारणासाठीं रघुनाथ मनोहर पक्ष नुसता विचारार्हच नव्हे तर अधिक सयुक्तिक दिसतो.

नैषधाची टीका

रघुनाथपंडित कोण, कुठला आणि केव्हांचा याबद्दलच्या संशोधनाची मजल येथवरच आली आहे. तेवढ्यावरच समाधान मानून आपण या 'स्वयंवर' काव्याचें सौंदर्य निरखून पहाण्याच्या मार्गास लागावें हें बरें. 'नलदमयंती-स्वयंवर' काव्य फार लहान म्हणजे दोनशें चोपन्न श्लोकांचें आहे. नल व दमयंती यांना केवळ एकमेकांच्या रूपगुणांची कीर्ति ऐकून एकमेकांबद्दल उत्कट आकर्षण वाटूं लागलें येथपासून तों त्यांचा विवाह झाला

येथंपर्यंतची कथा या काव्यांत वर्णिली आहे. ही कथा महाभारताच्या पद्धतीनें न सांगतां कवीनें ती श्रीहर्षाच्या ‘नैषधीयचरित’ नांवाच्या बावीस सर्गांच्या संस्कृत महाकाव्याच्या वळणानें सांगितली आहे. प्रसंग, कल्पना, शब्दयोजन, अलंकार, हे सुद्धां ‘नैषधीयचरितां’तले आहेत. आणि हें ऋण कवीनें (किंवा कवीसाठीं दुसऱ्या कोणी तरी ?) पुढील श्लोकांत मान्य केलें आहे—

लोकीं सौरभकाव्यनाटककलालंकारचूडामणी
सर्वां नैषधविद्वदौषध असे विख्यात वाग्धोरणी ।
हे त्याचीच टिका, टिकोनि घटिका ऐकेल जो आदरें
बोले त्या रघुनाथपंडित कवी भेटे हरी सादरें ॥

जें संस्कृत काव्यनाटकादिकांतील कलासौंदर्याच्या दृष्टीनें अग्रगण्य म्हणून लोकांमध्यें प्रसिद्ध आहे, ज्यामध्यें वाणीचा ओघ आहे (वाग्धोरणी) व जें विद्वानांचें बलवर्धक रसायन (नैषधं विद्वदौषधम्) म्हणून ओळखलें जातें त्या श्रीहर्षाच्या ‘नैषध’ काव्याची ही टीका आहे. थोडा दम धरून जो वाचक हें काव्य नेटानें वाचील त्याला हरी भेटेल.

मराठेशाही पेहरावांतलें संक्षिप्त सौंदर्य

पण रघुनाथ पंडिताचें हें छोटें काव्य नैषधाची निव्वळ टीका नव्हे. नैषधांच्या चौदा सर्गांपर्यंतच्या, जवळजवळ दोन हजार श्लोकांत सांगितलेल्या, तपशिलवार आणि भरघोंस वर्णनाचा हा सरस, सुंदर व सोपा संक्षेप आहे. कवीनें त्यांत आपले असे नवे अलंकार, नव्या कल्पना व नवा साज मूळ संक्षेपावर घातला असून सबंध कथेवर मराठेशाही पेहराव चढविला आहे. त्यामुळें सदर काव्य म्हणजे विस्तीर्ण नैषधकथेचें ‘मराठेशाही पेहरावांतील संक्षिप्त-सौंदर्य’ असें म्हणावेसें वाटतें. नळाचे अंगावर मराठेशाही अंगरखा (डौर), मराठेशाही विजार व पायांत जोडा (उपानह) असल्याचें कवि सांगतो—

हंसास धरतांना नळानें

३९/३/५९

जोडा   टाकी उपानह, पदें अतिमंद ठेवी
झगा   केली विजार वरि डौरहि, मौन सेवी
सलकर्डी   हस्तीं करी वलय उंच, अशा उपार्यी
भूपें हळूच धरिला कलहंस पार्यी ॥ ४२ ॥

तसेंच नळाच्या बागेंतील कोंकणप्रांतींच्या फणसांचें वर्णन पहा—

गरे,   उपरि कंटक साचे, परंतु सांचे जयांत सुरसाचे   गोड रसाचे
घोंस तसे फणसांचे षण्मासांचे कितेक वरसाचे ॥ ३६ ॥

त्याप्रमाणें हेजीब, बंक, फिराद, फौज हे मराठेशाहींतील फारशी व मागें दिलेले कोंकणी शब्द वापरून कवीनें मराठेशाही वातावरण निर्माण केलें आहे. श्लोक ७० मधील गड घेण्याची कल्पनाहि अस्सल मराठेशाहींतील आहे. लग्नानंतर विडे वाटणें (वाटी बहु विडे । २५१) व घरभरणी नांवाचा विधि करणें (वधूवर मिरवोन, घरभरण केली । २२३) ह्या दोन महाराष्ट्रीय चालींचा उल्लेख कवीनें मोठ्या साक्षेपानें केलेला आढळतो. नल म्हणजे ' तृण ' विशेष असा श्लेष ' नैषधां 'त (१-३५) आला असला तरी नल आणि देवनळ (ज्याची लेखणी करतात तो बोरू) यांमधील श्लेषानें सूचित केलेलें विस्तृत साम्य खास मराठी लेखणीला धरून आहे. (मी जाण देवनळही स्वकरीं धराया । १२९)

नळानें हंसाला पकडलें

पंडितांनीं या काव्यांत वर्णिलेलें कथानक थोडक्यांत असें आहे. निषध देशाचा नल (नैषध) नांवाचा एक तरुण, सुंदर, पराक्रमी, उदार आणि सद्गुणी राजा होता. तो वीरसेन राजाचा पुत्र. नलराजा कलावान् अश्वविद्या जाणणारा आणि प्रजाप्रिय होता. त्याची किर्ती गंगेसारखी त्रिभुवनांत पसरली होती. त्याचवेळीं भीम नांवाचा राजा विदर्भ देशावर राज्य करीत होता. त्याला दमयंती (भैमी) नांवाची एक अत्यंत सुंदर, सद्गुणी व उपवर कन्या होती. एकदां भीमाच्या राजसभेंत निषधदेशचे पांचसात ब्राह्मण आले

व राजास आशीर्वाद देऊन, राजाच्या प्रश्नावरून, त्यांनीं आपल्या नलराजाची स्तुति केली. ती ऐकून पित्याजवळच असलेल्या दमयन्तीच्या मनांत नलाबद्दल उत्कट प्रेम उत्पन्न झालें. हें सर्व वर्तमान नलाच्या हेरांनीं नलास कळविलें व दमयन्तीच्या रूपगुणांची स्तुति त्याजजवळ केली. ती ऐकून नलहि दमयन्तीवर अनुरक्त झाला. त्याला तिचा विरह सोसेनासा झाला. त्यामुळें त्याचें मन कोणत्याहि सुखांत रमेना. 'विरंगुळा म्हणून वनविहाराला तरी जावें' असा विचार करून आपल्या श्यामकर्ण घोड्यावर बसून सैन्यासह तो एका उद्यानांत आला. त्या सुंदर उद्यानांतील तळ्यांचे कांठीं क्रीडेमुळें दमून निजलेला एक सोन्याचा हंस त्याला दिसला. केवळ जिज्ञासेनें त्यानें त्या हंसास हळूच पकडलें.

उपकाराची परतफेड

'आपल्यास हा राजा ठार मारणार' असें वाटून हंसानें प्रथम त्याची थोडी निर्भत्सना केली व शेवटीं आपली गृहस्थिति सांगून त्याची करुणा भाकली. कनवाळू नळाचें मन तीमुळें द्रवलें. आणि 'केवळ कुतूहल म्हणून मी तुला धरलें होतें. तूं खुशाल आपल्या घरीं जा' असें म्हणून नलानें त्यास सोडून दिलें. या उपकाराची परत फेड करण्यासाठीं हंस नळाला म्हणाला–'तूं विरही दिसतोस. तरी तुला सर्वथैव योग्य अशा दमयन्तीच्या मनांत तुजविषयीं प्रेम उत्पन्न करुन तिचा लाभ मी तुला करून देईन' असें म्हणून नळाच्या संमतीनें हंस दमयन्तीकडे कुंडिनपुराला गेला. तिची एकांतात गांठ घेऊन त्या चतुर हंसानें तिचें मन नळाबद्दल अधिकच अनुरक्त केलें. तिला आतां नळावांचून दुसरें कांहीं सुचेना. भीमराजानें तिची अवस्था जाणून तिचें स्वयंवर योजलें व नळासहित सर्व राज–पुत्रांना स्वयंवरासाठीं पाचारण केलें.

लग्नांत विघ्न

हें सर्व पृथ्वीवर चाललें असतांना तिकडे स्वर्गांत एक निराळीच घटना घडत होती. नारदाचे सांगण्यावरून इंद्र, यम, वरुण व अग्नि या देवांना

दमयन्तीचें अप्रतिम सौंदर्य व तिच्या लाभासाठीं उत्सुक झालेले पृथ्वीवरील सर्व राजपुत्र याविषयींची सर्व वार्ता कळली. आणि काय ? त्यांच्याहि मनांत दमयन्तीबद्दलची अभिलाषा उत्पन्न होऊन ते रथांतून पृथ्वीवर उतरले. कुंडिनपुराकडे जाणाऱ्या मार्गावर त्यांना नळराजा भेटला. तो स्वयंवराला चालला होता. त्याचा उदार स्वभाव जाणून इंद्रानें त्याजपाशीं अशी याचना केली कीं, "तूं दमयन्तीकडे जा आणि 'आम्हांपैकीं कोणासहि तिनें वरावें' अशी तिची मनवळवणी कर." तो उदार नळ, स्वार्थ सोडून देऊन, देवकार्य करण्यासाठीं देवांचा दूत म्हणून दमयन्तीकडे गुप्तरूपानें गेला व त्यानें देवांची इच्छा दमयन्तीला कळविली; आणि तिचें मन, अगदीं प्रामाणिकपणानें, देवांबद्दल अनुकूल करण्याचा कसोशीनें प्रयत्न केला, पण तिची नळावरील प्रीति रतिभरहि ढळली नाहीं. हें जाणून देवांनीं एक कपट केलें. स्वयंवरसभेंत इतर राजपुत्रांसमवेत नळ बसला होता. त्याचे शेजारीं हे चारहि देव नळाचेंच रूप धारण करून बसले. प्रथम दमयन्तीला हें कोडें उलगडेना. तिच्या लग्नांत हें एक भलतेंच विघ्न आयत्यावेळीं उत्पन्न झालें; पण बसलेल्या राजपुत्रांची ओळख करून देणाऱ्या शारदेनेंच 'हा नळरूपधारी' इन्द्र, हा यम, हा अग्नि, हा वरुण व शेवटचा मात्र हा खरा नळ' असा आपणच या कोड्याचा उलगडा केला. दमयन्तीनें देवांना पित्याप्रमाणें पूज्य मानून नमस्कार केला व नळाच्या गळ्यांत स्वयंवरमाळ घातली. या वधूवरांना आशीर्वाद देऊन देव स्वर्गीं गेले. पुढें लग्नाचा सोहाळा आटोपल्यावर नळ दमयन्तीसहवर्तमान आपल्या नगरास परतला.

चुना + हळद = तांबडा रंग !

स्वभावतःच रम्य आणि अद्भुत असलेल्या या कथेच्या वरील रूपरेषांमध्यें रघुनाथपंडितांनीं मोठ्या कौशल्यानें सुंदर रंगभरणी केली आहे; आणि तें सबंध चित्र अत्यंत आकर्षक बनविलें आहे. तीच रंगभरणी आतां आपल्यास पहावयाची. अर्थालंकारांतून व्यक्त होणारी कवीची कल्पनाशक्ति,

स्वभावचित्रण, भाषाप्रभुत्व आणि सर्वव्यापी रसात्मकता हे या रंगभरणीचे प्रमुख विशेष होत. पंडितांच्या कल्पनेची भरारी पहा. नळराजाची गोडकथा गुणज्ञ आणि रसिक दमयन्तीला फार आवडली. ती ऐकून दमयन्तीचें प्रेम नळावर जडलें. एवढा साधा अर्थ, श्लेषावर आधारलेल्या रूपकानें व त्या दोहोंनीं सूचित केलेल्या दृष्टान्तानें, पंडित कसा खुलवून मांडतात तो पहाः–

नलराज कथा सुधाचि साजे । दमयन्ती वरवर्णिनी विराजे ॥
मिळणी उभयासि होय जेथें । अधिकारी अधिकानुराग तेथें ॥२०॥

नलराजाची कथा म्हणजे अमृतच (सुधा) आणि दमयन्ती ही श्रेष्ठ (गुणज्ञ) स्त्री (वरवर्णिनी). या दोन गोष्टी जिथें एकत्र येतात (गुण व गुणज्ञ) तेथें त्यांच्यामध्यें उत्कट प्रेम (अधिक अनुराग) हें हटकून उत्पन्न व्हावयाचेंच. आतां श्लेषानें वरील गोष्टीचें किती सुंदर समर्थन होतें तें पहा. सुधा म्हणजे अमृत व चुना, वर्णिनी म्हणजे स्त्री व हळद आणि अनुराग म्हणजे प्रेम व तांबडेपणा. चुना व हळद यांचा मिलाफ (मिळणी) होतांच त्या मिश्रणांत तांबडेपणा हा उत्पन्न व्हावयाचाच. हें सौंदर्यस्थल पंडितांनीं स्वतंत्र निर्मिलें आहे.

कसाच्या दगडावर सुवर्णरेषा

चन्द्रावर डाग कां दिसतो ? याबद्दल कवींनीं अनेक कल्पना केल्या आहेत. पण नलाच्या घोड्याचें वर्णन करतांना पंडितांनीं केलेली कल्पना इतरांपेक्षां बरीच धाडसी दिसतेः—

जो अंबरीं उफळतां खुर लागलाहे । तो चन्द्रमा निज तनूवरि डाग लाहे ।
जो या यशास्तव कसें धवलत्व नेघे ? शृंगारिला हय तयावरि भूप वेंघे॥३२॥

नळाचा घोडा आकाशांत चौखूर उडाला. त्याची टाप चन्द्राला लागली म्हणून त्याच्यावर डाग पडला आणि हा मान त्याला मिळाला म्हणून तो धवल झाला ! ! आणखी एक सुंदर व अगदीं वास्तव उत्प्रेक्षा पहा.

सोन्याचा हंस मोठ्या वेगानें निळ्या आकाशांतून झेंपावत दमयन्तीकडे चालला होता. त्यावेळीं तो आकाशाच्या त्या निळ्या कसाच्या दगडावर ओढलेल्या सोन्याच्या रेषेप्रमाणें भासला.

नभा मानूनी निकष-पाषाणा । स्वर्ण-लेखा तें तेज मनीं आणा ।। ८७ ।।

मात्र ही कल्पना नैषधकाव्यांतली (सर्ग २-६९) आहे. तसेंच हंसानें आपल्या सोनेरी पंखांच्या तेजांत नळ लेखन-वाचन करतो असें जें दमयंतीस सांगितलें आहे तें पंडितांच्या कल्पकतेचें उत्तम निदर्शक आहे (श्लोक १२२).

एकांत लेखनहि वाचनहि करीतो । माझी तनु-द्युति समीप तदा धरीतो ।
या कारणें नळ मला बहु आत मानी । तो सांगतां निजमनोरथ होय कानीं ।।

कळीचा नारद

पात्रांच्या स्वभाव-दर्शनांतहि पंडितांनीं आपलें चातुर्य प्रगट केलें आहे. विशेषतः हंस, नळ, दमयंती, नारद व इंद्र या पात्रांचें स्वभाव स्पष्ट व उठावदार दिसतात. महाभारतांत किंवा 'नैषधीय चरितां'त यांपैकीं बहुतेकांचे स्वभाव प्रगट झालेले आहेत. तेच पंडितांनीं आपल्या या छोट्या काव्यांतसुद्धां चांगलेच कायम ठेविले असून कांहीं ठिकाणीं आपल्या पदरचीं भर त्यांत घातली आहे. नैषधीयचरितांत नारदमुनी मोठे उदार, गंभीर, प्रेमळ व गुणज्ञ दाखविले आहेत. पण पंडितांनीं त्यांना, आपल्या काळांत कीर्तनकारादि मंडळींमध्यें प्रचलित असलेल्या कल्पनेप्रमाणें, कळीचे नारद बनविलें आहे. त्यासाठीं इन्द्राच्या स्वभावालाहि थट्टेखोरपणाची थोडी जोड त्यांना द्यावी लागली ! थट्टामस्करी करणाऱ्या पंडितांच्या इंद्र-नारदांचा थोडा संवाद ऐका—इंद्र म्हणतो :—

कलह तुज मिळेना सारिखा काय जाला ।
म्हणुनि सुरमुनीन्द्रा फावलें यावयाला ? ।।१५७ ।।
ऋषिवर मग बोले ' आजि पाताळ लोकीं ' ।

कलह कराविला त्यां पाहतां भाळलोकीं ॥
सकळ भुजग जेणें झुंझले येकयेकीं ।
मजजवळि विचारूं न्यायही येक येकीं ॥ १५८ ॥

हंस पक्षी कां सुसंस्कृत मानव ?

'याचक' पाहिल्याबरोबर विरघळणारा उदार, प्रेमळ आणि सत्य-निष्ठ नळ, त्याच्या या भोळ्या व सरळ स्वभावाचा फायदा करून घेणारा धूर्त इंद्र, आणि एकनिष्ठ प्रेम करणारी, दृढ निश्चयी व चतुर दमयंती या तीन पात्रांचें चित्रण, श्रीहर्षाचा मागोवा घेत घेत, पंडितांनीं फार सुरेख केलें आहे. हंसांचे मातृप्रेम, प्रसंगीं निष्टुर व आर्जवी बोलण्याची वृत्ति, कृतज्ञता, सुसंस्कृतपणा व कमालीचें चातुर्य हे विशेष पंडितांनीं इतक्या विस्तारानें व रसाळपणें वर्णिले आहेत कीं 'हंस हें एक पांखरूं आहे' हें वाचक विसरूनच जातात. दमयंतीला चाळवून दूर नेण्यांत, तिचा स्त्री-स्वभाव जाणून सावध राहण्यांत आणि नलस्तुतीचा उपन्यास योग्य प्रसंगीं करण्यांत आपला हंस चतुर आणि सुसंस्कृत मानवच झाला आहे याची योग्य जाणीव पंडितांना आहे. ते म्हणतात–'हंसें तशी चतुर-संमत युक्ति केली' (१०७), 'चतुर नर यखादा बोलतो हंस तैसा'–(११३)

हुबेहुब शब्द-चित्रें

विशिष्ट स्थितींत व्यक्तींची स्थिति, कृति आणि उक्ति काय असूं शकते याची बरोबर कल्पना करून ती स्थिति, कृति, आणि उक्ति वास्तवतेनें वर्णन करतां येणें हें कवीच्या कल्पकतेचें एक गमक आहे. पंडितांनीं या तीनहि गोष्टी कशा वर्णिल्या आहेत त्या पहा. दमून झोंपलेल्या हंसांची स्थिति वर्णन कारणारें शब्द-चित्र—(श्लोक. ४२)

तेथील एक कलहंस तटीं निजेला । जो भागला जलविहार विशेष केला ।

पोटींच एक पद, लांबवितो दुजा तो । पक्षीं तनू लपवि, भूप तया पहातो ॥

नलानें हंसास धरलें असतां हंसाच्या धडपडीचें गति-चित्र—(४४)

कलकल कलहंसें फार केला सुटाया ॥
फडफड निजपक्षीं दाविलेंही उडाया ॥
मनगट — नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू
धरिल दृढ जया त्या काय सोडील पंचू ॥ — पंजा

नलाच्या विरहानें पीडित झालेली पण लज्जेमुळें आपली व्यथा सरळ शब्दांत न सांगूं शकणारी दमयंती कसें बोलते, तिच्या आईला आपल्या मुलीचा गूढ अभिप्राय कसा कळतो, व आपल्या पतीस ती काय सांगते याबद्दलच्या त्यांच्या पुढील उक्ति पहा-(१५०-१५१)

ते शीतलोपचारीं जागी जाली हळूच मग बोले ।
'औषध न लगे मजला,' परिसुनि जननी 'बरें' म्हणूनि डोले ॥
'मूलि उपवर हे जाहली यियेला ।
पाहिजे कीं वर योग्य पाहिजेला' ॥
पत्नीच्या — ऐसें ऐकोनी वधूचिया बोला
सैंवराचा मग यत्न नृपें केला ॥

वरील सर्व प्रसंग पंडितांनीं थोडक्यांत पण फार सूचक पद्धतीनें वर्णिला असून त्याची योग्य कल्पना दमयंती व तिची आई यांच्या केवळ उक्तींनींच येते. 'मला नको औषध' असें म्हणतां म्हणतांच 'मला नल हेंच औषध पाहिजे' असें दमयन्ती म्हणते. ही श्लेषमय शब्दयोजना तरुणींच्या लज्जायुक्त वृत्तीला धरूनच आहे. आणि आईला मुलीचा अभिप्राय समजला असूनहि तो ती आपल्या पतीस सांगत नाहीं. 'आतां मुलीच्या लग्नाचा विचार केला पाहिजे' असें मोघम बोलते हेंहि चतुर आणि पोक्त स्त्रीच्या तोंडीं साजणारेंच वाक्य आहे.

कलह कराविला ज्यां पाहतां भाळलोकीं ॥
सकळ भुजग जेणें झुंझले येकयेकीं ।
मजजवळि विचारूं न्यायही येक येकीं ॥ १५८ ॥

हंस पक्षी कां सुसंस्कृत मानव ?

' याचक ' पाहिल्याबरोबर विरघळणारा उदार, प्रेमळ आणि सत्य-निष्ठ नळ, त्याच्या या भोळ्या व सरळ स्वभावाचा फायदा करून घेणारा धूर्त इंद्र, आणि एकनिष्ठ प्रेम करणारी, दृढ निश्चयी व चतुर दमयंती या तीन पात्रांचें चित्रण, श्रीहर्षाचा मागोवा घेत घेत, पंडितांनीं फार सुरेख केलें आहे. हंसांचे मातृप्रेम, प्रसंगीं निष्ठुर व आर्जवी बोलण्याची वृत्ति, कृतज्ञता, सुसंस्कृतपणा व कमालीचें चातुर्य हे विशेष पंडितांनीं इतक्या विस्तारानें व रसाळपणें वर्णिले आहेत कीं ' हंस हें एक पांखरूं आहे ' हें वाचक विसरूनच जातात. दमयंतीला चाळवून दूर नेण्यांत, तिचा स्त्री-स्वभाव जाणून सावध राहण्यांत आणि नलस्तुतीचा उपन्यास योग्य प्रसंगीं करण्यांत आपला हंस चतुर आणि सुसंस्कृत मानवच झाला आहे याची योग्य जाणीव पंडितांना आहे. ते म्हणतात–' हंसें तशी चतुर-संमत युक्ति केली ' (१०७), ' चतुर नर यथादा बोलतो हंस तैसा '–(११३)

हुबेहुब शब्द-चित्रें

विशिष्ट स्थितींत व्यक्तींची स्थिति, कृति आणि उक्ति काय असूं शकते याची बरोबर कल्पना करून ती स्थिति, कृति, आणि उक्ति वास्तवतेनें वर्णन करतां येणें हें कवीच्या कल्पकतेचें एक गमक आहे. पंडितांनीं या तीनहि गोष्टी कशा वर्णिल्या आहेत त्या पहा. दमून झोंपलेल्या हंसांची स्थिति वर्णन कारणारें शब्द-चित्र—(श्लोक. ४२)

तेथील एक कलहंस तटीं निजेला । जो भागला जलविहार विशेष केला ।

पोटींच एक पद, लांबवितो दुजा तो । पक्षीं तनू लपवि, भूप तया पहातो ॥

नलानें हंसास धरलें असतां हंसाच्या धडपडीचें गति–चित्र—(४४)

कलकल कलहंसें फार केला सुटाया ॥
फडफड निजपक्षीं दाविलेंही उडाया ॥
मनगट नृपतिस मणिबंधीं टोंचिता होय चंचू
धरिल दृढ जया त्या काय सोडील पंचू ॥ पंजा

नलाच्या विरहानें पीडित झालेली पण लज्जेमुळें आपली व्यथा सरळ शब्दांत न सांगूं शकणारी दमयंती कसें बोलते, तिच्या आईला आपल्या मुलीचा गूढ अभिप्राय कसा कळतो, व आपल्या पतीस ती काय सांगते याबद्दलच्या त्यांच्या पुढील उक्ति पहा–(१५०–१५१)

ते शीतलोपचारीं जागी जाली हळूच मग बोले ।
'औषध न लगे मजला,' परिसुनि जननी 'बरें' म्हणूनि डोले ॥
'मूलि उपवर हे जाहली यियेला ।
पाहिजे कीं वर योग्य पाहिजेला' ॥
पत्नीच्या ऐसें ऐकोनी वधूचिया बोला
सैंवराचा मग यत्न नृपें केला ॥

वरील सर्व प्रसंग पंडितांनीं थोडक्यांत पण फार सूचक पद्धतीनें वर्णिला असून त्याची योग्य कल्पना दमयंती व तिची आई यांच्या केवळ उक्तींनींच येते. 'मला नको औषध' असें म्हणतां म्हणतांच 'मला नल हेंच औषध पाहिजे' असें दमयन्ती म्हणते. ही श्लेषमय शब्दयोजना तरुणींच्या लज्जायुक्त वृत्तीला धरूनच आहे. आणि आईला मुलीचा अभिप्राय समजला असूनहि तो ती आपल्या पतीस सांगत नाहीं. 'आतां मुलीच्या लग्नाचा विचार केला पाहिजे' असें मोघम बोलते हेंहि चतुर आणि पोक्त स्त्रीच्या तोंडीं साजणारेंच वाक्य आहे.

संस्कृत-मराठीची सुन्दर सांध-जोड

पंडितांनीं आपल्या प्रौढ भाषाशैलींत संस्कृत व मराठी या दोन भाषांची बेमालूम सांध-जोड केली आहे. खालील दोन श्लोक (९९ व १५६) या दृष्टीनें पहाण्याजोगे आहेत—

हे मंद मंद पद सुंदर कुंददन्ती । चाले जसा मद धुरंधर इन्द्रदन्ती । हत्ती
हंसा धरूं जवळि जाय कृशोदरी ते । निष्कंपकंकणकरासि पुढें करीते ॥
देवेन्द्र देवऋषिला, मग बोलताहे । मंदार आजि फळला अथवा लता हे ।
माझ्या विलोचनसहस्रदळावलीला । देते विकास तव दर्शनसूर्यलीला ॥

वरील श्लोकांत नुसत्या शब्दांचीच सांध-जोड नसून संस्कृत अनुप्रास-यमकांची व संस्कृत विचार पद्धतीचीहि मराठीशीं 'मिळणी' केलेली आहे. 'तुमचें दर्शन सूर्य (सूर्यकिरणां) सारखें आहे. त्यायोगें माझे हजार डोळे विकसित झाले' ही विचाराची आलंकारिक मांडणी संस्कृतांतील आहे. अर्थहानि होऊं न देतां, अनेक संस्कृत वृत्तांतून, सुंदर अनुप्रास, पंडित योजतात. अशीं स्थळें सुमारें पंचवीस भरतील. त्यांपैकीं दोन तीनच येथें दाखवितों.

पुढील श्लोकांत (४९) नऊदां 'ता' वर्ण योजला आहे—

म्हातारी उडता नयेचि तिजला माता मदीया तशी ।
कान्ता काय वदो नव प्रसव ते सातां दिसांची अशी ॥
त्राता त्या उभयांस मी मज विधी घातास योजीतसे ।
हातामाजि नृपा तुझ्या गवसलों आतां करावें कसें ? ॥

यांतील गंमत अशी आहे कीं 'ता' हें अक्षर प्रत्येक चरणांत दुसरें व चौदावें आहे ! ! पुढील श्लोकांत (६) 'आजी' हे वर्ण प्रत्येक चरणांत नेमके पहिले–दुसरे व तेरावे–चौदावे आहेत—

वाजीचे मन जाणता सकळही राजी शिपायी जया ।
याजी होउनि जो द्विजांसि म्हणतो याजी धनें व्यावया ॥
त्याजी जो धनदापरी सुकृत जें त्या जीत्र ऐसें गणी ।
गाजी तो नळभूप रूप धरुनी गाजी गुणांच्या गणीं ॥

हीच वर्णव्यवस्था १६ व्या श्लोकांत असून १७ व्यांत पंडितांनीं 'अरसा' किंवा 'आरसा' हे तीन वर्ण एकाच चरणांत ४, ५, ६; १०, ११, १२ व १७, १८, १९ या क्रमानें योजले आहेत. 'ज्ञाता जो रससावलाच सरसामाझारि शृंगारसा। शोभे तामरसाक्ष तो नळ रसानाथ स्तवूं फारसा ॥ प्रसंगविशेषीं पंडितांची मराठी भाषा साधी, सोपी व पात्रानुरूप असते. पहा. श्लोक–(१०९–११६, १५१)

शृंगार व करुण

रघुनाथपंडित हे संस्कृत कवींप्रमाणें कलाप्रेमी कवि आहेत. मुक्तेश्वर किंवा वामनपंडित यांच्याप्रमाणें त्यांच्यावर संतकाव्याची छाप नाहीं. त्यामुळें ज्याला मराठींतील 'भक्तिरस' म्हणतात तो रघुनाथपंडितांच्या या काव्यांत नाहीं. 'होय शृंगारा करुणरसा थारा' या त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें या काव्यांत हेच दोन रस मुख्य आहेत. नल व दमयन्ती यांना परस्परांचें आकर्षण वाटूं लागल्यापासून त्यांचा विवाह होईपर्यंत त्यांच्या ज्या ज्या भावना, विचार, कृति, उक्ति या काव्यांत वर्णिल्या आहेत त्यांमध्यें शृंगार-रस आहे. लग्नापूर्वीं एकमेकांपासून दूर असतांनाच या गोष्टी झालेल्या असल्यानें या शृंगाराला विप्रलम्भ (वियोगावस्थेंतील) शृंगार म्हटलें पाहिजे. श्लोक ७४ ते ८४ मध्यें विरही नलाचे जे उद्गार आहेत ते या शृंगाराचें उत्तम उदाहरण असून पुढील श्लोकांत (७८ व ७९) तो फार उत्कटतेनें प्रगट झाला आहे. नळाला जिकडे तिकडे दमयन्तीच दिसूं लागते. तिच्या अवयवांचा सारखेपणा कमल किंवा चन्द्र यांमध्यें त्याला दिसतो व त्याला अशी भ्रांति होते कीं, 'हे दमयन्तीचे डोळे आणि कपाळ आहे' आणि ही भ्रांति खरी मानून तो त्या डोळ्यांत काजळ व त्या कपाळावर कुंकू लावूं पहातो ! !

भृंगें विराजित नवीं अरविंद पत्रें । कमळाच्या पांकळ्या
पाहूनि मानुनि तुझींच विशाल नेत्रें ॥

काजळ घालीन अंजन अशा मतिनें तटाकीं । तळ्यात
कान्ते ! वृथा उतरलों भिजलों विलोकीं ॥
कान्ते विलोकुनि सुधाकर अष्टमीचा । चंद्र
कपाळ म्यां मानिला निटिलदेश तुझाच साचा ॥
करंड्यांत शंखद्वयीं धरुनि कुंकुम कीरवाणी । खरोखर
लावावया तिलक लांबविला स्वपाणी ॥ हात

वरील दोन्हीहि ठिकाणीं ‘ भ्रान्तिमान् ’ अलंकार असून त्यामुळेंच येथील विप्रलंभ शृंगार उत्कट आणि सुंदर झाला आहे. असाच शृंगार दमयन्तीच्या विरहवर्णनांत आहे. या शृंगारांत करुणाची किंचित् छटा असते. पण खरा करुण रस नलानें पकडलेल्या हंसाच्या आर्त उद्गारांतच आहे.

आईची आठवण

नळानें हंसाला पकडतांच त्याचे सोबती त्याला टाकून पळून गेले. बरोबरच आहे ‘कठिण समय येतां कोण कामास येतो’ ? येथून या रसाला आरंभ झाला असून त्याचा शेवट मातेच्या आणि कान्तेच्या भावी शोकाच्या वर्णनांत आहे. आपण मेल्यावर आपले सोबती आपल्या घरीं जाऊन हा वृत्तान्त सांगतील व मग काय प्रकार होईल याचें कल्पना-चित्र हंस क्राढीत आहे—(५१–५२)

सखे माझे परतोनि घरा जातां । तुवा सजणे हा समाचार घेतां
तया शोकें घायाळ हृदय होतां । कशी होशिल तें आठवितों आतां ॥
थोर होतील बाळ तुझे बाळे । तुला कामा येतील वेल्हाळे ।
माय माझी बैसेल शोकशाळे । मला आळवितां हृदय तिचें पोळे ॥

नळाच्या गुणवर्णनांत (१-१८) भक्तीची, कुंडिनपुराच्या आणि दमयन्ती-मंदिराच्या वर्णनांत उदात्त अद्भुताची आणि इन्द्र-नारदसंवादांत हास्याची किंचित् छटा आढळते. वरील त्रोटक उदाहरणांवरून या काव्याच्या सौंदर्याची कल्पना येईल.

उमेदवारींतलीं दोन काव्यें

'नलदमयन्ती–स्वयंवर' हें उत्तम काव्य रचण्यापूर्वी, लेखनाची पूर्वतयारी म्हणून 'रामदास–वर्णन' व 'गजेंद्र–मोक्ष' हीं दोन छोटीं प्रकरणें पंडितांनीं लिहिलेलीं दिसतात. सरस्वतीच्या मंदिरांतील ही पंडितांची उमेदवारी आहे असें वाटतें. 'रामदास-वर्णन' वसंततिलका वृत्तांत रचिलें असून त्याची श्लोक–संख्या अकरा आहे. शेवटीं 'केलीं अपूर्व रघुनायक पंडितानें' असें आपलें नांव घातलें आहे. श्रीसमर्थ रामदास बरोबर दौत, लेखणी व कागद बाळगीत, (जो लेखणीसहित कागद दौत वाहे।) ते भगवीं वस्त्रें घेत व त्यांच्या कपाळावर एक आवाळूं होतें (जो भर्जरी सरस पाटलवर्ण चेलें। शोभे जयास लघुसें निटळीं अवाळें।) असें समर्थांचें हुबेहुब वर्णन पंडितांनीं केलें आहे. 'गजेंद्र–मोक्षां'त ५८ श्लोक असून ते भिन्न वृत्तांत आहेत. पंडितांनीं शेवटीं 'तो शोभे रघुनाथ पंडित निजव्याहार काव्यांतरी' असा आपला नामोल्लेख केला आहे. या काव्यांतील पांच श्लोक दमयंती–स्वयंवरांतहि आहेत. एक हत्ती पाणी पिण्यासाठीं तळ्यांत गेला असतां त्याला तेथील नक्रानें पकडलें. दोघांची बराच काळ झोंबी झाली. नक्र आपल्यास आवरत नाहीं हें पाहून त्या गजेंद्रानें विष्णूपाशीं आपल्या सुटकेची (मोक्षाची) याचना केली. विष्णूनें नक्रास मारिलें व गजेंद्राचा मोक्ष केला ही भागवत पुराणामधील कथा सदर काव्यांत आहे. काव्य एकंदरींत चांगलें आहे. येथील गजेंद्र व 'स्वयंवरांती'ल हंस यांच्या सरोवरांतील जलक्रीडेंत, पकडलें जाण्यांत व सुटण्यांतहि साम्य आहे. भावासरणि, शब्द-योजना व कल्पनाहि दोन्हीकडे सारख्याच आहेत. त्यामुळें हें काव्य लिहून सराईत झालेल्या पंडितांच्या लेखणीनें 'स्वयंवर' काव्य लिहिलें असलें पाहिजे हें उघड आहे. नमुन्यासाठीं पुढील, हत्तीच्या धडपडीचें वर्णन पहा; व त्याची हंसाच्या धडपडीशीं तुलना करा.

गजबजोनि घनध्वनि भैरवें भयंकर
गरजला गजराज घनारवें ।
निजबळें पद वोढुनि झाडितो ।
प्रबळ नक्र मिठीस न सोडितो ॥ २८ ॥

गजेंद्राची जलक्रीडा व गजेंद्र–नक्रांची झोंबी यांत वास्तवता सुंदर साधली असून गजेंद्राच्या धाव्यांत करुण–मिश्रित भक्ति उठावदार झाली आहे. विष्णूचें स्वरूप–वर्णनहि मोठें उदात्त आहे. हें छोटेखानी सरस काव्य पंडितांच्या काव्य–शक्तीची उत्तम कल्पना देऊं शकेल इतक्या तोलाचें तें खासच आहे.

उणीवांची जाणीव

रघुनाथपंडिताच्या काव्यांतील कांहीं उणीवांची जाणीव रसिक वाचकांस झाल्याविना रहात नाहीं. पंडितांनीं आपल्या ' स्वयंवर ' काव्यांत आपल्या स्वतंत्र कर्तृत्वाची चमक चांगलीच दाखविली असली तरी त्यांनीं श्रीहर्षाच्या नैषधाचा बराच उपयोग (जवळजवळ २५–३० स्थळीं) करून घेतला आहे. ' पंडितांनीं आपलें काव्य कीर्तनकारांच्या उपयोगासाठीं लिहिलें होतें कीं काय ? अशी शंका त्यांतील पदांवरून येते. शिवाय यांतील पदें श्लोकांच्या मानानें कमी प्रतीचीं वाटतात. त्यांत ' बाळे हे सोडि सोडि चाळे । देईन तुज वाळे ' असला पोरकटपणा व अश्लीलता आहे. (७५ व ८१ पहा.) ' चूर्णिका ' हा गद्य-काव्य प्रकार (९१) प्रायः कीर्तनांत वापरतात. तो दुर्बोध वाटतो. बहुतेक दिंड्यांमध्यें छंदोभंग झाला असून र्‍हस्वदीर्घांची ओढाताण करावी लागते. ' थोर होतील बाळ तुझे बाळे । तुला कामा येतील वेल्हाळे ' यामध्यें ही ओढाताण स्पष्ट आहे. ४०, ४१, ५८, ६० इत्यादि बहुतेक दिंड्या सदोष आहेत. कीर्तनांत तालासुरावर म्हणतांना ही ओढाताण जाणवत नसेल असें दिसतें. पंडितांच्या श्लेष-प्रियतेमुळें, संक्षिप्तता आणि संस्कृतप्रचुरता यांमुळें कांहीं ठिकाणीं त्यांची श्लोकरचना क्लिष्ट झाली

आहे. (पहा—१२९, १७४, ८८, ९१ इत्यादि) ‘ यखादा ’ ‘ येक ’, ‘ व्राला ’, (व्रापाला या अर्थीं), पाटीभर (धन) इत्यादि अगदीं गांवटी शब्दप्रयोग क्वचित् आढळतात. तथापि मागें पृष्ठ ४५ वर दाखविलेले वामनपंडितांच्या श्लोकरचनेंतील बहुतेक दोष रघुनाथपंडितांच्या श्लोकांत दिसत नाहींत. त्या दृष्टीनें तरी रघुनाथपंडितांची रचना वामनी रचनेपेक्षां सरसच म्हणावी लागेल.

एकंदरीनें पाहतां ‘फार थोड्या काव्यरचनेनें फार मोठी कीर्ति संपादणारा कवि ’ असें जें पंडितांबद्दल प्रारंभीं म्हटलें आहे तें खरें आहे. याची प्रतीति पंडितांचें रसाळ काव्य प्रत्यक्ष वाचल्यावर कोणाहि रसिकाला येईल यांत तिळमात्र संशय नाहीं.

अभ्यासाच्या वाटा

(१) नळराजाची कथा मूळची कोणत्या ग्रंथांतील आहे ? कोणकोणत्या मराठी कवींनीं या कथेला मराठीचा पेहेराव दिला. ‘ रघुनाथ-पंडितांचें या कथालेखनांतील वैशिष्ट्य कोणतें ?

(२) रघुनाथपंडितांच्या जीवन-वृत्तांताबाबत विद्वानांत कोणते मतभेद आहेत ?

(३) “ रघुनाथपंडितांनीं नलदमयन्तीच्या कथेवर मराठी पेहेराव चढविला आहे. ” उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

(४) रघुनाथपंडितकृत ‘ नलदमयन्ती-स्वयंवर ’ काव्यांतील कथाभाग थोडक्यांत लिहा.

(५) रघुनाथपंडितांनीं या काव्यांत दृष्टांतादि अलंकारांची केलेली सुंदर योजना उदाहरणांसह लिहा.

(६) ‘ होय शृंगारा करुणरसा थारा ’ ही पंडितांची उक्ति या काव्यांत सार्थत्वानें दिसून येतें; विवेचन करा.

(७) रघुनाथपंडितांच्या काव्यलेखनांतील दोष कोणते ? ते निर्माण होण्याचीं कारणें द्या.

श्रीधर : : : ४

* लोकप्रिय कवि

मुक्तेश्वर जसा कवित्वाच्या दृष्टीनें पंडित-कवींमध्यें सर्वश्रेष्ठ, तसा श्रीधर लोकप्रियतेच्या दृष्टीनें सर्वश्रेष्ठ मराठी कवि आहे. त्याची वाणी सोपी, रसाळ आणि ओघवती आहे. भक्ति ही श्रीधराच्या आख्यान–काव्याची बैठक असून तिच्यामध्यें एकांगीपणा नाहीं. राम, कृष्ण, शंकर, गणेश पार्वती, पांडव, पांडुरंग, मल्हारी, दत्तात्रय या सर्वांच्या कथा तो ' पांडुरंगाच्या प्रेरणेनें ' आणि सारख्याच भक्तिभावानें वर्णितो. रामायण, महाभारत, हरिवंश, जैमिनिकृत भारत, भागवत व इतर अनेक पुराणें या संस्कृत ग्रंथांच्या आधारें त्यानें आपलीं कथानकें रंगविलीं असल्यानें त्यांमध्यें वैचित्र्य व सर्वसमावेशकपणा भरपूर आहे. शिवाय श्रीधराच्या घराण्याची पूर्वपरंपरा, त्याचें निर्मळ चारित्र्य, त्याची सर्व समाजाच्या कल्याणाची कळकळ व त्याचा नीतिबोध आणि व्यवहारिक शिकवण यांचीहि त्यांत भर पडलेली आहे. तसेंच श्रीधराचा पंढरपूर येथील निवास व त्याची विठ्ठलभक्ति यांमुळें वारकरी संप्रदायांत त्याच्याबद्दल आपुलकी उत्पन्न झाली.

या सर्व गोष्टींमुळें श्रीधरी काव्याला विलक्षण लोकप्रियता लाभलेली आहे. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, जैमिनि-अश्वमेध व शिवलीलामृत या पांच ग्रंथांचीं नांवें ज्याला माहीत नाहींत असा एकहि महाराष्ट्रीय नाहीं. स्त्री-पुरुष, सुशिक्षित-आशिक्षित, बाल-वृद्ध, शहरांतले किंवा खेडेगांवातले इत्यादि सर्वांना त्याच्या काव्यांचा परिचय आहे. चातुर्मास्यांत गांवोगांवीं त्याच्या ग्रंथांचीं पारायणें धार्मिक बुद्धीनें केलीं जातात. अशा तऱ्हेनें आपल्या कथारसानें समाजाच्या सर्व थरांना सारखीच मोहिनी घालणारा पंडित-कवींमध्यें एकटा श्रीधरच.

कुलवृत्तांत

पंढरपुरापासून बत्तीस मैल अंतरावर असलेल्या नाझरे या गांवीं श्रीधराचा जन्म इ. स. १६५८ (श. १५८०) मध्यें झाला. याच्या वडिलांचें नांव ब्रह्माजीपंत व आईचें नांव सावित्री. आडनांव देशपांडे. हा देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण. याचें मूळ घराणें मोंगलाईतलें. पण श्रीधराच्या पूर्वजांस नाझरे महालाचें देशपांडेपणाचें ऊर्फ देशकुलकर्णीपणाचें वतन मिळाल्यानें ते नाझरे येथें स्थायिक झाले. श्रीधराचे पूर्वज, सदाचरणी व धार्मिकवृत्तीचे असून प्रसिद्ध साधुकवि रंगनाथस्वामी निगडीकर हे याचे चुलत चुलते. (शके १५३४–१६०६)

विद्याभ्यास

अशा या थोर भगवद्भक्त व विद्वानांच्या घराण्यांत श्रीधराचा जन्म झाल्यानें त्याच्यावर फार चांगले आनुवंशिक संस्कार झाले. श्रीधराचा विद्याभ्यास प्रथम नाझरे येथेंच झाला. त्याचे वडील ब्रह्माजीपंत नाझरे सोडून शके १६०० चे सुमारास पंढरपुरास आल्यावर त्याचा पुढील व्यासंग व ग्रंथनिर्मिति पंढरपूर या प्रसिद्ध क्षेत्रांत व पांडुरंगाच्या सन्निधानीं झाली. श्रीधरानें त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें संस्कृत व प्राकृत ग्रंथांचें उत्तम परिशीलन केलें होतें. संस्कृतांतील व्याकरण, न्याय, धर्म, ज्योतिष, वेदान्त, योग इत्यादि शास्त्रांचा त्याचा व्यासंग चांगला असून वेदान्त-शास्त्र हें त्याच्या विशेष आवडीचें व व्यासंगाचें शास्त्र होतें. त्याचबरोबर वेद, वेदांगें, इतिहास-पुराणें, काव्य-नाटकें व काव्य–शास्त्र–कला इत्यादि विषयांचाहि त्याचा चांगला परिचय होता. त्यानें आपल्या विद्याभ्यासाची व कवित्वाची स्फूर्ति आपले वडील ब्रह्माजीपंत यांचेकडूनच घेतली. ब्रह्माजीपंतांनीं ‘आत्म-प्रकाश’ हा वेदान्तपर ग्रंथ स्वतः रचून तो आपल्या पुत्रास पढविला.

पण पुढील सर्व अध्ययन श्रीधरानें स्वतःच केलें. संस्कृतप्रमाणेंच मराठीचें त्याचें अध्ययन विस्तृत व सखोल होतें. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामन,

तुकाराम इत्यादि कवींच्या कल्पना श्रीधराच्या काव्यांत आढळतात व संत-मालिका, नामावली इत्यादी स्फुट प्रकरणांत त्यानें पूर्वीच्या सर्व संत-मंडळींचा (यांत मुकुंदरायापासून नामदेव, विसोबा खेचर, सावता माळी, रोहिदास, गोरा कुंभार, रामदास व शांतलिंग या पुरुषांपर्यंत) आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

सुखी जीवन

श्रीधराचे वडिलांनीं पंढरपूर येथें संन्यास घेतला व हे 'ब्रह्मानंदस्वामी' शके १६१५ मध्यें समाधिस्थ झाले. त्यानंतर श्रीधर हा पंढरपुरांतच एक घर विकत घेऊन तेथें स्थायिक झाला. त्याचा गृहस्थाश्रम अत्यन्त सुखाचा व समाधानाचा झाला. श्रीधर उत्तम पुराणिक व कीर्तनकार होता. त्याचा सर्व काळ वाचन, मनन, कीर्तन, पुराण, ग्रंथरचना, ईश्वरोपासना, संत व विद्वान् यांच्याशीं चर्चा इत्यादि व्यवसायांत जात असे. त्याच्या इतका, सर्व दृष्टींनीं, सुखी गृहस्थ तोच. त्याला तीन विद्वान् व पितृभक्त पुत्र होते. त्याचा मित्रपरिवार मोठा व शिष्यहि बहुत होते. श्रीधराच्या ईश्वरभक्तीची व सत्पात्रतेची कीर्ति त्याच्या हयातींतच इतकी पसरली होती कीं, शके १६५० मध्यें श्रीशाहूमहाराजांनीं त्यास माण परगण्यांतील टाकळी हा गांव इनाम दिला. श्रीधरानें हिंदुस्थानांतील पवित्र स्थळांचें दर्शन, तीर्थयात्रा-निमित्तानें घेतलें होतें. अशा तऱ्हेनें 'कृतार्थ' झालेल्या श्रीधराचें देहावसान पंढरपूर क्षेत्रीं शके १६५१ (इ. स. १७२९) मध्यें झालें.

अनेक राजवटींचा साक्षीदार

श्रीधरास एकाहत्तर वर्षांचें दीर्घ आयुष्य लाभलेलें होतें. श्रीशिवाजीमहाराजांच्या ऐन उत्कर्षाचा काल, त्यांचा राज्याभिषेक, त्यांचें निधन, संभाजी व राजाराम महाराजांची कारकीर्द व त्यांचा दुःखद मृत्यु, छत्रपति शाहू-महाराजांची सातारच्या गादीवर स्थापना, बाळाजी विश्वनाथाची पेशवा

म्हणून कारकीर्द व पहिल्या बाजीरावाचें आक्रमण व धडाडीचें राजकीय कार्य इत्यादि महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना महाराष्ट्रांत घडल्या त्या श्रीधराच्या या एकाहत्तर वर्षांच्या दीर्घ आयुष्यक्रमांतच. श्रीधराच्या ग्रंथरचनेचा आरंभ मात्र इ. स. १७०२ मध्यें व तिचा शेवट इ. स. १७१८ त झाला. हा काळ शाहूमहाराजांच्या कारकीर्दीचा पूर्वभाग होय. आपल्या धार्मिक आख्यान-काव्यांत राजकीय घडामोडींचें साक्षात् वर्णन जुने मराठी कवी करीत नसले तरी त्यांच्या काव्यांत त्यांचें अप्रत्यक्ष प्रतिबिंब पडलेलें असतें. तसें तें श्रीधराच्या 'हरिविजय', 'रामविजय', 'पांडवप्रताप' या ग्रंथांत कांहीं ठिकाणीं पडलेलें आढळतें. (पहा—रा. वि. १-२०४, ह. वि. ६-२२०, पां. प्र. ३६-४२-४३-४८, रा. वि. १२, १२५–१४२) श्रीधर हा 'आनन्द संप्रदायी' कवि होता. ज्ञानयुक्त भक्ति, सगुणोपासना पण अखेर अद्वैतसिद्धि हें या सांप्रदायाचें वैशिष्ट्य आहे. वारकरी सांप्रदायाची तात्त्विक भूमिका अशीच आहे. त्यामुळें व विशेषतः श्रीधराच्या 'पांडुरंग'भक्तीमुळें श्रीधराचें वारकरी संप्रदायाशीं जवळचें नातें होतें.

ग्रंथरचना

श्रीधराची ग्रंथरचना १५-१६ वर्षांतील आहे. तथापि ती अफाट म्हणजे साठ हजाराच्या जवळपास आहे. त्या ग्रंथरचनेचा आरंभ 'हरिविजया' पासून (शके १६२४) असून तिचा शेवट 'शिवलीलामृता'पाशीं (शके १६४०) झालेला आहे. 'शिवलीलामृत' हा ग्रंथ श्रीधरानें बारामती येथें तेथील श्रीसिद्धेश्वराच्या म्हणजे शिवाच्या देवालयांत लिहिला. बाकीची रचना पंढरपुरांतील आहे. जैमिनी-अश्वमेध मात्र पाथरी येथें रचला.

स्फुट प्रकरणें-पंडिती वळण

श्रीधराची–स्फुट प्रकरणें जवळ जवळ शंभर असून त्यांत सर्व तऱ्हेची विविधता आहे. त्यांत विशेष लक्षणीय गोष्ट अशी कीं, त्यांतील कांहीं

प्रकरणांची रचना श्रीधरानें संस्कृतांत केली आहे व कांहीं रचना मराठीच पण गणवृत्तात्मक आहे. शिवाय कांहीं विनोदी प्रकरणें (उदाहरणार्थ– ' शिव गौरी–विनोद ', कुमार–गजानन–लीला, शिवगौरी संवाद, भामा–विनोद, भामा–दूति–संवाद) संस्कृत नाटकांतील नांदी–श्लोकांच्या निव्वळ अनुवादावर आधारलेलीं आहेत. हें सर्व येथें सांगण्याचा हेतु एवढाच कीं, श्रीधर हा नुसती ओंवीबद्ध आख्यानक–कविता रचणारा प्राकृत पुराणिक किंवा हरदास नसून त्याच्या कांहीं रचनेंत तरी पंडिती काव्याचे सर्व विशेष आढळून येतात हें वाचकांनीं मुद्दाम लक्षांत घ्यावें. शिवाय संस्कृत शास्त्रें व साहित्यविद्या यांचें त्याचें अध्ययन सखोल होतें हें मागें सांगितलेंच असल्यानें त्याच्या पांडित्याबद्दल कसलीच शंका घेण्याचें कारण नाहीं. पण मुक्तेश्वराप्रमाणें श्रीधरालाहि श्लोकरचना फारशी मानवली नाहीं. त्यामुळें त्यानें ओंवीचा आश्रय करून तीमध्येंच आपल्या पंडिती वळणाची चमक दाखविली. स्फुट प्रकरणांतील खालील प्रकरणांत पंडिती काव्याचे विशेष आढळतात.

' ध्रुवाख्यान ', ' अनुभवसार ' व ' परंपरा ' यांतील रचना अक्षरगणवृत्तांत आहे. ' रामचन्द्रध्यानम् ', ' राघवाष्टकम् ', ' प्रश्नोत्तरमालिका ', ' महावाक्यविवरणम् ' इत्यादि नऊ प्रकरणें संस्कृत श्लोकांत व संस्कृत चूर्णिकेंत आहेत. बाकी सर्व रचना मराठी पद्यें व ओंव्या यांत आहे. या स्फुट प्रकरणांच्या रचनेचा काळ निश्चितपणें सांगतां येत नसला तरी केवळ पूर्व तयारी म्हणून श्रीधरानें तीं शके १६२४ च्या पूर्वींच म्हणजे शके १६१८—१६२४ च्या दरम्यान रचिलीं असावीं असें वाटतें.

मुख्य ग्रंथरचना

पण श्रीधराची कीर्ति व लोकप्रियता त्याच्या मुख्य ग्रंथावरच अवलंबून आहे. ते ग्रंथ कालानुक्रमानें पुढील होत : हरिविजय (श. १६२४), रामविजय (श. १६२५), ' पांडवप्रताप ' (श. १६३४), जैमिनी–अश्वमेध

(श. १६३७), आणि शिवलीलामृत (श. १६४०). आतां या ग्रंथांत प्रगट झालेल्या श्रीधराच्या काव्य–गुणांची थोडी ओळख करून घेऊं.

हरिविजय

हा ग्रंथ भागवताचा दशमस्कंद, हरिवंश आणि 'ब्रह्मांड', 'नारद', 'पद्म' इत्यादि पुराणांच्या आधारें रचण्यांत आला आहे. हरीनें म्हणजे कृष्णानें अनेक दैत्यांचा संहार करून त्यांवर 'विजय' मिळविला आणि साधूंचें रक्षण व दुर्जनांचें निर्दालन करून आपलें अवतारकार्य पूर्ण केलें हा या ग्रंथाचा विषय आहे. याचे अध्याय छत्तीस असून ओवी संख्या ८१३९ आहे. वसुदेव–देवकीच्या उदरीं हरीचा जन्म–गोकुळांतील यशोदा-नंदाचे घरीं त्याच्या बाललीला–उखळ–बंधन–वनक्रीडा–वत्सहरण–कालियामर्दन–गोवर्धनोद्धार–गोपीकृष्ण प्रेम–राधाकृष्ण प्रेम–रास–क्रीडा–कंस–वध–जरासंध–वध–रुक्मिणी–स्वयंवर–कृष्ण–सुदाम भेट–सुभद्राहरण–पांडव राजसूय यज्ञ–मय सभा–शिशुपाल–वध–गोकुळजन–भेट इत्यादि विषय 'हरिविजयां'त आले आहेत. याच विषयांवर महानुभाव कवी, वामन पंडित इत्यादींची कविता श्रीधरापूर्वीं झाली होती व मोरोपंतादी कवींनीं पुढें केली हें खरें असलें तरी श्रीधराचें म्हणून कांहीं निराळें वैशिष्ट्य 'हरिविजयां'त प्रगट झालें आहे. आणि तें म्हणजे भाषेची सुलभता, चित्ताचा प्रेमळपणा, सर्व परिचित व व्यावहारिक दृष्टान्त, नीतिबोध आणि भक्तीची बैठक हें होय.

कृष्णाच्या कथेचा विशेषच असा आहे कीं, तिच्यामध्यें वात्सल्य, शृंगार, हास्य, वीर, अद्‌भुत, करुण, भयानक, भक्ति, रौद्र आणि शान्त इत्यादि सर्व रसांना भरपूर वाव आहे. आणि या विशेषाचा योग्य तो उपयोग श्रीधरानें आपल्या काव्यांत ठायीं ठायीं करून घेतला आहे. त्याच्या या काव्यांत आपणांस नरेन्द्र कवि व मुक्तेश्वर यांचें कल्पना–वैभव आढळणार नाहीं, एकनाथाची वेदान्तपर रूपक–पद्धति सांपडावयाची नाहीं आणि वामन पंडिताची संस्कृतप्रचुर व घोटिव रचनाहि दिसावयाची नाहीं. पण

म्हणूनच हें श्रीधराचें आबालसुबोध काव्य वरोवरीं वाचलें जाऊं लागलें. सोपेपणा, घरगुती वातावरण व सर्वांना सहज आकलन करतां येईल येवढीच प्रतिपादनाची पातळी यांमुळें तें काव्य सर्वांचें आवडतें झालें. त्यांतील कांहीं नमुने पुढें देतों.

श्रीकृष्णाचें नृत्य

यशोदा आणि नंद, गौळिणींसह, मोठ्या कौतुकानें पहात असतांना बाल-कृष्ण नाचतो आहे या प्रसंगाचें वत्सलरसपूर्ण वर्णन पहा—

नूपुरें रुणझुणतीं साजिरीं । मातेनें कृष्ण धरूनि करीं ।
कांचबंद भूमिवरी । हळूहळू चालवीत ।।
मंद मंद चाले गोविंद । हळूच नेपुरें करिती शब्द ।
तों जवळीं पातला नंद । हस्त धरीत हरीचा ।।
नंदहस्ताश्रयें करून । चाले वैकुंठीचें निधान ।
सवेंचि पडतो अडखळोन । नंद सांवरोन धरीतसे ।।
बळिराम आणि जगज्जीवन । येक येकाचा आश्रय धरून ।
कांपत कांपत दोघे जण । उठोन उभे राहती ।।
सवेंचि आदळती धरणीं । गदगदा हांसे चक्रपाणी ।
सवेंचि उभे राहोनि । दुडदुडा नाचताती ।।
स्त्रिया नंद आणि यशोदा जननी । भोंवत्या मिळाल्या नितंबिनी ।
बळराम शेष आणि चक्रपाणी । नाचत दोघे पाहती ते ।।
करटाळिया नितंबिनी । वाजविती कौतुकें करूनी ।
म्हणती 'नाच नाच रे चक्रपाणी'। नंद नयनीं पाहत ।।
हस्तसंकेत दावी भगवंत । नृत्य करी डोलत डोलत ।
भोंवत्या गवळणी हांसत । हरि पाहत त्यांकडे ।।
गर्भ-मध्यभाग वेष्टित गौळिणी सुकुमार । त्याच कमळ-कर्णिका सुंदर ।
मध्यें श्रीकृष्ण भ्रमर । नीलवर्ण रुणझुणे ।।

सूर्याभोंवतीं जैसी किरणें ! कीं शशिवेष्टित तारांगणें ।
कीं मुकुटाभोंवतीं रत्नें । तैशा कामिनी विलसती ॥ स्त्रिया

नंद धावोनि जवळी आला । म्हणे सुकुमार माझा भागला ।
हृदयीं धरूनि आलिंगिला । चुंबन दिधलें तेधवा ॥

(ह. वि. ५-६०-७०, ८२)

कृष्णाच्या नृत्याचा हा घरगुती थाट वाचतांना प्रत्येक आईबापांना नंद-यशोदेसारखाच प्रेमाचा पान्हा फुटेल. "नंदाच्या हाताचा आधार घेऊन चाललेला कृष्ण हें 'वैकुण्ठीचें निधान' होय," या वर्णनानें वात्सल्यांत एकदम भक्तीची छटा मिसळते व भाविकांचे डोळे ओलावतात. सदर वर्णनांत उपमा थोड्याच पण समर्पक आहेत व कृष्णाचें शब्दचित्र वास्तव आहे.

सैन्य-संचलन

आतां मथुरेवर स्वारी करावयास निघालेल्या जरासंधाच्या प्रचंड सेनेचें वर्णन पहा. तें इतकें हुबेहूब व गतिमान् आहे कीं सैन्यसंचलनाचा प्रत्यक्ष देखावा वाचकांच्या नजरेसमोर उभाच राहतो—

ऐसी जरासंधें होडे बांधोनी । घाव तेव्हां घातला निशाणीं ।
तेणें दुमदुमली अवनी । तेवीस अक्षौहिणी दळ ज्याचें ॥
धडकला वाद्यांचा कल्लोळ । प्रतिध्वनीनें गाजिलें निराळ ।
भयभीत ब्रह्मगोळ । चालिलें दळ मागधाचें ॥
शृंगें-बुरंगें पणव काहळ । गोमुखी चळका चौंडकी दुटाळ ।
मुखवातें सनया रसाळ । गर्जती ढोल गिडबिडी ॥
पदाती दळ पुढें जात । त्यांचे पायीं ब्रीदें झणझणित ।
पदीं त्याच्या तोडर गर्जत । हाक फोडीत आवेशें ॥
नाना परीच्या कासा चालुनी । यमदंष्ट्रा खोविल्या जघनीं ।

१. पेंज, २. नगारा, ३. आकाश, ४. विविध वाद्यांचीं नांवें, ५. घुंगुर,

हातीं कुंत असिलता घेऊनि । खेटकें अपार मस्तकावरी ॥
जैसा फुटे कल्पान्ताचा सागर । तैसें पायदळ जात अपार ।
सडका पाश भिंडिमाळा थोर । घेऊनि पुढें धावती ॥
बडगे चक्रें शिळा डांगा । घेऊनी ब्रिलगती चमकती वेगा ।
धनुष्यबाण सुऱ्या[९] उरगा[१०] । आकृती ऐशा सतेज ॥
लघु उल्लाट यंत्रें आघीं । घेऊनि पुढें धांवती खांदीं ॥
उर्वी[११] दणाणें चालतां पदीं । भूधरें[१२] होय साशंक ॥
(ह. वि. २२–२४–३२)

वरील वर्णनांत जुन्या रणवाद्यांचीं किती तरी नांवें श्रीधरानें मोठ्या साक्षेपानें दिलीं आहेत तें पहाण्यासारखें आहे.

रामविजय

रामानें रावणाच्या असुरी राज्याचा विध्वंस करून मिळविलेल्या 'विजया'चें वर्णन या ग्रंथांत आहे. या ग्रंथाला मुख्य आधार वाल्मीकिरामायणाचाच. परंतु श्रीधरानें आपली कथा अधिक आकर्षक व नावीन्यपूर्ण करण्यासाठीं इतर 'रामायणा'चे व पुराणांचे आधार, प्रसंगविशेषीं घेतले आहेत. उदाहरणार्थ सुलोचनेंकडून इंद्रजिताच्या शिराला हंसावयाला लावून तिच्या पातिव्रत्याची परीक्षा पहाणें व नंतर तिचें सती जाणें ही अद्भुतरम्य कथा अग्निपुराणांतून घेतली आहे. अहिरावण-महिरावण कथा 'आनन्दरामायणां'तून घेतली आहे. अशा अनेक अडकथा ग्रंथाच्या लोकप्रियतेंत भर घालतात हें जाणून तशी योजना श्रीधरानें—एकाद्या कुशल कीर्तनकाराप्रमाणें—केली आहे. तसेंच संस्कृत हनूमन्नाटक व संस्कृत सुभाषितें यांतील सुंदर कल्पनांनीं श्रीधरानें आपलें काव्य मधूनमधून नटविलें आहे. श्रीधरानें 'रामविजया'च्या चाळीस अध्यायांत व ९१४७ ओंव्यांत रामायणाच्या सातही काण्डांचा विषय आणिला

---

६. भाले, ७. तरवारी, ८. ढाली, ९. सुऱ्या, १०. साप, ११ पृथ्वी, १२. शेष, पर्वत.

२८००५ ७१-११७५ ३७१३९

आहे. श्रीधरानें ' युद्धकाण्ड ' थोड्या अधिक विस्तारानें वर्णिलें असून त्याची ओवीसंख्या सबंध ग्रंथाच्या एकचतुर्थांशाएवढी आहे !

रामविजयांतील कथा सर्वांच्या परिचयाची आहे. त्या कथेच्या वाचनानें भक्ति, ज्ञान व वैराग्य या तीन गोष्टींचा ठसा वाचकांवर उमटावा असा श्रीधराचा हेतु स्पष्ट दिसतो. म्हणून त्यानें राम विजयाचें वर्णन ' श्रीरामविजय ग्रंथ सुंदर । भक्तिज्ञानवैराग्यभांडार । (रा. वि. ९.२२९) असें केलें आहे. उपमादृष्टांतहि या ग्रंथांत असल्याचें श्रीधर सांगतो (दृष्टांतरत्नें अपार । माजी सतेज झगमगती) तेंहि खरें आहे. पुढील एक उपमा पहा. नीलवर्ण राम पांढऱ्या शुभ्र स्फटिक शिळेवर बसला असतां कसा दिसला ? तर—

स्फटिक शिळेवर श्रीराम । बैसला तेव्हां घनश्याम ।
मेघ जेवीं कैलासा द्यावया क्षेम । बलाहक उतरला ॥
(रा. वि. १६-१८१)

सुभाषितांची पखरण

उपदेशपर सुभाषितांची मनोहर पखरण ' रामविजयांत जागोजाग आढळते,

(१) मुख्य धर्म परोपकार । अधर्मनाम साचार । परपीडा करणें हें ॥
(रा. वि. ६.२४४)

(२) दुजयाचा चिंती घात । त्यासि निर्दाळी उमाकांत ॥ (१४-२९)

सर्प (३) शत्रु नाग कृशान । हे म्हणो नये लहान । अग्नि
क्षणें हरतील प्राण । यास्तव सावधान असावें ॥ (१५-२०)

(४) दुग्धें न्हाणिला वायस । परी तो कदा न होय राजहंस ।
(२५–१०४)

(५) जन्मभूमि जान्हवी जननी । सद्गुरुस्थळ पवित्र अवनी ।
शिवहरिप्रतिमा संत देखोनी । साष्टांग नमन करावें ॥
(३५-१३१)

हनूमन्नाटकांतील ' हारो नारोपितः कंठे ' या सुंदर श्लोकाचा श्रीधरानें केलेला अनुवाद पहा—

मज आलिंगितां रामचंद्र । तेव्हां कंठीं न साहेचि हार।
आतां गिरि-कानन समुद्र । दोघांमध्यें पडियेला ॥ (२०-७३)

तेजस्वी बालवीर

रामाचा तेजस्वी पुत्र लव यानें अश्वमेधाचा श्यामकर्ण अश्व आपल्या आश्रमांत धरला व त्यास मोठ्या ईर्षेनें तेथें बांधून ठेवला या प्रसंगाचें श्रीधरानें केलेलें वर्णन देऊन 'रामविजय' परिचय–स्थळ संकोचामुळेंच येथेंच पुरा करूं.

लव उपवन रक्षित । सवें असतीं बाळकें बहुत ।
नाना क्रीडा विनोद करित । वृक्षछाये बैसले ॥
अष्टवर्षी दशवर्षी कुमर । कटीं कौपीन मौंजी सुंदर ।
मस्तकीं शिखा परिकर । खेळतां उडे साजिरी ॥
तों श्यामकर्ण धावत । आला त्याच पंथें अकस्मात ।
ऋषिपुत्रांस लहू दावित । 'पहा रे येतो अश्व कैसा' ॥
मग सीतासुतें धावून । शीर्षीं धरिला श्यामकर्ण ॥
कपाळींचें पत्र तोडून । वाचितसे ते काळीं ॥
पत्रार्थ पाहूनि समस्त । लहू गदगदां हांसत
बळिया काय रघुनाथ । त्रिभुवनीं थोर जाहला ॥
काय त्यासच व्याली जननी । काय निर्वीर झाली अवनी ।
तरी कैसा अश्व सोडोनी । नेईल पुरुषार्थें पाहूं पां ॥
माझी प्रतिज्ञा हेच आतां । धरिला अश्व न सोडीं मागुतां ॥
तरींच सीतेउदरीं तत्वतां । जन्म घेऊन सार्थक ॥
अश्वाचे नेत्र पुसोन । कौतुकें करून थापटी मान ।
उत्तरीय वस्त्र गळां घालून । बांधे नेऊन कर्दळीं ॥
ऋषिपुत्रांस लहू म्हणत । 'पाहा रे घोडा कैसा नाचत' ।
तों ऋषिबाळ समस्त । भयें पोट बडविती ॥

(रामविजय ८-४०ते४७).

पांडव-प्रताप

या ६४ अध्यायांच्या व १३२९७ ओंव्यांच्या ग्रंथांत श्रीधरानें व्यास-कृत महाभारताच्या आधारें पांडवांच्या ‘ प्रतापाचें म्हणजे पराक्रमांचें वर्णन केलें आहे. हा ग्रंथ भारताच्या आधारें लिहिला असला तरी त्यांत समग्र भारत आणण्याचा, मोरोपंतादी इतर कवींप्रमाणें, श्रीधराचा हेतु नाहीं. केवळ पांडवांची कथाच त्याला आकर्षकपणें सांगावयाची आहे म्हणून त्यानें भारतांतील इतर विषय गाळले आहेत. पांडवांची कथा मनोरम करण्यासाठीं त्यानें ‘ जैमिनिभारत ’, ‘ भागवत ’, ‘ हरिवंश ’ इत्यादि संस्कृत ग्रंथांतून कांहीं प्रसंग घेतले आहेत व मुक्तेश्वराच्या उपलब्ध पर्वांचा तर सर्वत्र उपयोग केला आहे. इतकेंच नव्हे तर ‘ पांडव-प्रताप ’ हें ग्रंथनामसुद्धां त्याला मुक्तेश्वराच्या ‘ पांडव-प्रताप पुरुष तरणा । नववधू कौरवसेना । ’ (आदि. ४४-११४) या ओंवीवरूनच सुचलें असावें ! तसें नसतें तर ‘ हरिविजय ’ व ‘ रामविजय ’ याप्रमाणें ‘ पांडवविजय ’ असें नांव देण्यास त्याला काय हरकत होती ?

श्रीधरानें आपल्या ग्रंथाचें वर्णन ‘ पांडव-प्रताप ग्रंथ सुंदर । सकळ साहित्याचें भांडार ’ असें केलें आहे तें खरेंच आहे. पण हें साहित्य निर्माण करण्याचा त्याचा हेतु इतर पंडितकवींप्रमाणें, आपल्या ‘वाचेचें सार्थक करावें यथार्थ,’ असा होता. त्याचप्रमाणें मनोरंजक ईश्वरकथा वर्णून प्रापंचिक अज्ञ व भोळ्या जनांना ज्ञानदीपिकेनें सन्मार्ग दाखवावा असाहि दुसरा महत्त्वाचा त्याचा हेतु होता (पहा. पां. प्र. ५३–११८).

आतां ‘ पांडव-प्रतापां ’तील कांहीं स्थळें पाहूं—

शकुन्तला-दर्शन

मृगया करण्यासाठीं कश्यपारण्यांत आलेल्या दुष्यन्त राजाच्या नजरेस शकुन्तला पडली. या प्रसंगांतील श्रीधराच्या निवेदनाचा डौल मनोवेधक नाहीं असें कोण म्हणेल ?

दुष्यन्तराव मृगयेसी । निघाला एकदां दलभारेशीं ॥
कीं समुद्र फुटे तैशी । सेना चाले सांगातें ॥
चतुरंगदल अद्‌भुत । मिरवत जातसे दुष्यन्त ॥
नारी नर गोपुरींहुनि पाहत । म्हणती मन्मथ दुसरा हा ॥
तंत वितंत घन सुस्वर । वाद्यें वाजती अपार ॥
चंड पर्वत नद्या थोर । उल्लंघून जातसे ॥
दुष्ट श्वापदें अपार वधित । येता झाला कश्यपारण्यांत ॥
कण्वऋषीचे आश्रमांत । प्रवेशला राजेंद्र तो ॥
तों कोणी न दिसे समोर । मग गंभीर गर्जे नृपवर ॥
म्हणे 'आश्रमीं आहे काय ऋषीश्वर' । प्रत्युत्तर कोणी वेदी ॥
तीं लावण्यामृतसरिता । बाहेर आली ऋषिदुहिता ॥
सुवर्ण कीं शातकुंभदिव्यलता । सुगंधखाणी पद्माक्षी ॥
कीं वैकुंठवनिता रमा । तिची दुसरी हे अपार प्रतिमा ॥
कीं सरस्वती आणि उमा । द्यावी उपमा तयांची ॥
रूपयौवनचातुर्यखाणी । मंडित दिव्य कनकाभरणीं ॥
राजेन्द्रासि सन्मानूनी । आसन देत बैसावया ॥

(प्रां. प्र. ३-१६९-१७७)

मुक्तेश्वराचें अनुकरण

मुक्तेश्वरी कल्पनांचा उपयोग श्रीधर कसा करून घेतो हें दाखविण्यास पुढील जरासंधवध प्रकरणांतील उतारा देतों—

श्रीकृष्ण जरासंधाला बजावीत आहे कीं, 'तुझें मरण जवळ आलें आहे म्हणूनच तुला ही कुबुद्धि सुचत आहे'—

आयुष्यतैल सरलें पूर्ण । भीम म्या हातीं धरला व्यंजन । पंखा
प्राग्ज्योति जाईल विझोन । समय जवळी पातला ।
देह दीप-पात्र रितें । पडेल येथेंचि पालथें ।
हें फल राकडेंच एथें । पावशील तूं आतां ॥

(प्रां. प्र. १६. १७८-७९)

ज्या मुक्तेश्वरी मूळ रूपकावरून श्रीधरानें आपलें रूपक वरील दोन ओंव्यांत योजिलें आहे तें असें —

सरला सुकृताचा तंतु । आयुष्य-तैला झाला अंतु ।
माझिये हस्तीं व्यजनवातु । भीमरूपें उदेला ।
तो झगटला सत्वरगती । प्राण-दीप पञ्च ज्योती ।
मालवोनि पडेल क्षितीं । गात्र-पात्र पालथें ॥ (सभा—७-२-४)

'पांडव-प्रताप' व मुक्तेश्वरी भारत यांचा विषय एकच असल्यानें मुक्तेश्वराच्या उज्ज्वल कल्पना श्रीधरानें घेतल्या हें ठीकच झालें. पण श्रीधराचें मुक्तेश्वरा-नुकरण केवळ विषयाच्या एकपणामुळेंच नाहीं. इतर ठिकाणीं म्हणजे 'हरिविजयांत'सुद्धां मुक्तेश्वरी कवितेची छाप श्रीधरावर पडलेली दिसते. उदा-हरणार्थ मागें पृष्ठ १०, १२ व १४ वर जें मोहिनी अवतारवर्णन किंवा रात्र व पहाट यांचें अत्यन्त उज्ज्वल वर्णन मुक्तेश्वरानें केलेलें दिलें आहे त्याचा शब्दश: अनुवाद श्रीधरानें हरिविजयांत रुक्मिणीचें रूप-वर्णन करतांना (ह. वि. २३-१८-२७) केला आहे; व रात्रींचें तसेंच वर्णन (ह. वि. ११-१८७-१९६) व अरुणोदयाचें तेंच वर्णन (ह. वि. ११-२११-२२०) येथें केलें आहे. मुक्तेश्वरासारख्या कवीश्वराची मोहिनी श्रीधरावर पडली असली तरी श्रीधराचे अंगीं स्वतंत्र कवित्व नव्हतें असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

मागें पृ. १६ वर दिलेल्या द्रौपदीच्या तेजस्वी उद्गाराचें स्थूल अनुकरण श्रीधरानें केलें आहे. तथापि त्या उद्गारापूर्वींची द्रौपदीची मन:स्थिति किती समर्पकपणें श्रीधर करतो तें पहा—

हत्ती बळें खवाळिला भुजंग । किं शुंडें पिळिला मत्त मातंग ।
निद्रित व्याघ्र सवेग । नासिकेवरी ताडिला ॥
तैसी ते पांडवललना । म्हणे 'चांडाळा दुर्योधना)
गलित कुष्ठ भरोनि रसना । झडो दे तुझी पापिया ॥
महा प्रलय सौदामिनी । हिंसका पडो तुजवरी येऊनी ।
तुझे दृष्टीचे कोळसे होऊनि । भस्म होऊं दे दुर्जना ॥'

(पां. प्र. २१-९२-९४)

यापुढें श्रीधरानें मुक्तेश्वराचेंच रूपक जरा सोप्या शब्दांत अनुवादिलें आहे तें असें—

भीमें गदा नेमिली नोवरी । रणचत्वरीं घेई मांडीवरी ।
पंचप्राण घालोनि बाहेरी । प्रलयाग्नी लावी पैं ॥
तुझ्या स्त्रिया हृदय पिटूनी । वाद्यें वाजविती भयंकर वदनीं ।
रक्तमृत्तिका मिळोनि । हळदी सहजाचि लागेल ॥
मग जे गदा हृदयीं धरून । समरमंचकीं करी शयन ।
बंधुसमवेत यमसदन । पावोनि करी साडे तेथें ॥

(पां. प्र. २१-९५-९७)

जैमिनि-अश्वमेध—

भारतीय युद्धाच्या समाप्तीनंतर पांडव जरी विजयी झाले तरी त्यांच्या हातून त्यांचेच आप्त व नातलग मारले गेले. यामुळें धर्मराज खिन्न झाला; व राज्य सोडून वनांत जावयास निघाला. इतक्यांत व्यास तेथें आले व त्यांनीं धर्मास सांगितलें कीं, ‘ तूं अश्वमेध यज्ञ कर म्हणजे कुलक्षयाचें तुझें हें पातक नाहींसें होईल. ’ त्यावरून पांडवांनीं केलेल्या अश्वमेधाचें वर्णन या ग्रंथांत श्रीधरानें केलें आहे. परंतु ही कथा मूळ महाभारतांत नाहीं. ती व्यासशिष्य जैमिनि यानें रचलेल्या भारताच्या अश्वमेध-पर्वांत आहे. तिच्याच आधारानें आपला ‘ जैमिनि-अश्वमेध ’ श्रीधरानें रचिला आहे. तो म्हणतो—

नारायणावतार व्यासमुनी । तयाचा मुख्य शिष्य जो जैमिनी ।
तेणें अश्वमेध कृतकथा । ती महाराष्ट्र भाषेंत वर्णीन आतां ।

(जै. अ. १-१५)

श्रीधरानें याप्रमाणें मुख्य आधार जरी जैमिनिकृत अश्वमेधकथेचा घेतला असला तरी त्याच्या पद्धतीप्रमाणें त्यानें अग्नि, भविष्य, पद्म, शक्ति, स्कंद आणि ब्रह्मांड या पुराणांतल्या कथा भरीस घेतल्या आहेत. व आपली कथा अत्यंत मनोरंजक केली आहे.

अनेक पुष्पांचा रससार । जैसा घेतो मधुकर ।
तैसा सर्व पुराणोद्धार । काढोनि कथा कथिली म्यां ॥ (जै. अ. ८८-८०)

असें त्यानेंच म्हटलें आहे. यायोगें मूळ संस्कृत ग्रंथाच्या जवळ जवळ दुप्पट श्रीधराचा ग्रंथ झाला. श्रीधराच्या जैमिनि–अश्वमेधाचे अध्याय ९६ असून ओंवीसंख्या ९८७६ झाली आहे. हा प्रचंड ग्रंथ श्रीधरानें परभणी-जवळ असलेल्या पाथरी या गांवीं शके १६३७ मध्यें लिहिला.

जैमिनि–अश्वमेधावर नामा पाठक, कृष्णदास, दासोसुत मुद्गल, नारायण विप्र, जगजीवन, विष्णुदास, शिवकल्याण इत्यादि कवींची मराठींत रचना आहे. तथापि श्रीधरी अश्वमेधाचा रसाळपणा त्यांपैकीं एकाहि रचनेंत नसल्यानें त्या बिचाऱ्या संशोधकांच्या स्मरणांतच काय त्या राहिल्या आहेत !

कथेंतील रोमहर्षक विषय

अश्वमेध हा कांहीं बाबतींत दिग्विजयासारखाच आहे. यज्ञीय अश्व सार्वभौम राजानें मोकळा सोडावयाचा व तो जिकडे स्वछंदानें जाईल तिकडे त्याला जाऊं द्यावयाचें. त्याचे बरोबर कोणी संरक्षक योद्धा सैन्यासह जांत असतो. ज्या राज्यांत घोडा जाईल तेथल्या राजानें, धमक असेल तर, सरक्षक सैन्याशीं युद्ध करून अश्वमेध तेथेंच बंद पाडावा. तसें नसल्यास आपल्या सैन्यानिशीं संरक्षक सैन्यांत दाखल होऊन अश्वमेधीय अश्वाचें रक्षण करावें. याप्रमाणें पृथ्वीवरील राजे जिंकून अश्व परत आल्यावर त्याचें हवन करावयाचें. धर्मानें हा यज्ञ केला व अश्वाचे रक्षणासाठीं अर्जुनाची योजना झाली. मार्गांत नीलध्वज, हंसध्वज, प्रमिला (स्त्री राज्याची राणी), बभ्रुवाहन, ताम्रध्वज, मयूरध्वज, वीरवर्मा, चन्द्रहास वगैरे राजे मंडळींनीं घोडा धरून अर्जुनाशीं युद्ध केलें. कोणी युद्धांत पडले, कोणी सख्य केलें, तर कोणी अर्जुनास हतबल करून मग घोडा परत केला. अशा प्रकारें एक वर्षभर पृथ्वीभ्रमण करून घोडा परतला. त्यानंतर यज्ञ समाप्त झाला. असा अश्वमेध कथेचा मोठा रोमहर्षक मुख्य विषय आहे.

वरील कथेंत हंसध्वजाच्या राज्यांत सुरथ आणि सुधन्वा यांचा अर्जुनाशीं झालेला संग्राम, अर्जुन–बभ्रुवाहन या पितापुत्रांचें निकराचें युद्ध, प्रमिला राणीशीं अर्जुनाचा विवाह इत्यादि प्रसंग फारच चित्तवेधक आहेत. अर्जुनाचे प्रतिस्पर्धी फार शूर होते. केवळ कृष्णाच्या युक्तीनें त्याला जय मिळाला कांहीं राजे कृष्णभक्त होते त्यामुळें युद्ध टळलें. एकंदर कथेमध्यें कृष्णाचेंच माहात्म्य ठायीं ठायीं वर्णिलें असल्यानें कृष्णभक्तीला या ग्रंथांत उधान आलेलें आहे व हीच गोष्ट श्रीधरानेंहि स्पष्ट सांगितली आहे.

श्रीजैमिनिकृत अश्वमेध । श्रीकृष्णलीलामृत अगाध ।
श्रवण करतां होय चित्तशुद्ध । म्हणे श्रीधर श्रोतियां ॥

पति कीं पुत्र ?

आतां करुणरस परिपोषाचें एक उदाहरण दाखवून या ग्रंथाचा परिचय येथेंच थांबविला पाहिजे. अर्जुनाचा पुत्र बभ्रुवाहन. पण अर्जुन आपला पिता हें त्यास ठाऊक नसल्यानें त्यानें युद्धांत अर्जुनाचा प्राण घेतला (पुढें संजीवक मण्यामुळें तो जिवंत झाला). अशा या विचित्र प्रसंगांत श्रीधरानें करुणाची निर्मिति केली आहे. उलुपी व चित्रांगी या बभ्रुवाहनाच्या माता व अर्जुनाच्या पत्न्या. त्यांचा पतिनिधनाबद्दलचा शोक हा विलक्षण करुणरसाचा मासला आहे. आपल्या मुलानें मोठ्या पराक्रमानें आपल्या पतीस मारावें ही काय विलक्षण घटना म्हणावी! त्या दोघी दुःखानें बभ्रुवाहनाला उद्देशून म्हणाल्या :

म्हणे मज न दाखवी रे वदन । पितृघातक्या दुरात्म्या ।
माझा मारिलास प्राणेश्वर । जो धर्मरायाचा सहोदर ।
जयाचा सारथि सर्वेश्वर । सर्व संकटीं रक्षिता ।
मातेच्या व्रताकारण । जेणें स्वर्गमार्गीं बांधिले सोपान ।
ऐरावत आणिला जेणें । तो पार्थ कैसा मारिला रे ।
पोटां येवोनि वैर साधिलें । माझें कंठसूत्र जाळिलें ।
कर्णभूषण भस्म केलें । पुत्ररूपें पापिया ।

वैधव्यदीक्षा निश्चित । आम्हा लागीं आणिली ।
म्हणोनि ती गडबडा लोळे । केस सोडिले मोकळे ।
अति आरक्त झाले डोळे । शोकाग्नीनें तेधवा ।
....

मग पुन्हा म्हणती पार्थासी । तूं पुत्ररागें रुसलासी ।
तरी क्षमा करावी अपराधासि । चरण केशी झाडीन मी ।
दोघींनीं शिर नेवोनि मुखासमीप । नानापरी करिती विलाप ।
ऐकता खोल कर्णकूप । उंचबळती शोकजळें ।
भार्गवें मारिली एक माता । तूं वधाव्या उभयतां ।

(जै. अ. ३८ - ११९ - १८०)

श्रीधरी विनोद

श्रीधराच्या कल्पनाशक्तीची थोडी कल्पना पुढील ओव्यावरून येईल.

कीर्तिहंसिनी गेली सत्यलोका ।
ब्रह्मदेवाचा हंस ती विधिवाहनासी रमली देखा ।
येता नभीं अडखळे ऐका ।
सो चंद्र झाला या लोकीं ॥ (जै. अ. ६५ - ९)

माझा सैन्यरेणु जो उडाला । तेणें सागरीं चिखल केला ।
येता त्या पंके चंद्र माखला । तो पंक म्हणती कलंक ॥

(जै अ. ६५ - २१६)

या दोनीहि कल्पना संस्कृत काव्यांवरून कवीस सुचलेल्या आहेत. दुसरी तर श्रीहर्षाच्या नैषधांतीलच आहे (नै. १ - ८). पांडवाचा घोडा हरवला होता. 'तो सांपडणें शक्य नाहीं' ही कल्पना कशी मांडली आहे पहा:—

सागरोदरीं पडलिया मुक्ताफळा । तें जरी काढील आंधळा ।
तरीच हा हरी (घोडा) तुम्हाला । प्राप्त होईल निर्धारें ।

दुसऱ्या कोणाहि मराठी कवीपेक्षां श्रीधराच्या काव्यांत जास्त विनोद आहे. तो बहुतेक सर्व ठिकाणीं सभ्य व उच्च असून भक्ति, शृंगार व वत्सल या रसांना अत्यंत पोषक झाला आहे.

हरिविजय–महाबळ ज्योतिष्याची फजिति (४-१), कृष्णाच्या खोड्या (अ. २४ - २९) रामविजय–भित्र्या ब्राह्मणांची धांदल (१२-३५-४०) पांडव-प्रतापांतील 'अश्वमेध-पर्वांत हास्यरस आहे. जैमिनि ' अश्वमेधांत तर विनोद पुष्कळच आहे. नारद, कृष्ण, भीम, रुक्मिणी इत्यादींच्या संवादांत त्याच्या मनोहर छटा दिसतात. (अ. २, ३, १० व ११ पहा) विनोदी वृत्ति हेंहि श्रीधराच्या काव्याच्या लोकप्रियतेचें एक कारण आहे.

शिवलीलामृत

हा ग्रंथ श्रीधरानें शके १६४० मध्यें बारामती येथें शिवाच्या देवालयांत लिहिला. याच बारामतींत मोरोपंतांनीं पुढें पस्तीस वर्षांनीं याच विषयावर आपला ' ब्रह्मोत्तरखण्ड ' हा ग्रंथ आपले शंकरोपासक यजमान बाबूजी नाईक यांचेकरितां लिहिला हा योगायोग लक्षांत ठेवण्यासारखा आहे. ' शिव-लीलामृता'चे अध्याय चौदा असून ओंवीसंख्या २४५० आहे. श्रीधरानें हा ग्रंथ संस्कृत ' स्कंद-पुराण-ब्रह्मोत्तरखण्डाच्या ' आधारें लिहिला असल्याचें सांगितलें आहे व इतरहि पुराणांतील शिवविषयक कथा वैचित्र्यासाठीं ठिकठिकाणीं वापरल्या आहेत. शिवलीलामृतामध्यें पुढील प्रमुख कथा आहेत:– महानन्दा, भस्मासुर, श्रियाळ-चांगुणा, भद्रायु, दक्षयज्ञविध्वंस, व शिवपार्वतीविवाह. या ग्रंथांत श्रीधरानें शिव, विष्णु आणि पांडुरंग यांचें साम्य किंवा अभेदहि ठिकठिकाणीं सांगितला आहे. तो धर्ममतैक्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे—

शिव थोर विष्णु लहान । हरी विशेष हर गौण ।
ऐसे जे म्हणती त्या लागुन । आणोनि नरकीं घालावें ।।

(शि. ली. १३. ६०–६२)

तसेंच

श्रीधरवरद पांडुरंग । तेणें शिरीं धरलें शिवलिंग ।

(शि. ली. १. १४७)

त्याचप्रमाणें 'शिवलीलामृत' हें सर्वांसाठीं आहे आणि शिवपंचाक्षरमंत्र अखिल वर्णांतील स्त्री-पुरुषांस सारखाच ग्राह्य आहे असें त्यानें सांगितलें आहे—

स्त्री शूद्र आदि करूनी । हाच जप मुख्य चहूं वर्णीं ।
गृहस्थ ब्रह्मचारी आदि करोनी । दिवस रजनी जपावा ॥
(शि. ली. १. ५०)

श्रीधराच्या काव्यग्रंथाचा सर्वसामान्य असा एक विशेष असा आहे कीं त्यानें आपल्या वाचकांना काव्यानंदाबरोबर ऐहिक व पारलौकिक कल्याणाच्या लाभाचें आश्वासन फलश्रुतीच्या रूपानें दिलें आहे.

ग्रंथनाम रामविजय । श्रवणें सदा पाविजे जय ।
चिंतित मनोरथ सिद्ध होय । एक आवर्तन करितांचि ॥
(रा. वि. १. २०४)

जयें नाश होय भवशोका । परम पदातें पाववी । (जै. अ. ६४-१)

ह्या फलश्रुतीचा प्रकार 'शिवलीलामृतां'त जास्त उत्कटपणें निवेदिला आहे:

त्रिमास करितां नित्य एक आवर्तन । सर्व संकटें जाती निरसोन ।
भावें प्रचीति पहावी वाचोन । नाहीं कारण अभाविकाचें ॥
(शि. ली. १४. १९४)

या सर्व गोष्टींचा संकलित परिणाम असा झाला आहे कीं त्याच्या ग्रंथाचें पठण सर्व थरांत निरनिराळ्या हेतूंनीं पण फार विस्तृत प्रमाणावर चालू झालें व अद्यापहि तें टिकून आहे.

प्रतिभा कमी, पण परिश्रम मोठे

एकंदरीनें श्रीधराच्या अफाट काव्य संपदेकडे पाहिलें असतां तिच्याबद्दल कोणासहि आदरानें आपली मान लववावी लागेल. तिच्यामध्यें येथवर दाखवलेले गुण आहेत तसे दोषहि आहेत. श्रीधराची प्रतिभा विशेष उज्ज्वल नाहीं. पण त्याचे परिश्रम मात्र अचाट आहेत. आख्यान-काव्यास आवश्यक असणारे रस-परिपोष, स्वभाव-चित्रण, संवाद-चातुर्य, सृष्टि-वर्णन-कौशल्य, वातावरणनिर्मिति, अलंकार-योजना व भाषाशैली इत्यादि गुण त्याच्या

काव्यांत ठिकठिकाणीं कांहीं प्रमाणांत आढळत असले तरी अगदीं उत्कटतेला पोहोंचलेला व ठसठशीत असा एकहि गुण संपूर्णपणें कोठेंच प्रगट झालेला नाहीं. मुक्तेश्वरासारख्या मराठी कवींचे अनुवाद, संस्कृत काव्य-नाटकांतील कल्पनांचीं प्रतिबिंबें, पुनरुक्ति, पाल्हाळ, सांकेतिक वर्णनें, उत्तान शृंगार व क्वचित् ग्राम्य व अश्लील वर्णनें या गोष्टी बऱ्याच प्रमाणांत आढळतात. कठिण संस्कृत शब्द, लांब समास व क्लिष्ट रचना याहि गोष्टी दिसून येतात. व्याकरणशुद्ध भाषा सर्वत्रच आहे असें नाहीं. शिवआज्ञा, यशदायक, धन-इच्छा असे समास केले आहेत व एकंदर धोरण शिथिलतेचें आहे.

तथापि, भाषेची सवसाधारण सुलभता, बेताचे काव्यगुण, धार्मिकता व विशेष म्हणजे पुराणिक व कीर्तनकार यांच्यामध्यें असलेली बहुश्रुतता, रसाळपणा, विनोदी वृत्ति, मनोवेधकता या व मागें सांगितलेल्या गुणांमुळें श्रीधराची कविता लोकप्रिय झाली. ती इतकी कीं संत-कवींपैकीं तुकाराम व संतचरित्रकार महिपति या दोघा कवींशींच या बाबतींत त्यांची तुलना करावी लागेल. यासाठीं आपण मोरोपंतांच्या शब्दांनींच श्रीधराचा निरोप घेऊं.

‘ हरिविजय ’ ग्रंथातें आधीं मग श्रीधरास वंदीन ।

अभ्यासाच्या वाटा

(१) श्रीधराची लोकप्रियता कशी सिद्ध होते ?

(२) श्रीधराचें चरित्र थोडक्यांत द्या. त्याचें जीवन अत्यंत सुखी होतें तें कां ? उत्तर सविस्तर लिहा.

(३) श्रीधरानें केलेल्या ग्रंथरचनेसंबंधीं माहिती लिहा.

(४) श्रीधराचे ग्रंथ घरोघर अद्यापहि वाचले जातात. असे ग्रंथ कोणते ? प्रत्येक ग्रंथाबद्दल थोडक्यांत माहिती लिहा.

(५) श्रीधराच्या काव्यांतील विशेष कोणते ? उदाहरणें द्या.

(६) श्रीधरानें मुक्तेश्वराकडून कांहीं ऋण घेतलें आहे का ? असल्यास कोणतें ?

(७) श्रीधराच्या काव्यांतील दोषांची चर्चा करा.

* डोळ्यांदेखत काव्याचें कौतुक

मोरोपंत हे पंडित-कवींपैकीं शेवटचे कवि. मुक्तेश्वरानें आपल्या ' संक्षेप-रामायणा'नें पंडिती काव्याचा उपक्रम केला; तर मोरोपंतांनीं आपल्या ' अष्टोत्तरशत ' म्हणजे एकशेंआठ रामायणांनींच त्याचा उपसंहार केला. उपसंहारांत जसें प्रारंभापासून अखेरपर्यंत झालेल्या गोष्टींचें सार येतें तसें मोरोपंतांच्या काव्यांत पंडिती काव्याचें सार आलें आहे. त्यांत पंडिती काव्याचे सर्व विशेष–गुणदोषांसह–आलेले दृष्टीस पडतात. ' पंतोच्छिष्टचि सारें उपमा, यमकें, सुवेष, सुरसत्व ' म्हणजे '–उपमा, यमकें, वृत्तें, भाषाशैली आणि रसवत्ता इत्यादि बाबतींत पंतांनीं कांहीं शिल्लक ठेविलें नाहीं–' असें त्यांचे एक भक्त म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. पंत हयात असल्यापासूनच त्यांच्या काव्याला लोकप्रियता लाभली, कीर्तनकारांनीं पंतकाव्याचा फार मोठा प्रसार केला. प्रसिद्ध शाहीर रामजोशी, मैराळबोवा, विठोबा ताहराबादकर वगैरे कीर्तनकार पंतांच्या समक्ष त्यांच्या आर्या कीर्तनांत म्हणत असत ! आणि त्यांच्या काव्याबद्दल—

श्री मन्मयूर कविची देते संतोष मानवा कविता ।
असतां जरि धरणीवरि सुरगुरु तरि तोहि मान वाकविता ॥

अशी भावना निर्माण झाली होती. विठोबाआण्णा दप्तरदारासारखे कवी-सुद्धां (शके १७२५-१७९५) पंतांना असामान्य कवि मानीत असें त्यांच्या पुढील उद्गारांवरून स्पष्ट दिसतें—

आर्याछंदें जोडुनि रामायण भारतादि आयकवी ।
नायकवीर कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ॥

पंतकाव्याची नवी फेरतपासणी

पंतकाव्याबद्दलचा हा आदर इंग्रजी अमदानी सुरू झाल्यावरहि कांहीं काळ टिकला. दादोबा पांडुरंगांनीं पंतांच्या ‘ केकावली ’वर ‘ यशोदा-पांडुरंगी ’ नांवाची (इ. स. १८७५) व परशुरामपंत तात्या गोडबोले यांनीं “ केकादर्श ’ नांवाची (इ. स. १८७८) टीका लिहिली. आधुनिक कीर्तनकारांमध्यें पंतविषयक आदर अद्यापहि कायमच आहे. पण कांहीं नव्या अभिरुचीच्या नवशिक्षितांनीं, पाश्चात्य टीकाशास्त्राच्या दृष्टीनें, पंतकाव्याची फेरतपासणी केली; व त्यांतील अनेक दोषांचें उद्घाटन केलें. त्यांत डॉ. विल्सन, रा. ब. न्यायमूर्ति रानडे, कृष्णशास्त्री चिपळोणकर, वि. कों. ओक इत्यादि पहिल्या पिढींतील मंडळी होती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या ‘ निबंधमालें ’त ‘ मोरोपंतांची कविता ’ या विषयावर लेखमाला लिहून पंतकाव्य-दूषकांचा खरपूस समाचार घेतला. तरी तो वाद तेथें कायमचा मिटला असें मात्र नाहीं. अद्यापहि पंतांच्या कवित्वाबद्दल उलट-सुलट चर्चा चालू आहे. कोणी त्यास कृत्रिम रचना करणारा निव्वळ भाषान्तरकार म्हणतात, कोणी त्याला प्रतिभाशून्य आणि केवळ शब्दांची कसरत करणारा क्लिष्ट कवि म्हणतात तर कोणाच्या मतें तो मुळीं कवीच नव्हे ! श्रेष्ठ काव्य ठरण्यापासून हीन काव्य किंवा अकाव्य ठरण्यापर्यंतच्या सर्व अवस्था एकट्या बिचाऱ्या पंतकाव्यानेंच अनुभवल्या आहेत ! पण असलीं अतिरेकी मतें निव्वळ क्रिया—प्रतिक्रियारूप असल्यानें तीं बाजूस सारून आपण पंतकाव्याचा विचार समतोलपणेंच केला पाहिजे. तसाच प्रयत्न आपण येथें करूं.

बारामतींत थाटलेला पंतांचा प्रपंच

पंत उत्तर पेशवाईतील कवि असल्यानें त्यांच्याबद्दलची बहुतेक सर्व माहिती उपलब्ध आहे. निदान या बाबतींत तरी वादविवाद नाहीं. पंतांचें आडनांव पराडकर. ते कऱ्हाडे ब्राह्मण. त्यांचें घराणें राजापुराजवळ असणाऱ्या

सौंदळ गांवचें. तेथून त्यांचे वडील रामजीपंत हे पन्हाळगडावर राहण्यास आले. तेथेंच पंतांचा जन्म इ. स. १७२९ मध्यें झाला. पंतांच्या मातेचें नांव लक्ष्मी. पंतांचा विद्याभ्यास पाध्ये नांवाच्या अत्यंत विद्वान् गुरुजवळ पन्हाळ्यासच झाला. रामजीपंत पन्हाळ्याहून बारामतीला बाबूजी नाईकांचे आश्रयास गेले. पंतहि आपला विद्याभ्यास संपवून इ. स. १७५२ चे सुमारास बारामतीला वडिलांचेजवळ राहण्यास गेले. पंतांचें कवित्व व विद्वत्ता पाहून बाबूजी नाईकांनीं त्यांना आपल्या पदरीं पुराणीक म्हणून ठेऊन घेतलें; व त्यांस रहाण्यासाठीं एक घर देऊन त्यांच्या प्रपंचाची सर्व व्यवस्था लाविली. बारामतीसच अखेरपर्यंत राहून पंतांनीं आपला साधा गृह-प्रपंच आणि पाऊण लाख मोलाचा काव्य-प्रपंच उत्तम तऱ्हेनें थाटला. पंतांच्या पत्नीचें नांव रमाबाई असून त्यांना तीन पुत्र तीन कन्या होत्या. पंतांच्या मृत्यूनंतर व बारामतीकर नाईकांच्या घराण्याच्या ऱ्हासानंतर पंतांचे चिरंजीव पंढरपुरास जाऊन राहिले. प्राचीन मराठी कवींमध्यें नमुनेदार गृहस्थाश्रमाचें सौख्य लाधलेले असे तीन कवी झाले. पहिले एकनाथ, दुसरे श्रीधर व तिसरे मोरोपंत. पंतांनीं सदाचरणांत, भगवद्भक्तींत आणि काव्यरचनेंत आयुष्य वेंचलें, काशीयात्रा केली आणि शेवटच्या घटकेपर्यंत काव्यरचना करीत करीत रामचरणीं आपला देह ठेवला. (इ. स. १७९४, शके १७१६ चैत्री पौर्णिमा, हनूमज्जयंती, मंगळवारीं.)

काव्यलेखनाची पूर्वतयारी–पांडित्य

पंडिती वळणाचें मराठी काव्य रचावयाचें म्हणजे त्याला संस्कृत व मराठी वाङ्मयांतील काव्याच्या, काव्यशास्त्राच्या आणि इतर विद्यांच्या अभ्यासाची आवश्यकता फार. त्यांपैकीं संस्कृतचा सर्व अभ्यास पंतांनीं केशव पाध्ये व गणेश पाध्ये या दोन बंधूंजवळ पन्हाळ्यास केला. गुरुमुख झाल्यावर त्यांनीं इतर अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथ स्वतः परिश्रमपूर्वक अभ्यासिले. त्यावेळीं छापखाने नसल्यानें अभ्यासकास ग्रंथ प्रथम लिहून घ्यावा लागे. खुद्द पंतांनीं

आपल्या वळणदार अक्षरानें लिहून घेतलेल्या संस्कृत ग्रंथांची संख्या पन्नास-पर्यंत आहे. त्यांत रघु, कुमार, किरातादि महाकाव्यें, शाकुन्तलादि नाटकें, कुवलयानंद–काव्यप्रकाशादि साहित्यशास्त्रीय ग्रंथ, पंचदशी, अपरोक्षानुभूति, बृहदारण्यक-उपनिषदाचें भाष्य वगैरे वेदान्त ग्रंथ, पातंजलयोगशास्त्र, ज्ञानेश्वरी इत्यादि विविध ग्रंथ आहेत. याशिवाय भारत, रामायण, भागवत या ग्रंथांचा तर त्यांचा फारच सूक्ष्म अभ्यास होता. वरील सर्व ग्रंथांच्या पठणाचें प्रतिबिंब त्यांच्या काव्यलेखनांत जागोजाग पडलेलें आढळतें. धर्मशास्त्राशीं पंतांचा चांगलाच परिचय असून त्यांना वैद्यकविद्याहि उत्तम अवगत होती. मोरोपंत हे वामनाइतपत संस्कृत पंडित नसले तरी मुक्तेश्वर, श्रीधर, रघुनाथपंडित यांच्याप्रमाणें गाढे संस्कृतज्ञ होते यांत बिलकुल संशय नाहीं.

धर्मश्रद्धा–भक्ति–सदाचार

निव्वळ पांडित्यानें सत्काव्य निर्माण होत नाहीं. कवीच्या वृत्तीमध्यें मोठा जिव्हाळा असावा लागतो. तो धार्मिकतेचा, सदाचाराचा, परमेश्वर भक्तीचा आणि लोककल्याणाचा फार मोठा प्रेरक जिव्हाळा पंतांचे ठायीं होता. त्यांतला बराचसा भाग आनुवंशिक असून बाकीचा गुरुसान्निध्यानें उत्पन्न झालेला होता. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम यांच्या कोटींतील ते साक्षात्कारी संत किंवा साधु नव्हेत. पण आपला गृहस्थाश्रम पाळून जेवढा म्हणून ज्ञान–भक्ति–वैराग्याचा ठसा आपल्या चित्तावर उमटवून घेतां येणें शक्य आहे तेवढा ठसा पंतांनीं आपल्या आचारानें, विचारानें आणि उच्चारानें उमटवून घेतला होता. त्यामुळें त्यांचें कविमन प्रेमळ, सद्गुणनिष्ठ, समतोल, प्रवृत्ति–निवृत्तीची योग्य सांगड घालणारें आणि उत्साही दिसतें. हीहि काव्यलेखनाची पूर्वतयारी पंतांनीं करून ठेविली होती. बारामतीस गेल्यावर प्रपंचाची व्यवस्था लागतांच पंतांनीं आपल्या जीवितकार्याला–काव्यलेखनाला-मोठ्या उमेदीनें हात घातला व सतत चाळीस वर्षें ही वाङ्मय-सेवा अखंड चालवून स्वतांस, मराठी भाषेस आणि महाराष्ट्रास धन्य केलें.

पाऊण लाख पण लाख मोलाचें !

पंतांच्या काव्याचा विस्तार अफाट म्हणजे जवळजवळ पाऊण लाख आहे. ज्यावर त्यांची कीर्ति आधारलेली आहे तें आर्याभारत–म्हणजे महाभारताचा आर्यावृत्तांत केलेला सरस संक्षेप–१७१७० आर्यांचें आहे. सर्व रामायणें मिळून १६०००, मंत्रभागवत ३५९२, कृष्णविजय ३६६९, ब्रह्मोत्तरखंड १२००, हरिवंश ५४४४ आणि स्तोत्रें व स्फुट प्रकरणें मिळून बहाबारा हजार अशी एकूण पाऊण लाख कविता पंतांनीं लिहिली. त्यांपैकीं पंतांचें आवडतें वृत्त जें आर्या त्यांतील रचना चाळीस हजार असून इतर काव्य भिन्न गणवृत्तांत आहे. भारत, रामायण, भागवत हे पंतांच्या काव्याचे मुख्याधार असून स्कन्दपुराण, जैमिनि अश्वमेध, मार्कण्डेयपुराण, विष्णुपुराण इत्यादींचे आधारें त्यांनीं आपलीं इतर प्रकरणें रचिलीं आहेत. बाकीचीं स्तोत्ररचना व इतर प्रासंगिक काव्य स्वतंत्र आहे. याप्रमाणें संख्येनें पाऊण लाख पण गुणाच्या दृष्टीनें लाख मोलाची कविता पंतांनीं लिहिली.

काव्यरचनेचा अरुणोदय

पंतांचा प्रतिभा-सूर्य आर्याभारताचे वेळीं आपल्या खऱ्या तेजानें तळपूं लागला हें खरें. पण त्यालाहि अरुणोदयाची रमणीय अवस्था होतीच. पन्हाळगडावर पाध्ये गुरुजींजवळ असतांनाच त्यांनीं काव्यलेखनाचा 'श्रीगणेशा' केला होता. पण पंत बारामतीस आपल्या वडिलांकडे आले असतां ज्या काव्यानें श्रीमंत बाबूजी नाईकांचें लक्ष मोरोपंतांकडे वेधलें तें काव्य म्हणजे ' सतीगीत ' हें होय. सीता, रुक्मिणी आणि सावित्री यांच्यावर ओव्यांमध्यें रचलेलें अत्यंत सोपें, गेय आणि प्रसादमधुर असें हें काव्य आहे. मुली झोंपाळ्यावर बसून ज्या चालीची ओवी म्हणतात तशी चाल या गीताची आहे. हें गीत पंतांनीं नाईकांच्या मुलींसाठीं रचलें. तें पाठ करून त्या झोंपाळ्यावर म्हणत असतां त्या नव्या व सुंदर गीतानें नाईकांच्या मनाची

पकड घेतली. ‘ हें गीत कोणी रचलें ’ अशी चौकशी त्यांनीं केली. त्यावरून त्यांना समजलें कीं, आपल्या कोठीवर व्यवस्थापक असलेल्या रामाजीपंतांच्या मुलाचें हें काव्य आहे. नाईकांच्या गुणज्ञतेमुळें पंत त्यांच्या कायमच्या आश्रयास राहिले ! पण त्याला मुख्य कारण हें काव्य होय. नाईकांप्रमाणें अखिल मराठी रसिकांचेंहि लक्ष त्याकडे वेधलें जावें असें रमणीय तें काव्य खासच आहे. या काव्यांत रमणीयता, पावित्र्य, प्रसन्नता आणि कोंवळीक हे अरुणोदयाचे तीन गुण एकवटलेले आहेत.

अमृताची वृष्टि !

सीता आपल्या मुखानें आपली अरण्यवासाची हकीकत सांगत आहे अशी जिव्हाळ्याची आत्मनिवेदन पद्धति पंतांनीं या काव्यांत योजिली आहे. सीता म्हणते, “ मी अरण्यांतून चालत असतांनाहि माझ्यावर एक अमृतवृष्टि होत होती. ” ती कोणती ?

लक्ष्मण भावोजी । मागें, पुढें स्वामी । मज आहे धामीं । ऐसें वाटे ॥ १ ॥
जेव्हां कांहीं वाटे । चालतां मी मागें । मुरडोनी मागें । विलोकिती ॥ २ ॥
बाई ! काय सांगों । स्वामींची ती दृष्टि । अमृताची वृष्टि मज होय ॥ ३ ॥

मारुतीनें लंकादहन केलें त्या प्रसंगाचें सकौतुक वर्णन सीता करते—

रावणें वानर । मानूनिया तुच्छ । पेटविलें पुच्छ । जाळावया ॥ १ ॥
पुच्छ पेटतांचि । हनूमंत उडे । लंकेमध्यें हुडे । वाडे जाळी ॥ २ ॥
देवांनीं वदनीं । घातली आंगोळी । लंकेची रांगोळी । पाहोनीया ॥ ३ ॥

आतां ‘ रुक्मिणी श्रीकृष्णाची वाट, लग्नाच्या आदल्या दिवशीं, आतुरतेनें पाहत आहे ’ या प्रसंगाचें वर्णन तिच्या तोंडूनच ऐका—

न आले त्या दिशीं । मध्यें रात्र मात्र । चिंताज्वरें गात्र । तापविलें ॥ १ ॥
त्या रात्रीं लागला । नाहीं माझा डोळा । प्राण कंठीं गोळा । झाले होते ॥ २ ॥
जों ऐसें मन्मन । चिंतित राहाटें । स्फुरला पहाटे । डावा बाहू ॥ ३ ॥

कोल्हे व सिंह

'कृष्णानें अंबेच्या देवळांतून रुक्मिणीला कशी नेली' तो वृत्तान्तः—

जगदंबेची म्यां । पूजा केली भावें । कार्य सिद्ध व्हावें । न कां मग ? ॥
जे मज भोंवते । होते उभे मेले । अंबेनें ते केले । वेडे सर्व ॥
गळालीं मेल्यांचीं । हातींचीं हातेरें । पळांत मातेरें । झालें त्यांचें ॥
ज्यांच्या तेजें रवि । शशि मालवले । ते व्याया आले । माला माझी ॥
मला नेतां वीर । एकहि न बोले । वाटले ते कोल्हे । सिंह स्वामी ॥

वरील काव्यांत पंतकाव्याचा अरुणोदय दिसेल. सीता व रुक्मिणी यांच्या मनांत, जणों काय, शिरून, पंत त्यांच्या भावना त्यांच्या भाषेनें बोलून दाखवीत आहेत, त्यांच्या दृष्टीनें पाहून त्यांना साजतील असेच बोल त्यांच्या तोंडीं घालीत आहेत आणि तद्रूप बनले आहेत असें वाटल्या वांचून रहात नाहीं. तसेंच यमकानुप्रास, शुद्ध भाषा, संयम आणि सूचकता याहि पंतकाव्याच्या विशेषांची मंजूळ चाहूल या प्रारंभींच्या काव्यांत लागते. सावित्रीनें तपस्वी सत्यवानासाठीं केलेला त्याग पहा—

हर्षली पावोनी । सती[1] जशी भर्गा[2] । वनाहूनि स्वर्गा । तुच्छ मानी ॥
तशीच सावित्री । आनंदलीं मनीं । क्रीडे तपोवनीं । पतिसंगे ॥
वाटी बहु, स्वल्प । वस्त्र नग ठेवी । वल्कलें ती देवी । सुखें नेसे ॥

भाषान्तर कां स्वतंत्र कृति ?

यापुढें पंतकाव्याचा विचार कालानुक्रमानें न करतां एकदम साकल्यानेंच करूं. व तो करतांना पंतांच्या काव्यगुणांचें व काव्यदोषांचें दिग्दर्शन करूं. म्हणजे पंतकाव्यावर केले जाणारे—मागें उल्लेखिलेले अतिरिक्त दोषारोप व अतिरिक्त गुणारोप—आपोआपच गळून पडतील. संस्कृत ग्रंथांच्या आधारानें मराठी-काव्यरचना करणें यालाच जर भाषान्तर म्हणावयाचें असेल तर हा

१. पार्वती. २. शंकर.

दोष मोरोपंतांप्रमाणें मुक्तेश्वर, वामन, श्रीधर व रघुनाथपंडित या सर्वांवरच येतो. मग त्यांत एकट्या मोरोपंतांच्याच माथीं 'भाषान्तरकार' हा दोष मारण्यांत स्वारस्य काय? खरें सांगावयाचें तर मूळ संस्कृत ग्रंथांचे निव्वळ भाषान्तर वरील कवींपैकीं कोणीच केलें नाहीं. तें करणें शक्यहि नव्हतें. मूळ काव्याचा संक्षेप, विस्तार, बदल, कांहीं आपले व कांहीं इतर ठिकाणचें असें नवें घालणें इत्यादि संस्कार करून, सुसंघटित, सुरस व स्वतंत्र अशी मराठी रचना सर्वांनींच केली आहे. मोरोपंत तर आपलें 'सरस संक्षेपाचें' धोरण स्वतांच पुढील शब्दांत स्पष्ट सांगतात—

वाढेल ग्रंथ म्हणुनि आवरतों मी बळेंच रसनेला। जिभेला
परि म्यां भागवतवरें भागवतांतील सर्व रस नेला ॥
व्यास-कृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी।
आर्यावृत्तें रचितों, स्वल्पांतचि आणितों कथा सारी ॥
त्या श्रीव्यास-प्रमुला वंदुनि मी भारतेतिहास—रस।
पाजीन तुम्हां श्रोत्यां अमृतरसाहून फार हा सरस ॥

आणि हा सरस संक्षेप करतांना पंतांनीं वर सांगितलेले सर्व संस्कार करून आपली अशी स्वतंत्र मराठी कृति रसिकांसमोर मोठ्या आत्मविश्वासानें ठेविली आहे. तिच्यामध्यें त्यांची रसवत्ता, त्यांची कल्पनाशक्ति, त्यांचें वृत्तालंकारयोजनाप्रभुत्व आणि त्यांची अशी खास भाषाशैली स्पष्ट दिसते.

आत्मविश्वासाचे रम्यबोल

आपल्या काव्यगुणांची व काव्यदोषांचीहि योग्य ती जाणीव खुद्द पंतांनाच होती. आपले काव्यगुण किती आत्मविश्वासानें व दोष किती नम्रतेनें (पण दोन्हीहि गोष्टी किती काव्यमयतेनें) पंत सांगतात तें पहा. आर्या-भारत आपण रचिलें याची त्यांना धन्यता तर वाटलीच. पण ती धन्यता त्यांनीं आपल्या मातापितरांच्या धन्यतावर्णनाच्या मिषानें किती मनोहरपणें सूचित केली आहे तें पहा—

धन्य श्रीराम पिता, धन्या लक्ष्मी प्रसू[1] जगीं झाली ।
आली[2] सत्यवतीची[3] कीं भारत कीर्ति सुतमुखीं आली ॥

येथें पंतांनीं स्वमाता व व्यासमाता यांची बरोबरी कल्पून आपलें व्यासाशीं भारत–रचनेपुरतें साम्य सुंदरपणें सूचित केलें आहे. यांत पंतांनीं थोडी लडिवाळ धिटाई केली असली तरी त्यांचा आत्मविश्वास त्यांत स्पष्ट दिसतो.

आपल्या ‘कुशलवाख्याना’बद्दल व ‘मंत्ररामायणा’विषयीं पंत अनुक्रमें असेच आत्मविश्वासाचे बोल ‘नामरसायणां’त बोलतात–‘बा हे रीति पहावी; मज तों वाटे सुधा नदी वाहे ।’ (१०६) आपलें ‘मंत्ररामायण’ हनुमन्नाटकाच्या तोडीचें आहे ही भावना, खुद्द हनुमंतालाच उद्देशून, पंत पुढील-प्रमाणें व्यक्त करतात.–‘वाटे स्वमंत्ररामायण निज नाटक तुम्हीच तोलावें.’(६६) तसेंच आपल्या काव्याविषयीं पंतांची पुढील उक्ति प्रसिद्धच आहे–‘जसे होती देव प्रमुदित शचीनायक[4]वनीं । तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं.’ आपल्या ‘आर्या मुक्तामाले’बद्दल पंतांनीं काढलेले उद्गार आत्मविश्वासदर्शक तर आहेतच; पण ते काव्यमयहि आहेत.

‘आर्या मुक्तामाला’ दावीन, परंतु जरि न मागाल ।
लागाल प्रभु-कंठीं घालूं फुगवील कीं रमा गाल ॥ (१०९)

ही आर्या हा एक पंतकाव्यामृताचा बिंदु आहे. त्यांत व्यतिरेकालंकार ध्वनित आहे. सुंदर दाम-यमक सहज साधलें आहे. भक्ति व आत्मविश्वास तर त्यांत भरून राहिला आहे. पंत हनुमंतास म्हणतात, ‘माझें आर्यामुक्तामालाकाव्य मी तुम्हांला दाखवीन पण तें एका अटीवर. तुम्ही तें (आपल्याकडे ठेवण्यास) मागूं नये व मागितल्यास श्रीविष्णूच्या कंठांत तें अर्पण करण्याचा मोह तरी आवरावा; कारण प्रभूच्या कंठांत तुम्ही तें घातलेंत तर प्रभूला ती माला रमेच्या (म्हणजे लक्ष्मीच्या) कोमल बाहूंपेक्षां जास्त आवडेल व लक्ष्मीचा तुमच्यावर रुसवा होईल.”

---

१. माता, २. सखी, बरोबरीची मैत्रीण, ३. व्यासाची माता, ४. नंदनवन.

स्वदोषांचीहि जाणीव

गुणांप्रमाणें दोषांकडेहि पंत स्वतांच अंगुलिनिर्देश करतात : माझ्या काव्यांत–

गीर्वाणशब्द पुष्कळ, जनपदभाषाचि देखतां थोडी ।
यास्तव गुणज्ञ लोकीं यांची व्यावी हळूं हळूं गोडी ॥ १ ॥
संस्कृत–प्राकृत–मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा । गोधडी
कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यतिमात्र ।
अतिमात्र दोष ऐसे न वदोत कवी समस्तगुणपात्र ॥

या ठिकाणीं सावधगिरीची एक सूचना केली पाहिजे. कोणी कवि स्वमुखानें आपले गुण सांगूं लागला कीं त्याला आत्मश्लाघी म्हणून अप्रमाण मानावयाचें व त्यानें केलेलें स्वदोष-दर्शन मात्र प्रमाण समजावयाचें असें कोणी करूं नये. कवीला दोनीहि बाबतींत सारखाच प्रमाण मानावा. व त्याच्या गुण-दोषदर्शनाला आपल्या सहानुभूतिपूर्व परीक्षणाची जोड देऊन आपलें स्वतंत्र मत जरूर बनवावें. याच सर्व-संमत पद्धतीनें पंतकाव्याचे गुण–दोषविवेचन येथें थोडक्यांत करूं.

पंतकाव्याचें योग्य मूल्यमापन

पंताच्या ठायीं जेवढी कांहीं कवित्वशक्ति होती तेवढी किती उंच जाऊं शकते हें प्रथम पाहूं; व मग ती किती व कां खालीं जाते याचाहि परामर्श घेऊं. पण हेंहि लक्षांत ठेऊं कीं कवित्वपरीक्षणांत कवित्वाचा कस त्याच्या उंचीवरूनच मुख्यतः ठरतो. ‘ येथपर्यंत ह्या कवीच्या प्रतिभेची झेंप पोहोंचते म्हणून तो उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ आहे ’ असें प्रथम ठरवावें व मग त्या कवि-शक्तीच्या आविष्कारांतील दोष–स्थलांकडे वळून त्याच्या ठरलेल्या कसास मुरड घालावी. शिवाय, एकाद्या कवीचें कवित्व ठरवितांना त्या कवीच्या कालाचा, त्याच्या वेळच्या काव्याभिरुचीचा आणि सामाजिक जीवनाचाहि विचार अवश्य व्हावा. A Poet is to be judged in his own setting हें सूत्र विसरूं नये. केवळ गुणांकडे पाहून त्यास महाकवि

म्हणणें, केवळ दोषांकडेच नजर देऊन त्यास हीन कवि किंवा ' कविच नव्हे ' असें म्हणणें आणि आजचीं काव्यमूल्यें त्याच्या काव्यास लावून तें काव्य अजिबात वर्ज्यच समजणें असे समीक्षणाचे अनुचित प्रकार मोरोपंतांच्या बऱ्याच जुन्या–नव्या टीकाकारांनीं केले आहेत. ते टाळल्याशिवाय पंत-काव्याचें योग्य तें मूल्यमापन होणार नाहीं. सहानुभूति ही समीक्षणाची मुख्य भूमिका, असतील त्या गुणांचा रसास्वाद हें त्याचें पहिलें कार्य व चिकित्सक दृष्टीनें केलेलें मूल्यमापन हें त्याचें पर्यवसान होय. या दृष्टीनें पंतांचीं कांहीं रम्य काव्य–स्थलें प्रथम पाहूं.

' संशय-रत्नमाला '

पंतकाव्याची बैठक भगवद्भक्तीची आहे. ही भक्ति त्यांनीं आपल्या स्वतंत्र काव्यांत फार हळुवारपणें, लडिवाळ धिटाईनें पण अत्यंत मनोहरतेनें व्यक्त केली आहे. तिचा गोड आविष्कार ' संशयरत्नमालें'त पहावयास सांपडतो. ' आपण देवाचा धावा आतुरतेनें करीत असून सुद्धां देव आपल्या भेटीस कां येत नाहीं ? त्याला विलंब कां बरें लागत आहे ? ' अशा उत्कण्ठेच्या मनःस्थितींत पंतांनीं देवाच्या न येण्याबद्दलचे किंवा त्याला उशीर होण्यासंबंधींचे अनेक मनोरम ' संशय ' घेतले आहेत, त्यांचें निरसनहि आपणच केलें आहे आणि भक्तीची ज्योत सारखी अखेरपर्यंत तेवत ठेविली आहे. हे सर्व 'संशय' काव्यदृष्ट्या फार सुंदर (अगदीं ' रत्ना 'सारखे मूल्यवान्) असल्यानें पंतांनींच या सुंदर स्तोत्राला ' संशयरत्नमाला ' असें नांव दिलें आहे. त्यांतील दोन तीन ' संशयरत्नें 'च येथें दाखवितों:—

" देव आपल्याकडे त्वरेनें यावयास निघाले असतां ' कोठें जातां ? ' असा अपशकुनी प्रश्न देवीनें विचारला असेल म्हणून देवांनीं येणें रहित केलें असावें, नारद मुनीनें आपल्या सुस्वर संगीतांत त्यांना गुंतवून ठेविलें असेल, ' भक्तांना तारावयास माझें नुसतें ' नाम 'च समर्थ आहे, तें हा भक्त घेतो आहे, तेव्हां आपण स्वतःच कशाला जा ' अशा विचारानें देव मुळीं

नि घालेच नसतील" असें अनेक 'संशय' घेतां घेतां पंत पुढील 'संशय' आणखी घेतात.

'रत्नमालेचा' मेरुमणि

"देवाचें वाहन गरुड. तो पक्ष्यांचा राजा (द्विजराज). म्हणून मयूर पक्ष्याचें (मयूरपंताचें) रक्षण करणें हें त्याचें कर्तव्य. तें त्यानें आजवर केलें नाहीं. म्हणून लाजलेल्या गरुडाला मजकडे येण्याची इच्छा होत नाहीं. व वाहन न मिळाल्यामुळें देवाला यावयास उशीर झाला असला पाहिजे." असा संशय पंत घेतात; व त्याचें निरसनहि लगेच करतात. 'गरुड हा देवाचा नोकर. धन्याला गरज पडतांक्षणींच त्यानें कोठेंहि जावयास सिद्ध असलेंच पाहिजे. त्यानें आपली लाजभीड धन्याच्या कामांत आडवी कां आणावी'?

'मी द्विजराज मयूरत्राण[1] न केलें' अशी धरो[2] लाज ।
[3] प्रस्थानीं परि गरुडें सिद्ध असावेंचि, लागतां काज ॥ १५ ॥
कीं 'भीतो भ्रांत वृथा; मृगजलमग्नासि[4] काय तारावें' ।
म्हणतां असें कसें ? शिशुभय जाया बागुलासि मारावें ॥ १८ ॥
कीं वहु काळ विसरला, फारचि संकोचला, सखा लाजे ।
येत असेल हळुहळू, म्हणुनचि एकहि न पादुका[5] वाजे ॥ ३१ ॥

असे 'संशय' घेतां घेतां शेवटीं जो 'संशय' पंत घेतात तो 'संशयरत्न-मालें'तला मेरुमणी असून तो भक्तिरसांत उजळून निघालेला आहे–

कीं मागें गुप्त उभा ससि, प्रेमें उभारुनी बाहे ।
तरि काय बाळकाचें तूं सादर बोल ऐकिशी बा ! हे ? ॥ ४९ ॥

भक्तीची भावना आळविण्याचा हा एक नवीनच प्रकार पंतांनीं कल्पिला असून

१. मोराचें-मोरोपंतांचें-रक्षण, २. गरुड लाजो, ३. बाहेर जाण्याच्या कामीं, ४. मृगजळांत बुडालेल्याला, ५. पाऊल.

त्याला उभ्या मराठी भक्तिकाव्यांत तोड नाहीं. या एका काव्यावरूनहि पंत निदानपक्षीं कवि आहेत—बऱ्यापैकींहि कवि आहेत—येवढें मान्य करण्यास कोणाहि निराग्रही रसिकाची हरकत नसेल असें वाटतें ! !

मयूराची ' केका '

' केकावली ' हेंहि पंतांचें भक्तिपर काव्य स्वतंत्र असून त्यांतील त्यांचे काव्यगुण वरीलसारखेच आहेत. तें काव्य आजच्या असंस्कृतज्ञ मराठी वाचकांना थोडें कठीण वाटत असलें तरी पंतकालच्या रसिकांना तें आजच्या इतकें दुर्बोध वाटत नसावें. त्यांतील एकच ' केका[६] ' पहा. " तुला उद्धरून जावयाचें तर सर्वांना उद्धरणाऱ्या गंगेकडे जाऊन तिला तूं भीड कां घालीत नाहींस ? माझ्यामागें तुझा लकडा कां ? " या देवाच्या प्रश्नाला पंत उत्तर देतात व आपण गंगेला कां भीड घालीत नाहीं तें सांगतात—

मला निरखितां भवच्चरणकन्यका[७] आपगा[७]
म्हणे ' अगइ ! ऐकिलेंहि न कधीं असें पाप गा ' ।
कर श्रवणिं ठेविते, नुघडि नेत्र घे भीतिला
न घालिन भिडेस मी जरिहि कार्य-लोभी तिला ॥

' माझें पातक इतकें घोर आहे कीं, त्याची गंगेलाहि भीति वाटली. त्यामुळें आतां माझें पाप निरसन करणें हें, देवा ! तुम्ही आपल्याकडेच घेतलें पाहिजे.' हा या श्लोकांतला सूचितार्थ आहे. भयप्रद वस्तु दिसल्याबरोबर स्त्रियांच्या तोंडून सहजच बाहेर पडणारे उद्गार व त्यांच्यावर होणारा भयाचा परिणाम पंतांनीं येथें हुबेहूब वर्णिल्यानें येथें ' स्वभावोक्ति ' नांवाचा अलंकार सहज साधला आहे.

' मुक्तामालेचें ' सौंदर्य

ज्या ' आर्या मुक्तामाले'च्या उत्कृष्टपणाबद्दल पंतांना मोठा आत्मविश्वास वाटत होता असें पृष्ठ ९७ वर सांगितलें आहे तें काव्य संस्कृत आर्यांत रचिलें

---

६. मोराची (मोरोपंतांची) वाणी, शब्द, ७. तुझ्या पायांपासून निघालेली तुझी कन्या (गंगा) नदी.

आहे. पंतांची संस्कृत कविता जवळजवळ नऊ हजार आहे. इतकी विपुल आणि चांगली संस्कृत कविता मराठी कवींपैकीं दुसऱ्या कोणाचीहि नाहीं. यावरून पंतांच्या संस्कृतभाषेवरील प्रभुत्वाची कल्पना येईल. त्यांच्या 'आर्यामुक्तामाले'तील निवेदनपद्धतीचें एक खास वैशिष्ट्य आहे. तिच्यामध्यें रामकथा अथपासून इतिपर्यंत आली असली तरी ती सरळ हकीगतीच्या रूपांत वर्णिलेली नाहीं. रामकथेंतील एकेक महत्त्वाचा प्रसंग क्रमानें घेऊन त्यांवर सूचक आणि सुंदर अशा ११५ उत्प्रेक्षांच्याद्वारें पंतांनीं आपला अभिप्राय प्रगट केला आहे. त्याचा पुढील नमुना पहा. दशरथाला चार पुत्र झाले. त्यांतील दोघांना त्यानें बालपणांतच यज्ञरक्षणार्थ मोठ्या धीरानें विश्वामित्राच्या हवालीं केलें. येवढा 'बालकाण्डां'तील मजकूर पंतांनीं एका आर्येत, दशरथ–स्तुतीच्या रूपानें, आणला आहे. 'अनेक पुत्र कशाला हवेत? केवळ चार पुत्रांमुळेंच जगांतील पित्यांमध्यें, दशरथा, तूं श्रेष्ठ ठरलास! आणि त्यांपैकीं धर्म आणि अर्थ यांच्याप्रमाणें असलेल्या दोन पुत्रांचें दान (विश्वामित्राला) करून तूं सर्व दात्यांमध्यें श्रेष्ठ झालास.' 'रामानें मोडलेल्या धनुष्याच्या भयंकर कडकडाटानें सहनशील (सर्वसह) पृथ्वीहि भयानें हादरून गेली. पण सीतेला तोच नाद मुरलीच्या रवाप्रमाणें मंजुळ वाटला.' 'वशिष्ठा! राज्याभिषेकाला कसला रे मुहूर्त तूं काढून दिलास? कीं ज्याच्यामुळें राज्याभिषेकाच्या मंगलसमयीं अरण्यवासाचें महान् अरिष्ट कोसळलें!

'नंदनवनाला जा'

आतां, राम वनांत जातां क्षणीं दशरथ मृत्यु पावला यावरील सुंदर उत्प्रेक्षा मुळांतच पहा—'दशरथा! तूं रामाला म्हणालास 'नंदना (पुत्रा) वनाला जा.' त्याप्रमाणें तो वनाला गेला. पण मागावून भ्रांतीमुळें तुला वाटलें कीं 'मी 'नन्दनवनं व्रज' असें म्हटलें याचा अर्थ रामानें 'नन्दनवनाला जा' असा घेतला असावा! व तो त्यामुळें स्वर्गांतील नंदनवनाला गेला असावा. म्हणून तेथें त्याला शोधण्यासाठीं दशरथा! तूं गेलास काय रे?' काय म्हणावें या तुझ्या गैरसमजाला?

नन्दनवनं–व्रजेति त्वमवोचः सत्यमजकुलोत्तंस ।

स तु वनमगात्तमीक्षितुमविचार्य गतोऽसि नन्दनं हन्त ॥ १८ ॥

पंतांचा हा सभंग श्लेष रघुनाथपंडितांच्या ‘ औषध नलगे मजला ’ यांतील श्लेषापेक्षां अधिक हृद्य आहे. तसेंच वामनपंडितांच्या ‘ भरतभाव ’ या काव्यांत भरतानें केलेली कैकेयीची कडक निर्भत्सना (‘ अवो कैकेयि हें काय । केलें तुवा हाय हाय । ’ वगैरे) एका दृष्टीनें चांगली असली तरी पंतांनीं या संबंध भरत–कैकेयी–प्रकरणावर जो अभिप्राय एका आर्येंतच प्रगट केला आहे तो अधिक संयमाचा, सूचक व सुंदर वाटतो. पंत भरताला उद्देशून म्हणतात—‘ बा, भरता तूं तुझ्या आईचा असा उपमद करूं नको. कारण ती आपल्या या (अप) कृत्यामुळेंच तुझ्या ठिकाणचे (रामभक्ति, विषय–वैराग्य वगैरे) गुण जगामध्यें प्रगट करण्याला कारणीभूत झाली आहे. जल–सिंचनापेक्षां लत्ताप्रहारानेंच अशोकवृक्ष फुलतो ! भरताच्या ठिकाणचे गुण (अशोक पुष्पांप्रमाणें) कैकेयीच्या सौम्य उपायां-पेक्षां तिच्या या अनर्थकारी कृत्यामुळेंच अधिक प्रगट झाले हा पंताचा अभिप्राय. स्त्रीच्या लत्ताप्रहारानें अशोक फुलतो असा कविसंकेत आहे.

मा मातरमवमंस्था भरत ! स्वगुण-प्रकाश-हेतुमिमाम् ।

सेकादधिकमशोके कुशलं पादाहतेर्यदि चरं सा ॥ २२ ॥

नळाच्या मनांतील रस्सीखेंच

पंतांच्या स्वतंत्र अशा स्तोत्र-काव्यांतील, पंतकाव्यदूषकांनीं प्रायः लक्षांत न घेतलेल्या, सौंदर्याचें विवेचन येथेंच थांबवून आपण त्यांच्या इतर मोठ्या संस्कृतग्रंथाश्रित काव्यांकडे वळूं. भारतावर रचना करतांना मोरोपंतांनीं संक्षेपाचें जाचक बंधन पाळून सर्व भारत मराठींत आणलें. मुक्तेश्वराप्रमाणें हवा तेथें विस्तार करून आपली उज्ज्वल प्रतिभा प्रगट केली नाहीं. (मुक्तेश्वराइतपत प्रतिभा पंतांना लाभली नव्हती हीहि गोष्ट मान्य करावयास हवीच.) तथापि, जाचक संक्षेप, ओंव्यापेक्षां आर्यांचा अवघडपणा, अंत्य

यमकाचें बंधन, आणि संस्कृतप्रचुर भाषा—इतक्या अडचणींतूनहि प्रगट होणारी पंतांची कल्पना, चातुर्य, सूचकता आणि औचित्य हे गुण रसिकांच्या कौतुकाला खासच पात्र ठरतील इतक्या मोलाचे ते आहेत. वनपर्वातील नलोपाख्यानामधील एकच लहान प्रसंग घ्या. निजलेल्या दमयन्तीला, कलीच्या प्रेरणेनें, वनांत एकटी टाकून जातांना नळाचें हृदय शतशः विदीर्ण झालें. तो तिजजवळून निघून गेला. पण पुन्हां पांचसात वेळां माघारा आला. याचें वर्णन मुक्तेश्वर असें करतो :—'त्यागुनि जाय परता । परत ये मागुता । सातपांच वेळ चित्ता । संशयचक्रीं सूदिलें' ॥ याच्याशीं, याचसंबंधींची पंतांची पुढील आर्या तोलून पहा:—

कलि दमयन्ती-प्रेमा, दोघेहि ओढिती नळाला हो ।
प्रेम्याला त्याचें मन सांपडलें, देह त्या खळाला हो ॥

या आर्येनें नळाच्या मनःस्थितीवर—त्याच्या ओढाताणीवर—जितका स्वच्छ प्रकाश पडतो तितका मुक्तेश्वरी ओवीनें पडत नाहीं हें कोणीहि मान्य करील.

सेतु नव्हे, लंकेची वेणी !

भारतान्तर्गत रामकथा वनपर्वांतच वर्णित असतां पंतांनीं स्वतंत्र अशा बहारीच्या उत्प्रेक्षा वापरल्या आहेत. सीतेबद्दल शोक करणारे रामचन्द्र म्हणतात, "सीता मजजवळ असतांना निरनिराळ्या सुंदर गुणांसाठीं प्रसिद्ध असलेल्या हत्ती, सिंह, पोपट, मोर, हरीण वगैरे श्वापदांना मी तुच्छतेनें हंसत होतों, कारण सीतेची गति हत्तीपेक्षां सुंदर, कटि सिंहकटीपेक्षां मोहक, वाणी पोपटापेक्षां गोड, केशपाश मयूरपिच्छापेक्षां सुंदर आणि डोळे हरीण-नेत्रांपेक्षां आकर्षक होते. पण आतां ती नाहींशी झाल्यामुळें माझें हें हंसणें माझ्या पश्चातापाला कारण झालें आहे."

बहु लाजवीत होतों करिकेसरि-कीर[1]-केकि[2]-हरिणां मीं ।
हासत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं ॥ ११-८०

१. पोपट. २. मोर.

आतां, सेतुबंधनावर (लंकेमध्यें जाण्यासाठीं समुद्रांत वानरांनीं बांधलेल्या पुलावर) पंतांनीं केलेल्या सुंदर उत्प्रेक्षा पहा. ‘ हा पूल, जणों काय, लंकेला पाण्यांत बुडविण्यासाठीं भूमीनें (सीतेच्या मातेनें) दूर पसरलेला हात आहे, वानराच्या सेनासागरांतून राक्षसरूप बेडकांना खाण्यासाठीं बाहेर पडलेला काळसर्प आहे ’ आणि ‘ भूमीची मुलगी (सीता) लंकेच्या पतीनें (रावणानें) नेली या रागानें भूदेवीनें ओढलेली लंकेची वेणीच आहे. ’ यांतील तिसरी कल्पना फारच सुंदर असून या एका आर्येंत पंतांनीं अपन्हुति, उपमा, स्वभावोक्ति आणि प्रत्यनीक असे चार अलंकार साधले आहेत. बायका भांडत असतां रागाच्या भरांत झिंज्या ओढतात ही स्वभावोक्ति, आणि लंकेच्या तीनें भूमीची मुलगी नेली म्हणून बलाढ्य रावणाचें पारिपत्य न करतां त्याच्या नगरीच्या (लंकेच्या) झिंज्या भूमीनें ओढणें हा प्रत्यनीक अलंकार.

सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली वृकें[3] जशी एणी[4] ।
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ॥ ११ ॥

रसाला रसालंकारहि पोषक

पंतांच्या कवित्वशक्तीची कल्पना येण्यास इतकीं उदाहरणें पुरेशीं आहेत. आतां कांहीं रसस्थळें, स्वभावरेखा आणि कथानकरचना दाखवितों. म्हणजे फुटकळ रम्य स्थळांबरोबरच सबंध प्रबंधव्यापी कलात्मकताहि पंतकाव्यांत कशी असते हें ध्यानीं येईल. द्रोण व कर्णपर्व अध्याय ११, ३० आणि ४५ यांमध्यें वीररस उत्तम साधला असून ४५व्यांत तर त्या वीररसाला रौद्र, बीभत्स आणि भयानकाची, जणों काय, साथच मिळाली आहे. भीमाचा पराक्रम पंत वर्णीत आहेत. त्यांतील उपमा, उत्प्रेक्षा आणि यमकानुप्रासहि त्या त्या रसाला अगदीं पोषक आहेत.

---

३. लांडग्यानें. ४. हरिणी.

भीम रथावरुनि उडी टाकुनि गुरुयश[5] करावया गोळा ।
धांवे, यंत्रापासुनि[6] वेगानें जेविं उसळला गोळा ॥ (द्रो. ११-८३)
ऐसें मनांत आणुनि पांडव टाकी उडी रथावरुनी ।
दयितेची मूर्तिमती कुरुहननाशा गदा करीं धरुनी ॥
कुरुसेनेसीं घाली जेव्हां समरांगणीं गदा फुगडी ।
तैं काळदृष्टि झडकरि पक्ष्मकपाटें[7] पहावया उघडी ॥ (कर्ण–३३)
गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा[8] झडपी ।
तैसा भीम बळानें दुःशासनकण्ठ अंघ्रिनें[9] दडपी ॥
मग कण्ठनाळ चरचर तो सत्य करावया व्रिरुद कापी ।
मिटक्या देउनि मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका[10] पी ॥
रिपु शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती, किति दडती, कितिएकांची धृतायुधें गळतीं ॥
जाणों त्या अत्युग्रा मूर्त श्री नारसिंहमंत्रास ।
पाहोनी पावले ते रिपुभटभूपाळभूत[11]संत्रास[12] ॥

येथें भीमास दिलेलें तोफेच्या गोळ्याचें व भीमगदेला दिलेलें द्रौपदीच्या कौरवनाशाच्या आज्ञेचें साम्य अत्यन्त समर्पक आहे.

' बालिश बहु बायकांत बडबडला ! '

हास्यरस व स्वभावपरिपोष यांच्या मधुर मीलनाचा म्हणजेच स्वभावनिष्ठ विनोदाचा उत्तम मासला विराटपर्वांतील उत्तराच्या कृतींत व उक्तींत

---

५. मोठी वीर कीर्ति. ६. तोफ. ७. पापण्यांचीं दारें. ८. सर्प. ९. पायानें. १०. स्वतांचा शत्रु (अहित) जो दुःशासन त्याचें रक्त (असृक्) तेंच कोणी पाणी. ११. शत्रूकडील वीर राजे हेच कोणी पिशाच ते नारसिंहमंत्राला भिऊन पळाले. १२. भय.

पहावयास सांपडतो. विराटाच्या गाई कौरवांनीं पळविल्याचें वृत्त आल्यावर स्वभावतः भित्रा उत्तर शूर योद्धयाचा आव आणतो व ' मिळवा कोणितरी हो ! धैर्याचा मात्र उदधि सारथि जो ' असें बायकांत बसून बडबडतो आणि बृहन्नडेच्या वेषांत असलेल्या अर्जुनाबरोबर रणांगणांत येऊन अफाट कौरवसेना पहातांच त्याची घाबरगुंडी उडते हें विनोदी वर्णन पंतांनीं फार छान केलें आहे.

कुरुकटका[1]सि पहातां तो उत्तर बाळ फार गडबडला ।
स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला ॥ ३९ ॥
बोले बृहन्नडे ! हें कुरुबळ कल्पान्तसिंधुसें गमतें ।
ने रथ पुरांत, माजें मन नयनहि पाहतां बहु भ्रमतें ॥ ४० ॥
आज्ञा नसतां आलों, रागें न भरेल काय हो तात ?
रोमांच घर्म[2] कंप प्रकट, व्यापून काय[3], होतात ॥ ४२ ॥
उत्तर म्हणे ' नको गे पायां पडतों बृहन्नडे सोड, ।
जोड[4] दिली, दुखवुं नको; केवळ पितृतलस्थ हा फोड ॥ ७४ ॥
जों जों वैराटि[5] रडे; तों तों तो पार्थ सदय, परिसाचा ।
खळसा हांसे, लोहा निंद्य नव्हे ग्रावभाव[6] परिसाचा ॥ ७५ ॥

त्रिदण्डिसंन्याशाची फजिती !

' कृष्णविजयां'तील अर्जुन–सुभद्राख्यान (अ. ८६) हें प्रसंगनिष्ठ विनोदाचें एक रम्य स्थल असून कृष्ण व बळिराम या दोघा बंधूंचें विरोधि स्वभावदर्शनहि तेथें होतें. कृष्णाच्या संमतीनें अर्जुन संन्याशीबुवा म्हणून द्वारकेंत येतात. भोळे बळिरामदादा त्यांना आपल्या घरीं पुढीला आणता त. पण सुभद्रेला तेथें पहातांच हे संन्याशी चळूं लागतात !

---

१. सैन्य. २. घाम. ३. शरीर. ४. विपुल धनाची. ५. उत्तर. ६. दगडपणा.

यतिदर्शना सुभद्रा येउनि बैसे निजाग्रजा जवळ ।
न बळ प्रेक्षी परि यतिहस्तींचा पाहतां गळे कवळ ॥ १२ ॥
घाली दुधांत सैंधव[७], दुग्धीं जंबीर[८] पायसीं कथिका[९] ।
मथि कामशर जया त्या राम म्हणे साधु मोक्षसत्पथिका[१०] ॥ १३ ॥

पुढें सर्व मंडळीं समुद्रस्नानाला गेली असतां या कपटवेषधारी संन्यासीबोवांनीं आपला खरा हेतु साधण्यासाठीं (सुभद्रेला पळवून नेण्यासाठीं) काय केलें तें पहा—

तेव्हां धांवुनि बैसे पार्थ सुभद्रारथीं, जसा पाटीं ।
सुचिर क्षुधित ब्राह्मण 'हां हां' म्हणतांहि वाढल्या ताटीं ॥ २२ ॥

उत्तरेचा विलाप

आर्या भारताचें स्त्रीपर्व (अ. ४।५) हें करुणरसाचें कारंजेंच आहे. त्यांत कोणी माता आपल्या मृतपुत्रासाठीं, कोणी भगिनी मृतबन्धुसाठीं, तर कोणी पत्नी आपल्या मृतपतीसाठीं शोक करीत आहे. 'मुख हुंगिती सुतांचें, पतिवरि कर फिरविती, पहावेना' अशी स्थिति सर्वत्र पंत वर्णितात. त्यांतल्या त्यांत अभिमन्यूची पत्नी उत्तरा इनें केलेला हृदयद्रावक विलाप पाहण्यासारखा आहे—

अंकीं[११] मस्तक घेउनि ती बाळा उत्तरा पहा पतितें ।
चिबुक[१२] धरुनि हालविते, 'लिहिलें ऐसें कसें महापतितें[१३] ॥ ४१ ॥
हा जन सखीसमाजीं तुमचा सोडूनि काय पद रमला ? ।
चुकल्यें, क्षमा करावी, पसराया उशीर काय पदर मला ॥ ४३ ॥
पतिजवळुनि कां नेतां नेउनि हितबोध करुनि खोलींत ।
तुमच्याहि असें अंतर कां गे पडलें क्रियेंत बोलींत ॥ ५९ ॥

७. मीठ. ८. लिंबू. ९. कढा. १०. मोक्षाच्या सन्मार्गावरील प्रवासी. ११. मांडीवर. १२. हनुवटी. १३. पापी. (विधात्यानें).

याचप्रमाणें रुक्मिणी–विवाह–कथेंत मुग्ध शृंगार, वैराग्यवर्णनांत शान्त, कृष्णाच्या आणि लवकुशांच्या बाल्यवर्णनांत वत्सल असे सर्व बारा रस पंत-काव्यांत आढळतात.

उन्मत्त शर्मिष्ठा–भावडा बळरामदादा

कृष्ण, बळराम, उत्तर, द्रौपदी, दुर्योधन, कर्ण, शर्मिष्ठा, विदुला, धर्म इत्यादि भिन्न प्रकृतींच्या स्त्रीपुरुषांची स्वभावचित्रें यथायोग्य रेखाटून पंतांनीं याहि बाबतींतील आपलें कौशल्य प्रगट केलें आहे. उन्मत्त शर्मिष्ठेचा अहंकार आणि देवयानीचा उपमर्द करण्याची तिची वृत्ति पुढील आर्येंत पंत सुरेख वर्णितात—(आदि. १०–३१)–

राजसुतेचें यश जें, तुज येईल काय गे ! दरिद्रे तें ।
पाहसि विकावया तूं केसरमूल्यें कसें हरिद्रे[1]तें ? ॥

सुभद्रेला अर्जुनानें पळविली म्हणून कृतांताप्रमाणें कोपलेला भोळा बळराम वस्तुस्थिति कळल्यावर कसा प्रेमळ बनतो हें दाखवून पंतांनीं त्याच्या निर्मळ आणि मनमोकळ्या स्वभावाचें उद्घाटन फार छान केलें आहे.

जा जा उटा ! मुलीला पाहों, वाहों वरा, घरा आणा !
प्राणाधिक तो येना तरि घालाव्या मदंघ्रिच्या आणा ॥

‘ रे सहदेवा ! सत्वर पुष्कळसा अग्नि आण, जाच कसा । जाळूं याचे कर, आम्हां हा सोसवेल जाच कसा ’ असें जळफळून बोलणारा मानी आणि घायकुत्या भीम, ‘ बोला हो ! बोला हो ! बोला हो ! सर्व सभ्य बोला हो ’ असा सभासदांना सवाल टाकणारी तेजस्वी आणि धीट द्रौपदी आणि आपल्याच पळपुट्या पुत्राचा (संजयाचा) ‘ अहारे क्लीबा[2] ! मंदा ! कसा पळालास । कां वांचलासि ? अयशस्कर ऐसा कां न तूं गळालास[3] ? ’ या शब्दांनीं धिक्कार करणारी विदुला हीं पंतांचीं स्वभावचित्रें मराठींत अमर होऊन राहिलीं आहेत.

---

१. हळदिला. २. नपूंसका. ३. उपजतांच गर्भांतून कां गळून पडला नाहींस ?

१८० २०.००५ कां.वा. १९५४ ३१/३/५९

योजनाबद्ध रचना

कांहीं स्वतंत्र काव्यें व कांहीं उपाख्यानें लिहितांना पंतांनीं त्यांच्या रचनेची कांहीं योजना निश्चित केलेली दिसते. त्यांचा प्रारंभ, मध्य व शेंवट हा परिणामकारक होऊन त्या विशिष्ट प्रकरणाचा एक ठसा वाचकांचे मनावर उमटावा अशी पंतांनीं हेतुपूर्व रचना कांहीं ठिकाणीं तरी केली आहे. या दृष्टीनें 'संशयरत्नमाले'चा आदिअंत पहा. कृष्णरुक्मिणीविवाहाची 'हंसें मुक्ता नेली, मग केला कलकलाट काकांनीं। हाकांनीं नभ भरलें, जाय सुरांच्याहि नाद हा कानीं।' ही अखेर व कचदेवयानी प्रकरणाचा 'जातां स्वर्गीं मिरविति, निजगुरुसुतरत्न, देव यानीं तें। वर्णिति किति दैत्यांतें,[1] किति कवितें, कितिक देवयानीतें॥ हा शेवट अवश्य पहावा. सलग कथेचे असे सुटे व स्वयंपूर्ण घटक निवडून त्यांचे योजनाबद्ध वर्णन करणें हा रचना-कौशल्याचा भाग पंतांमध्यें दिसतो हें वरील उदाहरणांनीं निदान दिग्दर्शित तरी होईल.

पंतकाव्यदोषांचीं बीजें

पंतांच्या कवित्वाची उंची येथवर अजमावली. आतां, ज्या कारणांनीं ती, कित्येक स्थलीं, बरीच खालावलेली दिसते त्यांचा विचार करावयाचा. पंतकाव्यांत सदोषता उत्पन्न करणारें पहिलें कारण पंतांचें अतिरिक्त यमक-व्यसन हें होय. दुसरें मराठीला संस्कृतची प्रौढता व सालंकारत्व आणण्याची वाजवीपेक्षां जास्त खटपट. तिसरें अर्थचमत्कृतीपेक्षां शब्दचमत्कृतीकडे अधिक ओढा. चौथें वरील दोषांवर पांघरूण घालील इतक्या भव्य, धाडसी व उज्ज्वल प्रतिभेचा आणि उत्कट भावनात्मकतेचा अभाव, पांचवें, स्वैर कलाविलासापेक्षां बोधाकडे, धर्मनीतितत्त्व–विवेचनाकडे वाजवीपेक्षां जास्त लक्ष. सहावें, सबंध संस्कृत ग्रंथ संक्षेपानें मराठींत आणण्याची धार्मिक मनीषा आणि सातवें, प्रसाद व सुबोधता यांपेक्षां पंडिती ओज व अवजडपणा यांकडील प्रवृत्ति. हे दोष गुणांच्या मानानें कमी असले तरी दूषकांना

१. शुक्राचार्याला.

तेवढ्यांच्या आधारानें आपला पक्ष सप्रमाण मांडितां येण्याइतपत ते ठळक आहेत. पंतांच्या अंत्य यमकांची व्याप्ति दोन वर्णांपासून पांच-सहा वर्णांपर्यंत असते व या हव्यासांत ते कधीं कधीं अर्थहानि आणि अनौचित्य हे दोष आपल्या काव्याच्या पदरीं बांधतात. ' सौति सुखें करी तदारंभा ' असें अंत्य यमक वर आलें कीं तेच वर्ण खालच्या ओळींत आणण्यासाठीं वैराग्य-संपन्न सौति-ऋषी ' गमे तदा रंभा ' असें म्हणून हीनोपमा देण्यास कमी करीत नाहींत. केवळ ' चंदीन ' याला ' नंदी न ' हे वर्ण जुळवून ' हरिविजया'ला नंदीची व श्रीधराला शिवाची उपमा पंत देतात तींत कोणतें औचित्य आहे? वर ' कैलासी ' आलें म्हणूनच खालीं नंदीला उद्देशून ' बैलासी ' असें पद ते घालतात ! यति-भंगाचा दोष ठिकठिकाणीं आहे.

सद्हेतूच मारक ठरला !

संस्कृत पंडितांना आपलें प्राकृत काव्य मान्य व्हावें हा पंतांचा सद्हेतु-पण तोच त्यांच्या काव्याची, कांहीं ठिकाणीं, हानि करणारा ठरला ! दस्र (अश्विनीकुमार), अभ्रमु (हत्तीण), असकी (सर्व), कार्ष्णायस (पोलाद), भर्ग—शर्व (शंकर) आणि अदभ्र (पुष्कळ) असले केवळ कोशगत शब्द ज्यांना वापरामुळें कोणतीहि भावनात्मक छटा उत्पन्न झालेली नाहीं—ते भाषागौरवार्थ किंवा यमकांसाठीं ते योजतात. जाड संस्कृत शब्दांशेजारीं गांवठी शब्द घालतात. (कीर्ति-प्रशाव्न तोंडलें, शरपरंपरा व्याला, काळ परिवारासि, आवतणें वगैरे). सभंग व अभंग शब्दश्लेष, निरनिराळे काव्यबंध, ' नमो भगवते वासुदेवाय ' असे मंत्र, यमकांचे सर्व प्रकार, विविधसंस्कृत वृत्तें इत्यादींची गर्दी करून पंतांनीं, कांहीं ठिकाणीं, रसाला गुदमरून सोडलें आहे. त्यांची अष्टोत्तर शतरामायणें हा निव्वळ शब्द-चमत्कृतीचा विलास आहे. असल्या नादांत जेथें भारवि-माघांसारखे संस्कृत महाकविहि रसाला मुकले तेथें पंतांची कथा काय ? या व असल्या अन्य दोषांमुळें पंतांच्या कालींसुद्धां त्यांच्या काव्याचे कांहीं दूषक होते असे

पंतांच्या उल्लेखांवरूनच दिसतें (काव्य करावें म्यां नच वचकावें दूषितो परि लघूस ।) मग आजच्या चोखंदळ अभिरूचीस त्यांचे हे दोष खटकतात यांत नवल नाहीं. असो, स्थलसंकोचास्तव या प्रकरणाचा येथेंच शेवट करून या समालोचनाच्या उपसंहाराकडे वळूं.

आर्या-गंगेचा भगीरथ !

श्री ज्ञानेश्वर, नरेन्द्र पंडित आणि मुक्तेश्वर यांच्या इतकें प्रतिभेचें देणें पंतांना लाभलें नसलें तरी ते इतर पंडित–कवींपेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहेत. त्यांच्या इतपत काव्य-परिश्रम तर दुसऱ्या कोणाचेहि नाहींत. आपल्या मधील 'शक्ति' व 'व्युत्पत्ति' या कविगुणांनीं त्यांनीं मराठी भाषेला प्रौढता व शुद्धि आणली. आपल्या काळापर्यंत दुर्लक्षित असलेल्या 'आर्येला' सम (म्हणजे बारा व अठरा मात्रांनीं युक्त) व भरदार बनविली. पंत नसते तर आर्या आजच्या वैभवांत मराठींत दिसली नसती. खुद्द पंतच आपल्याला आर्या-गंगेचे भगीरथ म्हणवितात तें यथार्थ आहे. (प्रकटी प्रथम भगीरथ नृपलोकीं सुर नदीस, ती आर्या । तसि हे मयूर, नाहीं तरि सर्वांना न दीसती आर्या ॥) पंतांची ही आर्या तत्कालीन मराठी कवितेचें मंगल प्रतीक आहे. ही आर्या-गंगा महाराष्ट्रांत सर्वत्र संचार करून महाराष्ट्रांतील 'पाप-ताप' निरसन करती झाली. आपल्या 'केकावलीं'त पंतांनीं जें 'मागणें' प्रभुपाशीं मागितलें तेंच 'देणें' पंतांच्या कवितेनें महाराष्ट्राला दिलें. त्यांच्या कवितेचें तेंच प्रयोजन व तेंच फल. म्हणून त्या केकेचा उच्चार करून पंडित कवींमधील अखेरच्या या सत्कवीचा आपण सप्रणाम निरोप घेऊं.

सुसंगति सदा घडो, सुजन वाक्य कानीं पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ।
सदंघ्रि कमलीं दडो, मुरडितां हटानें अडो
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ॥

अभ्यासाच्या वाटा

(१) मोरोपंतांचें काव्य लोकप्रिय असूनहि त्याबद्दल मतांतरें अनेक आहेत. या विधानाची स्पष्टता करा.

(२) पंतांचें विद्याध्ययन व गृहस्थाश्रम यांबद्दलची माहिती लिहा.

(३) 'मोरोपंती काव्याचा अरुणोदय मोठा मनोहर आहे.' चर्चा करा.

(४) 'मोरोपंतांना आपल्या काव्यांतील गुणदोषांची पूर्ण जाणीव होती.' कशावरून ?

(५) काव्य या दृष्टीनें 'संशय-रत्नमाला' व 'केकावली' या मोरोपंती काव्याबद्दल तुमचे काय मत आहे ?

(६) मोरोपंत एक चांगल्यापैकीं कवि होते या विधानाला पोषक असे त्यांच्या काव्यांतील कांहीं गुणविशेष उदाहरणांसह लिहा.

(७) 'मोरोपंत कविच्च नव्हे' असें म्हणणाऱ्या पक्षाला कोणता आधार आहे ?

(८) संत-कवि व पंत-कवि हा भेद कोणत्या तत्त्वांवर मानला जातो ?

अनुक्रम २८०० विभाग वा.वा १९५७ दि. ३१३/५९ ग्रंथालय